Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर - 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात

* वर्ष ५४ * अंक २४२ * * नागपूर * | सोमवार, दिनांक ९ डिसेंबर २०२४ | ८ पाने • किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

## बांगलादेशने आशिया कप जिंकला

बांगलादेशने सलग दुसऱ्यांदा पुरुषांच्या अंडर-१९आशिया चषकाचे विजेतेपद पटकावले आहे. दुबईत रविवारी झालेल्या अंतिम सामन्यात संघाने भारताचा ५९ धावांनी पराभव केला. प्रथम खेळताना बांगलादेशने १९८ धावा केल्या, प्रत्युत्तरात टीम इंडियाला केवळ १३९ धावा करता आल्या. बांगलादेशने गेल्या वर्षी अंतिम फेरीत यूएईचा पराभव केला होता. बांगलादेशकडून इक्बाल हुसेन इमोन आणि कर्णधार अझीझुल हकीमने प्रत्येकी ३ बळी घेतले. अल फहादला २ बळी मिळाले. संघाकडून फलंदाजी करताना रिझान हुसेनने ४७ आणि शिहाब जेम्सने ४० धावा केल्या. भारताकडून कर्णधार मोहम्मद अमानने सर्वाधिक २६ धावा केल्या.

अग्रलेख **खरीखरी...**

# इंडियातील विस्फोट

सध्या लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी प्रचंड फार्मात आहेत. ते कुठेतरी हमाली करतात. कुठेतरी जोडे शिवतात. कुठे पोहे बनवतात. कुठे भाजी बनवतात. कुठे ट्रक चालवतात. अशा बऱ्याच गोष्टी ते बऱ्याच ठिकाणी करतात. जनतेच्या एवढ्या जवळ जाणारा पुढारी भारतात दुसरा नाही, हे सत्य आहे. तरीही प्रश्न असा आहे की, एवढे सर्व करून त्यांचा आवाज जनतेपर्यंत का पोहोचत नाही. लोकसभेत संविधान आणि अडाणी हे दोन विषय बरेच चालले. त्याआधी राहुल गांधी हजारो किलोमीटर पायी चालले. एवढे चालून चालून राहुल गांधींचे नाणे आता बोथट झाले आहे की काय ? जनतेचे प्रश्न आणि राहुल गांधीचे विषय यांची कुठेतरी फारकत झाली आहे काय ? असा प्रश्न आता वारंवार पडत आहे. महाराष्ट्राच्या निवडणुकीत राहुल गांधी लोकसभेतील अडाणी आणि संविधान याचाच उल्लेख करत होते. ते बऱ्याच वेळेला वेगवेगळ्या विषयावरती बोलतात. पण ते जनतेच्या हृदयाला ते काही भिडत का नाही ? तसे नसते तर यापूर्वीच्या दोन लोकसभा निवडणुकीनंतर जसा काँग्रेसला विपक्ष नेता बनवता आला नव्हता. तीच परिस्थिती सध्या महाराष्ट्रात का निर्माण झाली ? ज्या काँग्रेसने वर्षानुवर्ष महाराष्ट्रात राज्य केले. त्या काँग्रेसला ग्रेस मार्कांनीही पास होता येत नाही. हा किती मोठा संशोधनाचा विषय आहे. महाराष्ट्रातील तिकीट वाटपात जो काही प्रचंड गोंधळ झाला, तो सर्वज्ञात आहे. अनेक बिन चेहऱ्यांच्या आणि बिन कामाच्या लोकांना तिकीट देण्यात आले. त्यात कोणी खासदारांचा भाऊ आहे. कोणी अमुक नेत्याचा चमचा आहे. कोणी दोन-चारवेळा आपटलेला आहे. कोणी मागील दोन-तीननिवडणुका लढवल्याच नाहीत. अशा अनेक भणंग गणंगांना काँग्रेसने सुवर्णाची अंगठी दिली. पण ती या महाभागांच्या बोटात गेल्यानंतर, ज्यांनी अंगठी दिली त्या दलालांना ती सोन्याची अंगठी पितळेची करायची होती. शेवटी राहुल गांधी कुठे कुठे आणि काय काय पाहतील. राहुल गांधी एक आणि बाकीच्यांची सर्वांवर चिखलफेक असे चित्र दिसत होते. नागपुरातील एक पराभूत उमेदवार तुमच्याच म्हणजे काँग्रेसच्याच अध्यक्षाला चक्क संघाचा दलाल म्हणतो. काँग्रेसच्या उमेदवारांना काँग्रेस कार्यकर्त्यांची फारशी मदत मिळतच नाही. मतदान केंद्राच्या काँग्रेसने लावलेल्या बूथवर अनेक बेजबाबदार पोट्टे-पाट्टे बसलेले आम्ही सुद्धा पाहिलेले आहेत. कुठे भाजपची बलाढ्य यंत्रणा आणि कुठे काँग्रेसचे हे नवाबजादे. काँग्रेसला देशभरात आजही वीस टक्के जनतेचा पाठिंबा आहे. ते संघासारखे कट्टर स्वयंसेवक नसतील. पण ते कार्यकर्तेही नाहीत. ते काँग्रेसला मत देणारे किंवा काँग्रेसवर श्रद्धा ठेवणारे एका गुरुजीच्या शाळेसारखे हेडमास्तर आहेत. ते स्वतःचे मत देतील. पण आपल्या बायकोलाही काँग्रेसला मतदान करा, असे म्हणणार नाहीत. विशेष म्हणजे लोकसभेत इंडिया आघाडी एकत्र होती. म्हणून काँग्रेसला शंभर जागा तरी मिळाल्या. त्या आल्यानंतर दोन छोटी राज्ये काँग्रेसच्या सहप्रवाशांनी जिंकली. त्यात काँग्रेस आगेमागे होती. पण ज्या राज्यात काँग्रेस पुढेपुढे होती. त्या हरियाणातही आणि महाराष्ट्रातही काँग्रेसला भाजपने असा काही पंजा दाखवला की, तो पंजा काँग्रेसच्या माणसाचा नसून भाजप सारख्या सिंहाचा आहे. हे काँग्रेसला कळलेच नाही. लोकसभेत एक माय आणि दोन लेकरे असलेले एकूण तीन गांधी काँग्रेसचा आता आवाज उठवतील. पण तिथेही पश्चिम बंगालच्या ममताबाई आपला वेगळा अजेंडा आता राबवत आहेत. अखिल उत्तर प्रदेशचे नेते समजणारे अखिलेश यांना या काँग्रेसच्या लोढण्याचा उपयोगच नाही, हे समजून चुकलेले आहे. काँग्रेस खास उरली नाही, हे आम आदमीला दिसून आलेले आहे. त्यामुळेच काँग्रेस पक्षासोबत नसलेली, तृणमूल काँग्रेस आता राष्ट्रीय काँग्रेसला डिवचू लागली आहे. त्यामुळेच आता खुद्द ममताबाई इंडियाचे नेतृत्व करण्याचा इरादा व्यक्त करीत आहेत. ममताबाई फक्त बंगालमध्ये क्रमांक एकवर आहेत. बाकी देशात कंगाल आहेत. तरीही त्यांना आता देशाचे नेतृत्व करण्याचे डोहाळे लागलेले आहेत. याचा एकच अर्थ आहे की, आताच्या लोकशाहीचे नेहमीच रडगाणे म्हणजे मोठी फाटाफूट आगामी काळात दिसून येईल. कारण आता एनडीएतून सत्तालोलुप नितीश कुमार आणि संधीसाधू चंद्राबाबू नायडू काही बाहेर पडत नाहीत. त्यामुळेच इंडियात फाटाफूट होत आहे. एकूणच इंडियातील विस्फोटाची अशी ही खरीखरी कथा आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# मलाईदार खातं देण्यास भाजपाचा नकार

■ महासागर प्रतिनिधी
**मुंबई, दि. ८ :** राज्यात सरकार स्थापन झाले असले तरीही खातेवाटप रखडलं आहे. कोणत्या पक्षाला किती आणि कोणतं खाते मिळणार याकडे अवघ्या राज्याचं लक्ष आहे. एकनाथ शिंदे मुख्यमंत्रीपदावर अडून होते, परंतु त्यांना उपमुख्यमंत्रीपदी देण्यात आलं. तर, दुसरीकडे ते गृहखात्यावरही अडून आहेत, असं सांगितलं जातंय. दरम्यान, भाजपा गृहखातं सोडण्यास तयार नसल्याचं वृत्त आहे. यासंदर्भातील वृत्त दिलं आहे. गृहखात्याच्या मोबदल्यात त्यांना महसूल, नगरविकास आणि सार्वजनिक बांधकाम खाते भाजपाने देऊ केले आहेत. तर, अजित पवारांकडे आधीच वित्तखातं आहे.
भाजपामधील उच्चपदस्थ सूत्रांनी सांगितले की, भाजपाने आपला मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेला गृहमंत्रालय देऊ शकत नसल्याचे स्पष्ट केले आहे. ५ डिसेंबर रोजी, भाजपा नेते देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत मुंबईतील आझाद मैदानावर मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यांच्याबरोबर शिंदे आणि पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. फडणवीस यांनी प्रसारमाध्यमांना सांगितले की, १६ डिसेंबरपासून नागपुरात सुरू होणाऱ्या हिवाळी अधिवेशनापूर्वी मंत्रिमंडळाचा विस्तार होणार आहे. ७ ते ९ डिसेंबर या तीन दिवसीय विशेष अधिवेशनाच्या समाप्तीनंतर मंत्रिमंडळाचा विस्तार केव्हाही होईल, असे संकेत भाजपाच्या सूत्रांनी दिले. भाजपाच्या नेत्याने सांगितले की, फडणवीस यांनी त्यांच्या पहिल्या कार्यकाळात (मुख्यमंत्री म्हणून) गृहखातेही सांभाळले आणि काही धाडसी सुधारणा केल्या. भाजपाकडे १८ ते २०, शिवसेनेकडे १२ ते १४ आणि राष्ट्रवादीकडे ९ ते ११ मंत्री असतील, असे सूत्रांचे म्हणणे आहे. महायुतीत ३० ते ३५ मंत्री असलेले मोठे मंत्रिमंडळ अपेक्षित आहे. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळाची सर्वाधिक संख्या ४३ आहे. यामध्ये मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांचाही समावेश आहे.

**मंत्रिमंडळात फारसे फेरबदल होणार नाहीत**

नाव न सांगण्याच्या अटीवरून एका भाजपा नेत्याने इंडियन एक्स्प्रेसला सांगितले , तीन पक्षांची युती राज्यात अडीच वर्षांपासून राज्य करत आहे. शिंदे ते फडणवीस मुख्यमंत्री बदल सोडला तर इतर बहुतांश फेरबदल किरकोळ असतील. मंत्रिमंडळाची रचना तशीच राहण्याची शक्यता आहे, प्रत्येक पक्षाने त्यांचे विद्यमान पोर्टफोलिओ मुख्यत्वे राखून ठेवले आहेत मात्र, काही विभागांबाबत काही वाटाघाटी होऊ शकतात. घराव्यतिरिक्त ऊर्जा, जलसंपदा, आदिवासी कल्याण, गृहनिर्माण, ग्रामीण विकास, ओबीसी कल्याण आणि उच्च आणि तांत्रिक शिक्षण विभाग राखण्याचे भाजपचे उद्दिष्ट आहे. यापूर्वीच्या सरकारमध्ये महसूल आणि सार्वजनिक बांधकाम विभागही भाजपाकडे होते. शिवसेनेने नगरविकास कायम ठेवल्यास महसूल/सार्वजनिक बांधकाम खाते भाजपाकडे परत येईल. मात्र, शिवसेनेला उद्योग, शालेय शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा आणि स्वच्छता, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), अल्पसंख्याकांचा विकास आणि वक्फ बोर्ड विकास, मराठी भाषा या ही खाती देण्यात येण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादीला कोणती खाती मिळणार ? राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला अर्थ, सहकार, कृषी, आरोग्य आणि उच्च शिक्षण, तसेच अन्न व औषध प्रशासन आणि महिला व बालकल्याण ही प्रमुख मंत्रालये मिळण्याची शक्यता आहे.



एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रीपद सोडल्याने त्यांना गृहखातं मिळावं अशी मागणी शिवसेनेकडून केली जात आहे. गुलाबराव पाटील, संजय शिरसाट, भरत गोगावले यांच्यासह अनेक शिवसेनेच्या नेत्यांनी शिंदे यांना गृहमंत्रिपद मिळावे, अशी आग्रही मागणी केली आहे. तर, २८८ पैकी १३२ जागा जिंकणारा सर्वात मोठा पक्ष असलेल्या भाजपाने गृहमंत्रालय आणि मुख्यमंत्रिपदावर आपला हक्क सांगितला आहे. शुक्रवारी माध्यमांना फडणवीस म्हणाले, केंद्रात भाजपाच्या नेतृत्वाखाली आमचे सरकार आहे. दिल्लीत केंद्रीय गृहमंत्रालय भाजपा (अमित शाह) कडे आहे. त्यामुळे एकाच पक्षाकडे गृहमंत्रिपद कायम ठेवल्याने समन्वय साधण्यास मदत होते.

# सहा पुरस्कारांसह राष्ट्रीय पंचायत पुरस्कारात महाराष्ट्र द्वितीय

### राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते ११ डिसेंबरला पुरस्कार वितरण

**इगतपुरी तालुक्यातील मोंढाळे ग्रामपंचायत तृतीय**

दीनदयाळ उपाध्याय पंचायत सतत विकास पुरस्कार श्रेणीमध्ये मोंढाळे (ता. इगतपुरी, जि. नाशिक) ग्रामपंचायत देशात तृतीय आली. नानाजी देशमुख सर्वोत्तम पंचायत सतत विकास पुरस्कार श्रेणीत व ग्राम ऊर्जा स्वराज पुरस्कारातही मन्याचीवाडी (ता. पाटण, जि. सातारा) ग्रा.पं.ने प्रथम क्रमांक, विकास पुरस्कार श्रेणीत तिरोरा (जि. गोंदिया) पंचायत समितीने देशात तृतीय क्रमांक पटकावला. कार्बन न्यूट्रल विशेष पुरस्कारात बेळा (ता. जि. भंडारा) ग्रा.पं. प्रथम, पंचायत क्षमता निर्माण सर्वोत्तम संस्था पुरस्कारात पुण्याच्या यशदा अकादमीने तृतीय क्रमांक पटकावला.

■ महासागर प्रतिनिधी
**मुंबई, दि. ८ :**
पंचायत राज मंत्रालयाने उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पंचायत संस्थांना राष्ट्रीय स्तरावर विविध पुरस्कार जाहीर केले आहेत. यात महाराष्ट्राला द्वितीय क्रमांकाचा बहुमान मिळाला. ओडिशा, त्रिपुरा यांना संयुक्तपणे प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळाला. या पुरस्कारांचे वितरण येत्या ११ डिसेंबरला नवी दिल्ली येथील विज्ञान भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते होणार आहे. विविध श्रेणींमध्ये ४५ पुरस्कारांपैकी प्रत्येकी सात पुरस्कारांसह ओडिशा आणि त्रिपुरा संयुक्तपणे प्रथम क्रमांकावर आहेत. सहा पुरस्कारांसह महाराष्ट्र दुसऱ्या स्थानावर, तर आंध्र प्रदेश चार पुरस्कारांसह तिसऱ्या स्थानावर आहे. बिहार आणि हिमाचल प्रदेशने प्रत्येकी तीन श्रेणींमध्ये पुरस्कार मिळवले आहेत. दरम्यान, एकात्मिक विकासाभिमुख नियोजनामुळे हे शक्य झाल्याची प्रतिक्रिया माजी मंत्री गिरीश महाजन यांनी व्यक्त केली.



# नागपूरकरांनी ध्वजनिधीत १.१९ कोटी रुपये दिले



- विदर्भातून नागपूर अव्वल
- जिल्हाधिकारी इटनकर, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर आनंद पाथरकर सन्मानित

महासागर प्रतिनिधी
**अमरावती,(दि.८)**नागपूर माजी सैनिकांप्रती आदरभाव दर्शवित नागपूरकरांनी ध्वजनिधी संकलनात एक कोटीहून अधिकचे योगदान दिले आहे. यंदा झालेल्या संकलनाच्या आधारे विदर्भातील अकरा जिल्ह्यांमध्ये नागपूरने अव्वल स्थान प्राप्त केले आहे. देशासाठी सीमेवर लढणारे जवान शहीद झाल्यास त्यांच्या कुटुंबीयांच्या पुनर्वसनासाठी तसेच निवृत्त झालेल्या जवानांच्या मदतीसाठी या ध्वजनिधीचा वापर करण्यात येतो. देशाच्या जवानांप्रती आदर आणि स्नेहभाव व्यक्त करत देशभरातील नागरिकांकडून या सशस्त्र ध्वजनिधीला सढळ हाताने मदत केली जाते. ध्वजनिधी संकलनात महाराष्ट्र आघाडीवर आहे. दरवर्षी डिसेंबरला ध्वजदिन साजरा होत असतो. या दिवसापासून ध्वजनिधी संकलनास प्रारंभ होतो. यंदा ध्वजनिधी संकलनाचे लक्ष्य १ कोटी १९ लाख ९८ हजार रुपये ठेवण्यात आले होते. ते लक्ष्य पार करत १ कोटी ९ लाख ७७ हजार रुपये याअंतर्गत संकलित झाले. मागील वर्षीदेखील निर्धारित उद्दिष्टापेक्षा अधिक निधी संकलित करण्यात आला होता. यंदादेखील तीच परंपरा येथील माजी सैनिक कल्याण कार्यालयाने कायम ठेवली आहे. यासंदर्भात अधिक सांगताना जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर (निवृत्त) आनंद पाथरकर म्हणाले, 'अन्य जिल्ह्यांच्या तुलनेत नागपूर जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर आणि जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर (निवृत्त) आनंद पाथरकर यांना स्मृतीचिन्ह प्रदान करताना राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन. राज्यपालांच्या हस्ते गौरव निधी संकलनामध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल जिल्हाधिकारी तथा ध्वजदिन निधी कल्याण समितीचे अध्यक्ष डॉ. विपीन इटनकर तसेच जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर (निवृत्त) आनंद पाथरकर यांना राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

भरीव कामगिरी केली आहे. जिल्हाधिकारी तसेच विविध शासकीय कार्यालये, सामान्य देशप्रेमी नागपूरकरांनी सैनिकांप्रती दाखवलेले प्रेम आणि विश्वास यामुळेच हे निधी संकलन होऊ शकले. नागपूर जिल्ह्याने विदर्भातील अकरा जिल्ह्यांमध्ये प्रथम स्थान पटकावले आहे. तर विभागीय स्तरावर नागपूर, नाशिक, लातूर यानंतर तिसऱ्या क्रमांकावर आहे. तसेच राज्यातील सर्व जिल्ह्यांचा विचार करता नागपूरने अहिल्यानगर, लातूरपाठोपाठ तिसरा क्रमांक पटकाविला आहे.'

# राहुल नार्वेकर पुन्हा होणार विधानसभा अध्यक्ष

■ महासागर प्रतिनिधी
**मुंबई, दि. ८ :**
भाजपचे राहुल नार्वेकर यांची पुन्हा एकदा विधानसभा अध्यक्षपदी निवड होणार असल्याचे जवळपास निश्चित आहे. त्यांनी अध्यक्षपदासाठी आज दुपारी अर्ज दाखल केला. यावेळी देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे यांच्यासह महायुतीचे नेते उपस्थित होते. राहुल नार्वेकर यांना यंदा मंत्रिपदाची आस होती. परंतू त्यांचे वकिली कौशल्य पाहता त्यांची विधीमंडळात सत्ताधारी पक्षाला मोठी गरज लागणार आहे. त्यामुळे राहुल नार्वेकर यांना पुन्हा एकदा विधानसभा अध्यक्ष पदाचा अर्ज भरण्यास सांगण्यात आले. राहुल नार्वेकर सलग दुसऱ्यांदा विधानसभा अध्यक्षपद सांभाळणार आहेत.
महायुतीकडे प्रचंड संख्याबळ असल्याने राहुल नार्वेकर यांची विधानसभा अध्यक्षपदावरची निवड ही केवळ औपचारिकता मानली जात आहे. सध्या विधानसभेचे विशेष अधिवेशन सुरू आहे. राहुल नार्वेकर महाराष्ट्रातील कुलाबा मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आले आहेत. त्यांनी शनिवारी विधानसभेत मंत्रिपदाची शपथ घेतली. महायुती सरकारच्या अडीच वर्षांच्या काळातही त्यांची विधानसभा अध्यक्षपदी निवड झाली होती.






# केंद्रीय मंत्री नितीन गडकरी अमृतसरला

### सहकार भारतीच्या राष्ट्रीय अधिवेशनात सहभागी



■ महासागर प्रतिनिधी
**अमृतसर, दि. ८ :**
केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आज अमृतसरला पोहोचले आहेत. गेल्या दोन दिवसांपासून अमृतसर रेल्वे स्थानकाजवळील बी-ब्लॉकमध्ये सुरू असलेल्या सहकार भारतीच्या ८ व्या राष्ट्रीय अधिवेशनात गडकरी सहभागी झाले होते. अमृतसर येथे राष्ट्रीय अध्यक्ष दीनानाथ ठाकूर आणि राष्ट्रीय सरचिटणीस डॉ.उदय जोशी यांच्या अध्यक्षतेखाली हे अधिवेशन होत आहे. सहकार्याला समर्पित

**तीन वर्षांच्या योजनांवर विचारमंथन**

२०२१ मध्ये सहकार मंत्रालयाची स्थापना झाली. तेव्हा देशात सहकाराबद्दल एक नवीन चेतना निर्माण झाली. यानंतर सहकार क्षेत्राला नवी प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. यासाठी सहकार भारतीने सर्वात जास्त योगदान दिले आहे याचा आपल्या सर्वांना अभिमान वाटला पाहिजे.

सहकार भारतीच्या राष्ट्रीय अधिवेशनात देशभरातून २५०० हून अधिक प्रतिनिधी सहभागी होत आहेत. सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष दीनानाथ ठाकूर म्हणाले की, सेवेची भूमी असलेल्या अमृतसरच्या पावन भूमीत प्रथमच सहकार भारतीचे राष्ट्रीय अधिवेशन होत आहे, ही आनंदाची बाब आहे. सेवेच्या भावनेने, जागृत मनाने आणि अधिक उर्जेने आपल्या क्षेत्रातील कामगारांनी मोक्षासाठी सहकार्याने कार्य करावे.

# ठाण्यात फेरीवाला क्षेत्र निश्चितीसाठी रस्त्यांचे होणार सर्वेक्षण

**ठाणे, दि. ८ : प्रतिनिधी**

ठाणे महापालिका क्षेत्रात फेरीवाला धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासनाने पाऊले उचलली असून त्याचाच एक भाग म्हणून फेरीवाला क्षेत्र निश्चितीसाठी प्रशासनाकडून पुन्हा एकदा रस्त्यांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. तसेच फेरीवाला समिती सदस्य निवडीसाठी निवडणुक घेण्याची तयारी प्रशासनाने सुरू केल्याने गेले अनेक वर्षे रखडलेली ही निवडणुक लवकरच होण्याची चिन्हे आहेत.

ठाणे महापालिका क्षेत्रात फेरीवाला धोरणाची अद्याप अंमलबजावणी होऊ शकलेली नाही. गेले अनेक वर्षे हे धोरण कागदावरच असल्याचे चित्र आहे. या धोरणासाठी पालिकेने २० जणांची समिती गठीत करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, ही समितीही अद्याप गठीत होऊ शकलेली नाही. या २० जणांच्या समितीमध्ये पालिका आयुक्त, पोलिस आयुक्त, वाहतूक पोलिस उपायुक्त, नगर नियोजन अधिकारी, आरोग्य अधिकारी असे पाच पदसिद्ध सदस्य आहेत. आठ फेरीवाल्यांचे प्रतिनिधी, दोन सामाजिक संस्था, २ गृहनिर्माण संस्था, पणन विभाग, बँक आणि व्यापारी संघटनेचा प्रत्येकी एक पदाधिकारी या समितीत नियुक्त होऊ शकलेले नाहीत. त्यामुळे या सर्वांची नियुक्ती करण्यासाठी पालिकेने हालचाली सुरू केल्या आहेत. यातील फेरीवाला प्रतिनिधी वगळता, इतर सदस्य अर्ज मागवून नियुक्त केले जाणार आहेत. तर, फेरीवाला प्रतिनिधी निवडीसाठी निवडणुक घेतली जाणार आहे. पालिकेकडे आतापर्यंत १ हजार ३६६ फेरिवाल्यांनी नोंदणी केली असून हे सर्वजण मतदार असणार आहेत. या निवडणुकीनंतर पुन्हा फेरिवाल्यांचेही सर्वेक्षण केले जाणार आहे.

ठाणे महापालिका प्रशासनाने यापुर्वी फेरिवाला धोरणाच्या अंमलबजावणीसाठी रस्त्यांचे सर्वेक्षण केले होते. फेरीवाल्यांमुळे वाहतूकीस अडथळा निर्माण होणार नाही, याचा अभ्यास करून काही रस्ते फेरिवाला क्षेत्र करण्याचा प्रस्ताव तयार केला होता. परंतु हा प्रस्ताव धुळखात पडल्याचे चित्र आहे. परंतु आता हा प्रस्ताव आणि सद्यस्थिती याचे पुन्हा सर्वेक्षण करण्यात येणार असून त्याआधारे फेरिवाला क्षेत्र निश्चित करण्याचा विचार प्रशासकीय पातळीवर सुरू आहे. गर्दीचे, वदर्ळीच्या असलेल्या रस्त्यांवर फेरीवाल्यांमुळे पादचाऱ्यांना चालणे शक्य होत नाही. त्यामुळे पदपथ सोडून रस्त्याचा एक मीटर बाहेर एक पांढरी रेषा आखली जाणार आहे. त्या पांढऱ्या रेषेच्या पलिकडे फेरीवाल्यांना जाता येणार नाही. किंबहुना त्या रेषेच्या आतमध्येच फेरीवाल्यांना बसण्याची मुभा दिली जाणार आहे. जेणेकरुन पदपथ मोकळे होऊन पादचाऱ्यांना चालणे सुलभ होणार आहे, अशी माहिती सुत्रांनी दिली.

# विधानसभेला दारूण पराभव!

## राजकीय भविष्याने मनसेचे कार्यकर्ते चिंतीत, महापालिका कशी लढायची ?

**पुणे, दि. ८ : प्रतिनिधी**

पक्षाला कसलेच राजकीय भवितव्य काहीच दिसत नसल्याने पुणे शहरातील तसेच जिल्ह्यातीलही महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी व त्यांचे समर्थक कार्यकर्ते चिंतीत झालेले दिसत आहेत. पक्षाच्या विधानसभा निवडणुकीत बसलेला दारूण पराभवाचा धक्का त्यांच्यात अजून कायम असून महापालिका निवडणुकीसाठी आत्ताच काही वेगळा निर्णय घ्यायचा का, या विचारात काहीजण असल्याची चर्चा आहे.

**निवडणूक लढवण्याला प्रतिसाद**

मागील काही वर्षे मनसे प्रत्येक निवडणुकीत तटस्थच राहिली. लोकसभा निवडणुकीत कधी भाजपला पाठिंबा दिला तर कधी भाजपचा तीव्र विरोध केला. विधानसभेला मोजक्याच जागा लढल्या. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीकडे लक्ष ठेवून बहुसंख्य राजकीय पक्षांमध्ये कार्यकर्ते काम करतात. मनसे त्याला अपवाद नाही, मात्र तटस्थतेच्या धोरणामुळे मनसेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना त्यांची राजकीय ताकद तपासून पाहण्याची संधीच मिळत नव्हती. २०२४ च्या विधानसभेने त्यांना ती संधी दिली. त्यामुळेच विधानसभा स्वबळावर लढवण्याच्या पक्षाध्यक्ष राज ठाकरे यांच्या निर्णयाला पक्षाच्या स्थानिक स्तरातून मोठा पाठिंबा मिळाला.



**सभांना गर्दी, मतांना नाही**

तब्बल १३६ जागांवर मनसेने उमेदवार उभे केले. खुद्द राज यांचा मुलगा अमीत यालाही मुंबईतून उमेदवारी देण्यात आली. राज यांनी ठिकठिकाणी आपल्या उमेदवारांकरता जाहीर सभा घेतल्या, त्यांना चांगला प्रतिसादही मिळाला, मात्र तो मतपेटीत उतरला नाही. सर्वच्या सर्व जागांवर मनसेचे दारूण पराभव झाला. अमीत ठाकरे यांनाही पराभवाचा सामना करावा लागला. पुणे जिल्ह्यात मनसेने ७ ठिकाणी उमेदवार दिले होते. त्यात पुणे शहरात ४ ठिकाणी तर ग्रामीण भागात ३ ठिकाणी उमेदवार होते. या ७ ही ठिकाणी पराभव झाला. खडकवासला, हडपसर वगळता अन्य मतदारसंघातील उमेदवारांना तर लक्षणीय मतेही मिळाली नाहीत.

**कार्यकर्त्यांमध्ये चलबीचल**

त्यामुळेच आता जिल्ह्यातील मनसेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये चलबीचल सुरू झाली आहे. निवडणूक निकालानंतर राज यांनी पुण्यात येऊन मुंबई, ठाणे वगळता अन्य ठिकाणच्या जवळपास ८२ पराभूत उमेदवारांची भेट घेतली. त्यांना दिलासा दिला. मात्र त्याचा फारसा उपयोग झालेला दिसत नाही. राज्यात नवे सरकार स्थापन झाले. त्यांच्याकडून लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक घेण्यात निर्माण झालेली कायदेशीर अडचण दूर केली जाईल असे दिसते. महायुती व महाविकास आघाडीचे स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते या निवडणुकांच्या तयारीलाही लागले आहेत. मनसेत मात्र अशी काहीच हालचाल दिसून येत नाही.

**थांबायचे की जायचे?**

महापालिका निवडणुकीसाठी मनसेतच थांबायचे की दुसरी वाट शोधायची याच्या विचारात बहुसंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते असल्याची चर्चा आहे. मनसेच्या स्थापनेपासून आम्ही काम करतो. राजकीय लक्ष्य ठेवलेले असतेच, सत्तेशिवाय ध्येय कसे साध्य करता येईल? मात्र आता सत्ता मिळण्याची किंवा सत्तेत सहभाग मिळेल अशी शक्यता मावळलेली दिसते आहे असे पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे. राज ठाकरे यांचा करिष्मा आहेच, पण धोरणांमध्ये सातत्य नसणे, सत्तेला पाठिंबा द्यायचा किंवा नाही याबाबत स्पष्टता नसणे, विरोध कोणाला? कशासाठी? किती काळ? या प्रश्नांची उत्तरेच कधी मिळत नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळेच महापालिका किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर होईपर्यंत 'थांबायचे की आत्ताच रस्ता बदलायचा?' अशा मनस्थितीत मनसेचे बहुसंख्य कार्यकर्ते असल्याची चर्चा आहे.

# खारफुटीवरील भराव रोखण्यासाठी सीसीटिव्ही कॅमेऱ्यांची मदत

**ठाणे, दि. ८ : प्रतिनिधी**

ठाणे शहराला लाभलेल्या खाडी किनारी भागातील खारफुटीवर मातीचा भराव टाकून होणारे अतिक्रमण रोखण्यासाठी पालिका प्रशासानाने गेल्या काही महिन्यांपासून पाऊले उचलली आहेत. त्याचाच एक भाग म्हणून खाडी किनारी भागातील रस्त्यांचे प्रवेशद्वार खणून हे मार्गच बंद करण्यापाठोपाठ आता सिसीटिव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. याशिवाय, खारफुटीवर टाकण्यात आलेला भराव काढण्यासाठी प्रशासनाने हालचाली सुरू केल्या असून या कामासाठी २८ ते ३० कोटींचा खर्च अपेक्षित आहे. परंतु पालिकेच्या तिजोरीत पुरेसा निधी नसल्यामुळे हा खर्च करायचा कसा, याचा विचार प्रशासकीय पातळीवर सुरू आहे.

ठाणे शहराला सुमारे ३२ किमीचा खाडीकिनारा परिसर लाभला आहे. ठाणे खाडी परिसरात परदेशातून भारतात स्थलांतर करणाऱ्या फ्लेमिंगो पक्ष्यांसह इतर काही पक्षी-प्रजाती आढळून येतात. या पाणथळ जागेला आंतरराष्ट्रीयदृष्ट्या विशेष महत्त्व आहे. यामुळेच ठाणे खाडी क्षेत्राला 'रामसर' स्थळाचा दर्जा आहे. असे असले तरी गेल्या काही वर्षांपासून भुमाफियांकडून खाडी किनारी भागात भराव टाकून अतिक्रमण करण्याचे प्रकार वाढीस लागले आहेत. या अतिक्रमणामुळे खाडी किनारी भागातील खारफुटी मोठ्या प्रमाणात नष्ट होत आहे.



यामुळे जलचरांचे अस्तित्व धोक्यात येण्याबरोबरच भविष्यात पुराचा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. काही महिन्यांपुर्वी ठाणे शहरातील मुंबई महापालिकेच्या जलवाहिनीला लागूनच असलेल्या कोलशेत खाडी परिसरातील खारफुटीवर मोठ्या प्रमाणात राडारोडा टाकून नवे बेट उभारण्यात येत असल्याची बाब समोर आली होती. यावरून टिका होऊ लागताच पालिका आणि जिल्हा प्रशासनाने भराव रोखण्याचे काम हाती घेतले होते. कोलशेत खाडी किनारी भागात खारफुटीवर भराव टाकण्यासाठी भुमाफियांनी तयार केलेले रस्त्यांचे प्रवेशद्वार खणून हा मार्गच बंद करण्याचे काम पालिकेने केले होते. त्यापाठोपाठ आता या भागांमध्ये मातीचा भराव टाकला जाऊ नये यासाठी पालिकेने ३४ ठिकाणी सिसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. त्यात आतापर्यंत काही मातीचा भराव टाकणारे ट्रक आढळून आले असून याबाबत प्रदुषण नियंत्रण विभागाकडून संबंधित प्रभाग समितीला कळविले आहे. त्यांच्याकडून पुढील कार्यावाही सुरू असल्याची माहिती सुत्रांनी दिली.

कोकण विभागीय कांदळवन समितीकडे खाडी किनारी भागातील भरावाच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्याआधारे या समितीने खाडीकिनारी भागात टाकलेला भराव काढून टाकण्याची सुचना पालिकेला केली आहे. त्यामध्ये खारेगाव टोल नाका परिसर, कोलशेत खाडीजवळील जलवाहीनीलगतचा भाग आणि कोलशेत विसर्जन घाट परिसर, चेंदणी परिसर या भागांचा समावेश आहे. येथील भराव भराव काढण्यासाठी प्रशासनाने हालचाली सुरू केल्या असून या कामासाठी २८ ते ३० कोटींचा खर्च अपेक्षित आहे. परंतु पालिकेची आर्थिक स्थिती चांगली नसल्यामुळे या कामासाठी पालिकेच्या तिजोरीत पुरेसा निधी उपलब्ध नाही. त्यामुळे या कामासाठी निधी कुठून आणायचा, याचा विचार प्रशासकीय पातळीवर सुरू आहे.

## ठाण्यात रंगणार 47 वे एकदिवसीय महानगर साहित्य संमेलन

**ठाणे, दि. ८ : गजानन तुपे**

तीन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने आणि एक अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन भरवणाऱ्या ठाणे शहरात या वर्षाला निरोप देताना महानगरसाहित्य संमेलन साजरे होणार आहे. महाराष्ट्र सारस्वतकार वि.ल.भावे यांनी स्थापन केलेल्या मराठी ग्रंथ संग्रहालय , ठाणे आणि मुंबई मराठी साहित्य संघयांच्या संयुक्त विद्यमाने ४७ वे एकदिवसीय महानगर साहित्य संमेलन रविवार १५ डिसेंबर २०२४ रोजी होणार आहे.

संमेलनाचे अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ विनोदी लेखक मुकुंद टांकसाळे यांची निवड करण्यात आली आहे तर मुलांच्या जडणघडणीत महत्वाची भूमिका बजावणाऱ्या 'वयम' या मासिकाचे संस्थापक आणि उद्योजक श्रीकांत बापट हे संमेलनाचे स्वागताध्यक्ष आहेत. मराठी ग्रंथ संग्रहालय,ठाणेच्या सरस्वती मंदिर ( मुख्य शाखा,स्टेशन रोड,जिल्हा परिषदे समोर ) या वास्तूमधील महाराष्ट्र सारस्वतकार वि.ल. भावेनगरीमध्ये हा साहित्य सोहळा साजरा करण्यात येईल.या ४७ व्या महानगरसाहित्य सुप्रसिध्द सिने दिग्दर्शक रवी जाधव हे या महानगर साहित्य संमेलनाचे उद्घाटक आहेत.

महाराष्ट्र सारस्वतकार वि.ल.भावे साहित्य नगरीत होणाऱ्या या संमेलनातील सर्व कार्यक्रम जनकवी पी.सावळाराम मंचावर होतील.रविवार .१५ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५.३० या वेळात होणाऱ्या या संमेलनात सहभागी होण्यासाठी कोणतेही शुल्क नाही मात्र नाव नोंदणी आवश्यक आहे असे आवाहन मराठी ग्रंथ संग्रहालयाचे अध्यक्ष विद्याधर ठाणेकर यांनी केले आहे. या संमेलनाच्या उद्घाटन समारंभाच्या वेळी संमेलनाध्यक्ष टांकसाळे हे 'विनोदाचे जीवनातील स्थान' या विषयावर व्याख्यान देतील.या एकदिवसीय महानगर साहित्य संमेलनामध्ये त्यानंतर ९१ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक लक्ष्मिकांत देशमुख यांची मुलाखत डॉ.विजय जोशी घेतील. त्यानंतर ' अभिजात मराठी ज्ञानभाषा कशी होईल? ' या विषयावर परिसंवाद होईल. या परिसंवादामध्ये प्रकाश परब, प्रा. डॉ.वीणा सानेकर, प्रा. अनघा मांडवकर, कादंबरीकार आणि कवी डॉ.बाळासाहेब लबडे सहभागी होतील.

या एकदिवसीय महानगर साहित्य संमेलनाचा समारोप 'अंकुर कवितेचा' या काव्य संमेलनाने होईल. युवा कवी संकेत म्हात्रे या काव्यसंमेलनाचे अध्यक्ष असतील या काव्य संमेलनसाठी विविध महाविद्यायातील कवींनी पाठवलेल्या कवितांमधून काही निवडक कविता सादर करण्याची संधी नवोदित कवींना दिली जाईल. या एकदिवसीय संमेलनाच्या निमित्ताने मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या तळमजल्यावर ग्रंथ प्रदर्शन आणि विक्री आयोजित करण्यात आली आहे. या संमेलनाच्या निमित्ताने २०२४ संपता संपता ठाण्यात एक दिवसीय साहित्य जागर होणार आहे.

# काळा खडक आणि निगडीमध्ये पोलिसांनी नऊ किलो गांजा केला जप्त, तिघांना बेड्या

**पिंपरी- चिंचवड, दि. ८ : प्रतिनिधी**

शहरामध्ये वेगवेगळया दोन कारवाईमध्ये अंमली पदार्थ विरोधी पथकाने सुमारे नऊ किलो गांजा जप्त केला आहे. गेल्या काही दिवसांपासून पिंपरी- चिंचवड शहरात गांजा विक्रीवर अंमली पदार्थ विरोधी पथकाची करडी नजर आहे. याच अनुषंगाने कारवाई करत पोलिसांनी नऊ किलो गांजा जप्त केला आहे. सूरज पंडित पवार, हफिजअली मेहबुबअली सय्यद आणि मोहिनी आनंद जाधव या तिघांना अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, काळाखडक येथे अंमली पदार्थ विरोधी पथक हे गस्त घालत होत. पथकातील पोलीस अधिकारी विक्रम गायकवाड यांना माहिती मिळाली की दोन संशयित सुरज पंडित पवार आणि हफिजअली मेहबूबअली यांच्याकडे गांजा आहे. त्यांना ताब्यात घेऊन सुरज च्या घरी तीन किलो ७२२ ग्रॅम गांजा पोलिसांना आढळला. दोन मोबाईल देखील मिळाले.

दुसऱ्या कारवाईमध्ये निगडीत दत्त मंदिराच्या परिसरात शौचालयाच्या आडोशाला संशयितरित्या मोहिनी जाधव ही महिला थांबली होती. मोहिणीला पोलिसांनी ताब्यात घेतलं. मोहिनीच्या घरी देखील चार किलो गांजा पोलिसांना मिळाला. दोन्ही कारवाई मध्ये सुमारे नऊ किलो गांजा अंमली पदार्थ विरोधी पथकाने जप्त केला आहे. ही कारवाई अमली पदार्थविरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.



# करंजा रेवस सागरी पूल मार्गिकेला ग्रामस्थांचा आक्षेप

## 1980 च्या नियोजन आराखड्यानुसार जोड मार्गिका देण्याची मागणी

**उरण, दि. ८ : प्रतिनिधी**

करंजा (उरण) ते रेवस (अलिबाग) या बहुप्रतीक्षित सागरी पुलाच्या जोड मार्गिकेला करंजा ग्रामस्थांनी आक्षेप नोंदविला आहे. गुरुवारी एमएसआरडी व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांसमोर ग्रामस्थांनी आपल्या हरकती नोंदविल्या आहेत. यावेळी ग्रामस्थांनी तत्कालीन मुख्यमंत्री अ. र. अंतुले यांच्या १९८० च्या आराखड्यानुसार मार्गिका द्यावी अशी मागणी केली आहे. यासाठी प्रशासनाला निवेदनही देण्यात आले आहे.

महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ(एमएसआरडीसी) च्या माध्यमातून नव्याने हा मार्ग उभारण्यात येत आहे. प्रस्तावित रेवस ते रेड्डी या मुंबईला थेट कोकणाशी जोडणाऱ्या या महत्त्वाकांक्षी सागरी महामार्गाच्या जोड मार्गिकेला करंजा ग्रामस्थांनी आक्षेप नोंदविला आहे. याची दखल घेत एमएसआरडीसीच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष स्थळाला भेट देऊन शेतकरी आणि ग्रामस्थांचे म्हणणे ऐकून घेतले. उरणच्या करंजा ते अलिबाग येथील रेवस दरम्यानच्या दोन किलोमीटर लांबीच्या पुलाचे भूमिपूजन १४ ऑक्टोबरला तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले आहे. २ हजार ४७८ कोटी रुपयांची निविदा या पुलाच्या उभारणीसाठी मागविण्यात आली आहे. या पुलाची एकूण लांबी ही १०.२०९ किलोमीटर आहे. मुंबईतील सागरी अटल सेतू मार्गे द्रोणागिरी नोड येथून या पुलावरून कोकणात हा प्रवास करता येणार आहे. नियोजित रेड्डी ते रेवस मार्गापूर्वी महाराष्ट्र शासनाच्या वतीने १९८० साली महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री अ.र अंतुले यांनी करंजा ते रेवस मार्गाची घोषणा केली होती. यावेळी भूसंपादनाची प्रकिया राबवून प्रत्यक्षात कामाला सुरुवात सुद्धा करण्यात आली होती. परंतु काही कारणास्तव सत्ताबदल होऊन अंतुले यांना मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागल्याने या पुलाचे काम बंद झाले होते.

४२ वर्षांनंतर पुन्हा एकदा नव्याने सरकारने एमएसआरडीसीकडून हा मार्ग तयार केला जात आहे. त्यासाठी या मार्गावर करंजा ते रेवस हा सागरी पूल उभारला जाणार आहे. या पुलाला जोडणाऱ्या मार्गासाठी करंजा येथील चाणजे महसूल हद्दीतील जमीन संपादित करण्यात येणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या १९८० च्या नियोजित मार्गात बदल करून ऐतिहासिक व पौराणिक रामायणातील उल्लेख असलेल्या द्रोणगिरी पर्वताच्या पायथ्याला लागून हा रस्ता बनवण्याचा घाट घातला जात आहे. त्याला येथील ग्रामस्थांचा आक्षेप घेतला आहे. तसेच या मार्गाच्या खोदकामामुळे द्रोणगिरी पर्वताला धोका निर्माण होण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे. 'विकासाला विरोध नाही. मात्र शासनाने करंजा रेवस सागरी पुलाला जोडणारी मार्गिका जुन्या आराखड्या प्रमाणे करावी,' अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सचिन डाऊर व उरण पंचायत समितीचे माजी सभापती सागर कडू यांनी केली आहे. यावेळी चाणजे ग्रामपंचायत सरपंच अजय म्हात्रे,देविदास थळी यांच्यासह ग्रामस्थ आणि शेतकरी उपस्थित होते.

## भाजीपाल्याची आवक वाढली, वातावरणातील उष्म्याने आठ दिवस आधीच उत्पादन

**नवी मुंबई, दि. ८ : प्रतिनिधी**

वाशी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीत गुरुवारी भाजीपाल्याच्या तब्बल ७०० गाड्या दाखल झाल्या. वातावरणातील उष्म्याने आठ दिवस आधीच उत्पादन निघाल्याने ही आवक वाढली आहे, अशी माहिती व्यापाऱ्यांनी दिली. त्यामुळे काही भाज्यांचे दर उतरले आहेत तर काही भाज्या मात्र महागच आहेत.

गुरुवारी घाऊक भाजीपाला बाजारात एकूण ७००गाड्या दाखल झाल्या होत्या, यामध्ये पालेभाज्यांची २०० गाड्या आवक झाली. एरव्ही बाजारात ५५० ते ६०० गाड्या दाखल होतात. मागील आठवड्यात गारठा वाढला होता, परंतु पुन्हा आता ढगाळ वातावरण आणि उष्मा वाढला आहे. त्यामुळे भाज्यांचे उत्पादन लवकर निघत आहे. परिणामी बाजारात आवक वाढली आहे. काही भाज्यांच्या दरात प्रतिकिलो ५-६ रुपयांची घसरण झाली आहे, मात्र बहुतांश भाज्यांचे दर चढेच आहेत. घाऊकमध्ये प्रतिकिलो टोमॅटो ४० रु., शिमला मिरची ४०रुपये, हिरवी मिरची २०-३०रुपये, कोबी१६-२०रुपये, फ्लावर १०रुपये, भेंडी ४०-५०रुपये ,फरसबी ४०रुपयांनी विक्री होत आहे.

**पालेभाज्या, कोथिंबीर स्वस्त**

वाशीतील एपीएमसी भाजीपाला बाजारात पालेभाज्यांची आवक वाढली आहे. त्यामुळे दरात घसरण झाली आहे. तापमान वाढल्याने उत्पादन जास्त होत आहे. त्यामुळे अधिक प्रमाणात भाज्या दाखल होत असून जुडी ५-७रुपयांनी विक्री होत आहेत. पुणे आणि नाशिक येथून येणाऱ्या मेथीला कमीत कमी ५ आणि जास्तीत जास्त ८ रुपये बाजारभाव आहे. त्यामुळे किरकोळ बाजारातही भाव कमी झाले आहेत. या आधी १५-२० रुपये दराने एक जुडी मिळत होती. पालेभाज्यांमध्ये कोथिंबिर, पालक आणि मेथीची आवक वाढत असून २,५५,००० क्विंटल कोथिंबीर दाखल झाली असून प्रतिजुडी ५-८ रुपयांनी उपलब्ध आहे.

# डोंबिवलीतील 58 बेकायदा इमारती रिकाम्या करण्याच्या नोटिसा

## दहा दिवसांत इमारती जमीनदोस्त करण्याचे आदेश

**कल्याण, दि. ८ : प्रतिनिधी**

डोंबिवलीत बेकायदा इमारती उभारून या इमारतींना महारेराचा नोंदणी क्रमांक मिळवून, या बेकायदा इमारती अधिकृत असल्याचे दाखवून घर खरेदीदारांची फसवणूक करणाऱ्या डोंबिवलीतील ह, ग, फ, ई आणि आय प्रभागातील बेकायदा ५८ इमारतींमधील रहिवाशांना इमारती रिकाम्या करण्याच्या, त्या जमीनदोस्त करण्याच्या नोटिसा साहाय्यक आयुक्तांनी देण्यास सुरुवात केली आहे. या नोटिसांमुळे या बेकायदा इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांमध्ये खळबळ उडाली आहे.

डोंबिवलीतील ६५ बेकायदा इमारती तीन महिन्यांच्या आत जमीनदोस्त करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमोल बोरकर यांनी दिले आहेत. ६५ बेकायदा इमारतींच्या विकासकांनी महारेराचा नोंदणी क्रमांक मिळवून या इमारती अधिकृत असल्याचे दाखवून या इमारतींमधील घरे रहिवाशांना विकली आहेत. अशाप्रकारचे यापुढे होणारे प्रकार रोखण्यासाठी वास्तुविशारद संदीप पाटील यांनी या बेकायदा इमारतींवर कारवाई करण्यासाठी चार वर्षांपासून पालिकेकडे तगादा लावला होता. पालिकेकडून कारवाई होत नसल्याने वास्तुविशारद पाटील यांनी याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. याचिका दाखल होताच पालिकेने ६५ इमारतीच्या विकासकांविरुद्ध मानपाडा, रामनगर पोलीस ठाण्यात तीन वर्षांपूर्वी गुन्हे दाखल केले.

न्यायालयाने या याचिकेची दखल घेऊन येत्या तीन महिन्यांत या बेकायदा इमारती तोडण्याचे आदेश कल्याण डोंबिवली पालिकेला दिले आहेत. न्यायालयात याचिका दाखल झाल्यानंतर दरम्यानच्या काळात पालिकेने ६५ बेकायदा इमारतींमधील सात इमारती तोडल्या आहेत. उर्वरित ५८ बेकायदा इमारतींमध्ये रहिवासी राहत आहेत.

**पालिकेच्या नोटिसा**

पालिकेच्या प्रभाग साहाय्यक आयुक्तांनी ५८ बेकायदा इमारतींमधील रहिवाशांना नोटीस मिळाल्यापासून दहा दिवसांच्या आत इमारती रहिवास मुक्त करून जमीनदोस्त करण्यात यावी. ही इमारत आपण दिलेल्या वेळेत तोडली नाहीतर पोलीस बळाचा वापर करून ही इमारत जमीनदोस्त करण्याची कारवाई न्यायालयाच्या आदेशावरून सुरू केली जाईल. न्यायालयाच्या आदेशाचे आपण उल्लंघन केल्यास आपणावर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा नोटिसीत दिला आहे.

## जळगावच्या प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यासह दोघे 3 लाखांची लाच घेताना सापळ्यात

**छत्रपती संभाजीनगर, दि. ८ : प्रतिनिधी**

नियुक्ती दिल्याचा मोबदला म्हणून तीन लाखांची लाच मागितल्याप्रकरणी जळगावचे प्रादेशिक परिवहन अधिकारी दीपक अण्णा पाटील (वय ५६) व खासगी व्यक्ती भिकन मुकुंद भावे (दोघेही रा. जळगाव) हे दोघे छत्रपती संभाजीनगर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाकडून लावण्यात आलेल्या सापळ्यात अडकले. गुरुवारी दुपारनंतर जळगाव येथील मेहरून तलावजवळील फ्लॅट न. ३, १० लेक होम अपार्टमेंट येथे ही कारवाई करण्यात आली. तक्रारदार यांची सीमा तपासणी नाका नवापूर येथे नोव्हेंबर २०२४ या महिन्यात नियुक्ती करण्यात आली आहे. संबंधित नियुक्ती दिल्याचा मोबदला म्हणून दीपक पाटील यांनी ४ डिसेंबर रोजी तीन लाख रुपये लाचेची मागणी करून रक्कम खाजगी व्यक्ती भिकन भावे याच्यामार्फत पंच, साक्षीदारांसमक्ष ५ डिसेंबर रोजी स्वीकारली. सापळा अधिकारी अमोल धस यांच्या पथकाने रक्कम स्वीकारताना दोघांनाही पकडले. या प्रकरणी जळगाव येथील एम.आय. डी.सी पोलीस ठाण्यात गुन्हा करण्याची प्रक्रिया सुरू आहे, अशी माहिती

# उल्हासनगरात दिड लाखाचा गुटखा जप्त, 6 जणावर गुन्हा, तिघांना अटक

**उल्हासनगर, दि. ८ : प्रतिनिधी**

स्टेशन परिसरातुन काही व्यक्ती सफारी बॅगमध्ये प्रतिबंधित गुटखा बुधवारी सकाळी घेऊन जाणार असल्याची माहिती विठ्ठलवाडी पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी पाळत ठेवून एकूण ६ जणांना ताब्यात घेतले. एकूण १ लाख ६५ हजाराचा गुटखा जप्त केला असून ताब्यात घेतलेल्या ६ मध्ये ३ महिलांनाचा समावेश आहे.

उल्हासनगरात गेल्या आठवड्यात मटका जुगार अड्ड्यावर पोलिसांनी धाडी टाकून ३० पेक्षा जास्त जणांना अटक केली. तर विठ्ठलवाडी पोलिसांनी बुधवारी सकाळी उल्हासनगर स्टेशनला परिसरातून एका बॅग मध्ये गुटखा घेऊन जाणाऱ्या एका टोळीला ताब्यात घेऊन चौकशी सुरु केली. ताब्यात घेतलेल्या सहा जणा मध्ये ३ महिलांचा समावेश असल्याची माहिती विठ्ठलवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पडवळ यांनी दिली. ताब्यात घेतलेल्या टोळीवर विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून गुटखा कुठून आणला व कुठे नेण्यात येत होता. याबाबतची चौकशी पोलीस करीत होते. जप्त केलेल्या गुटक्याची किंमत १ लाख ६५ हजार रुपयाची असून अधिक तपास पोलीस करीत आहेत. अटक केलेल्या ३ पुरुष आरोपींना न्यायालयाने दोन दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पडवळ यांनी दिली.

# नागपूर विद्यापीठाच्या विद्यार्थी सहाय्य निधीतून आर्थिक मदत
# गरजू विद्यार्थ्यांकडून २ जानेवारी पर्यंत अर्ज आमंत्रित

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या विद्यार्थी सहाय्य निधीतून गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत केली जाते. याकरिता विद्यार्थ्यांकडून २ जानेवारी २०२५ पर्यंत अर्ज मागवण्यात आल्याची माहिती विद्यार्थी विकास विभाग प्रभारी संचालक डॉ. विजय खंडाळ यांनी दिली.

विद्यापीठ शैक्षणिक विभाग, संचलित व संलग्नित महाविद्यालयातील गरीब, गरजू विद्यार्थ्यांना विद्यार्थी सहायता निधीमधून शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, वसतिगृह भाडे व जेवणाचा खर्च आदींसाठी आर्थिक मदत केली जाते.

वरील निधीतून आर्थिक सहायता घेण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांचे विहित आवेदन पत्र आवश्यक कागदपत्रांसह विद्यार्थी विकास विभाग संचालक यांच्याकडे २ जानेवारी २०२५ पर्यंत प्राचार्य, विभाग प्रमुख, संचालक यांच्यामार्फत सादर करायचे आहेत. अजासोबत आई, वडिलांचे, पालकांचे सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले २०२४-२०२५ वषार्तील उत्पन्नाचे मूळ प्रमाणपत्राची प्राचार्य, विभाग प्रमुखाद्वारे साक्षांकित केलेली प्रत, मागील उत्तीर्ण झालेल्या परीक्षेच्या गुणपत्रिकेची प्राचार्य विभागप्रमुखांद्वारे साक्षांकित केलेली प्रत, आवश्यक प्रमाणपत्रे व पावत्यांच्या प्राचार्य विभाग प्रमुखांद्वारे साक्षांकित केलेल्या झेरॉक्स प्रती तसेच संलग्नित पत्र प्राचार्यांनी आवेदन पत्रासोबत भरून पाठवायचे आहेत.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्री- पीएचडी कोर्सवर्क वेळापत्रक घोषित करण्यात आले आहे. दक्षिण अंबाझरी मार्गावरील सुभाष नगर येथील विद्यापीठाच्या यूजीसी-एचआरडीसी येथे संशोधक विद्यार्थ्यांना ९ ते २१ डिसेंबर दरम्यान कोर्सवर्क पूर्ण करता येणार आहे. नागपूर विद्यापीठाचे २८ जून २०२३ रोजीचे सुधारित मार्गदर्शक तत्वे आणि युजीसी-एमएमटीसीसीच्या २०२३ च्या ३४ दिशानिदेर्शानुसार प्री-पीएचडी कोर्सवर्क वेळापत्रक घोषित करण्यात आले आहे. संशोधक विद्यार्थ्यांना ९ डिसेंबर ते २१ डिसेंबर दरम्यान कोर्सवर्क पूर्ण करता येईल.

कोर्सवर्क करिता विद्यापीठाच्या या संकेतस्थळावर अर्ज उपलब्ध करून देण्यात आला आहे. संपूर्ण भरलेला अर्ज, पीएचडी नोंदणी प्रमाणपत्र, शुल्काचा भरणा केलेली पावती यासह आवश्यक कागदपत्र विद्यापीठाच्या यूजीसी-एचआरडीसी येथे सादर करावे लागणार आहे. प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी प्री-पीएचडी कोर्स वर्क कार्यक्रमाला मान्यता दिली असून संशोधक विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन प्रभारी प्र- कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. संजय कवीश्वर, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. समय बनसोड यांच्यासह अन्य सदस्यांनी केले आहे.

# पती-पत्नीवर जीवघेणा हल्ला

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

जुन्या वैमनस्यातून शेजाऱ्याने पती-पत्नीवर जीवघेणा हल्ला केला. चाकूने वार करून दोघांनाही गंभीर जखमी केले. ही खळबळजनक घटना यशोधरानगर पोलिस ठाण्यांतर्गत घडली. पोलिसांनी गुन्हा नोंदवून आरोपीला अटक केली आहे. विकास उर्फ बाल्या अरुण डोंगरे (40) रा. संजय गांधीनगर, असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. जखमी दाम्पत्य विशाल संभाजी वाघमारे (40) आणि सारिका विशाल वाघमारे (37) यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

विशाल वेल्डर आहेत, तर सारिका एका रुग्णालयात परिचारिका आहे. विशालचे सासरे बाळकृष्णही त्यांच्यासोबतच गांधीनगरात राहतात. शेजारीच बाल्याचे घर आहे. अनेक वर्षांपासून दोन्ही कुटुंबात वाद सुरू आहे. सारिकाचे वडील बाळकृष्ण यांना दारूचे व्यसन असल्याने त्या नेहमी त्यांना फटकारत होत्या. सकाळी 10.30 वाजताच्या सुमारास सारिका कामावरून घरी परतल्या. वडिलांना नशेत पाहून फटकारू लागली. या दरम्यान बाल्याने त्याच्या घरातूनच शिविगाळ सुरू केली. दुपारी विशाल कामावरून परतले असता सारिकाने बाल्याने शिविगाळ केल्याची माहिती दिली. विशालने त्याच्याकडे दुर्लक्ष करण्यास सांगितले.

सायंकाळी 6 वाजताच्या सुमारास विशाल आणि सारिका भासीला सोडायला तिच्या घरी गेले. बाल्याही तेथेच उभा होता.

विशाल आणि सारिका भासीला सोडून घरी जाण्यासाठी वळताच बाल्याने मागून येत विशालच्या मानेवर चाकूने वार केला. वेळीच विशाल खाली वाकले, मात्र चाकूने त्यांचा गाल चिरला. बाल्याने पुन्हा त्यांच्या पोटावर वार केला. यावेळी विशालने त्याचा चाकू पकडला. यात त्यांचा हात जखमी झाला. सारिका यांनी पतीला वाचविण्याचा प्रयत्न केला असता बाल्याने त्यांच्यावरही चाकूने हल्ला करून जखमी केले. आसपासचे लोक गोळा होऊ लागल्यामुळे घाबरून बाल्या पळून गेला. सारिका आणि विशालने घटनेची तक्रार पोलिसात केली. पोलिसांनी घटनास्थळ गाठून दोघांनाही उपचारार्थ मेयो रुग्णालयात दाखल केले. पोलिसांनी खुनाचा प्रयत्नाचा गुन्हा नोंदवून बाल्याला अटक केली.

## १८ वर्षापासून फरार आरोपी गजाआड

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

ठाण्यात नोंद एका प्रकरणात 18 वर्षांपासून फरार आरोपीला पकडण्यात सदर पोलिसांना यश आले आहे. न्यायालयाने त्याला फरार घोषित केले होते. गणेश शिवप्रसाद यादव (60) रा. गड्डीगोदाम असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. 1987 साली गणेशविरुद्ध सदर ठाण्यात मारहाणीचा गुन्हा नोंदविण्यात आला होता. 2006 पर्यंत तो प्रत्येक तारखेवर न्यायालयात हजर झाला, मात्र त्यानंतर तो अचानक गायब झाला.

त्यामुळे न्यायालयाने सीआरपीसीच्या कलम 82 अंतर्गत त्याला फरार घोषित केले होते. गत 18 वर्षांपासून तो पोलिसांना गुंगारा देत फिरत होता. दरम्यान सदर पोलिसांनी फौजदारी प्रकरणात फरार गुन्हेगारांना पकडण्यासाठी एक विशेष मोहीम राबविली.

## डिजीटल अरेस्टच्या माध्यमातून हजार कोटी देशाबाहेर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

सायबर गुन्हेगारीचे जग झपाट्याने वाढत आहे. या जगात सामान्यच काय तर उच्चशिक्षितांचीही कोट्यवधींनी फसवणूक केली जात आहे. सायबर गुन्हेगार दर वेळी नवीन शक्कल लढवितात. अलिकडे डिजीटल अरेस्टच्या माध्यमातून लोकांना त्यांच्या घरातच कैद करून त्यांच्याकडून लाखो रुपये उकळले जात आहेत. डिजीटल अरेस्टच्या माध्यमातून 8 महिन्यात जवळपास एक हजार कोटींच्यावर रक्कम भारताबाहेर गेली आहे. अशी धक्कादायक माहिती सायबर गुन्हे विषयाचे अभ्यासक अ‍ॅड. महेंद्र लिमये यांनी दिली. जनमंचतर्फे धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर येथे आयोजित सायबर गुन्हे : पद्धती आणि सावधगिरी याविषयावर ते मार्गदर्शन करताना बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अ‍ॅड. मनोहर रडके तर प्रमुख पाहुणे म्हणून विठ्ठल जावळकर, प्रल्हाद करसने उपस्थित होते. सायबर गुन्हेगारी विषयी सखोल मार्गदर्शन करताना अ‍ॅड. लिमये म्हणाले की, ऑनलाईन क्षेत्राविषयी सकारात्मक ठासविण्यात आल्याने सामान्य नागरिक विश्वास ठेवण्यास बाध्य होतो. डीजीटलच्या माध्यमातून जे काही घडते ते चांगलेच, असा विश्वास निर्माण झाला आहे. त्यामुळे मोबाईलधारकांचे काहीच गुपीत राहिले नाही. त्यांची वयक्तिक माहिती असूरक्षित आहे. संपूर्ण माहिती विकली जाते. त्याच माहितीच्या आधारे सायबर गुन्हेगार भीती किंवा आमिष दाखवून फसवणूक करतात.

जगातील दोनशे देशांपैकी जवळपास 128 देशांनी डाटा प्रोटेक्शन अ‍ॅक्ट तयार केला आहे. यात श्रीलंका, बांग्लादेशचाही समावेश आहे. मात्र, भारतासारख्या बलाढ्य देशात अजून हा कायदा अंमलात आलेला नाही. त्यासाठी बोडार्चे गठनही झाले नाही. यावेळी उपस्थितांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांची उत्तरेही त्यांनी दिली. संचालन जनमंचचे अध्यक्ष राजीव जगताप यांनी केले.

## ११ ते १५ डिसेंबर दरम्यान विज्ञान मेळावा

**नागपूर** : विद्यार्थ्यांच्या मनातून विज्ञानाची भीती काढून टाकत त्यांना हसत खेळत विज्ञानाची गोडी लावण्यासाठी विज्ञान मेळावा आयोजित केल्या जातो. असोसिएशन फॉर रिसर्च अँड ट्रेनिंग इन बेसिक सायन्स एज्युकेशन आणि नागपूर महानगरपालिकेतर्फे येत्या ११ ते १५ डिसेंबर दरम्यान आयोजित अपूर्व विज्ञान मेळाव्याला राष्ट्रभाषा भवन संकुलात सुरूवात होणार आहे. विज्ञान मेळाव्याला केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी १४ डिसेंबर रोजी भेट देणार असल्याची माहिती सुरेश यांनी दिली आहे. अपूर्व विज्ञान मेळाव्याची तयारी जवळपास पूर्ण झाली असून वैज्ञानिक प्रयोगांमधली गंमत आणि तो विषय समजावून सांगण्यासाठी या मेळाव्यात विशेष लक्ष दिल्या जाणार आहे.

विज्ञानाच्या विद्यार्थ्यांसाठी ही अनोखी पर्वणी असून त्याद्वारे मुलांना विज्ञानाची गुंतागुंत सहज समजू शकते. मूलभूत विज्ञानाचा उद्देश मुलांमध्ये विचार करण्याची सवय आणि समजून घेण्याची विकसित करणे हा आहे. यामध्ये होणारे सर्व प्रयोग आठवी ते दहावीच्या अभ्यासक्रमावर आधारित असतील.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या त्रिसूत्रीवर आधारित राज्यघटना देशाला अर्पण केली : डॉ. नितीन राऊत

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :



भारतीय घटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आज महाराष्ट्र राज्याचे माजीमंत्री आणि उत्तर नागपूरचे आमदार डॉ. नितीन राऊत यांनी नागपूर येथील संविधान चौकातील डॉ. बाबासाहेब यांच्या प्रतिमेला आणि बेझनबाग येथील जनसंपर्क कार्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी बोलतांना आधुनिक भारताचे शिल्पकार, बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या त्रिसूत्रीवर आधारित राज्यघटना देशाला अर्पण केली असल्याचे डॉ. राऊत म्हणालेत. महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रला उपस्थित नागरिकांना संबोधित करतांना डॉ. राऊत म्हणालेत की, आधुनिक भारताचे शिल्पकार, बोधिसत्व, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समता, स्वातंत्र्य, बंधुता या त्रिसूत्रीवर आधारित राज्यघटना अर्पण केली. त्यामुळेच आज आपल्या देशाची ओळख जगातील एक महान लोकशाहीवादी देश अशी आहे परंतु बाबासाहेबांना हवी असलेली लोकशाही सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय जीवनात अंगीकारली जाते का, हाही एक आत्मचिंतन करायला भाग पाडणारा प्रश्न डॉ. राऊत यांनी उपस्थित केला. यावेळी डॉ. राऊत यांनी संविधान चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच इंदोरा मित्र परिवार तर्फे आयोजित रक्तदान शिबिराला डॉ. राऊत यांनी भेट दिली.

प्रसंगी बंडोपंत टेंभुर्णे, संजय दुबे, हरिभाऊ किरपाने, सुरेश पाटील, दीपक खोब्रागडे, अभिषेक शंभरकर, संतोष लोणारे, दिनेश यादव, सतीश पाली, कल्पना द्रोणकर, बेबीताई गौरिकर, सचिन वासनिक, शारदा वासनिक, नूरमोहम्मद बक्षी सचिन डोहाने, शहिदा खान, नितीन सदावर्ते प्रशांत पाईक, तुलसीदास मोहाडीकर, प्रणय भणारकर सह काँग्रेस पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, कार्येकर्ते आणि उपस्थित होते.

## ४ गुंडांना सिनेस्टाईल अटक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

दरोड्याच्या तयारीत असलेल्या गुंडांच्या टोळीला हुडकेश्वर पोलिसांनी सिनेस्टाईल अटक केली. जवळपास 3 किलोमीटरपर्यंत पाठलाग करीत पोलिसांनी त्यांच्या मुसक्या आवळल्या. मात्र एक आरोपी पळून जाण्यात यशस्वी झाला. झडतीमध्ये पोलिसांना त्यांच्याजवळ पिस्तूल, काडतूस आणि चाकूसह दरोड्यासाठी वापरात येणारे साहित्य मिळाले. अमूल सतीश वाल्दे (34) रा. गड्डीगोदाम, अतुल हिरालाल वर्मा (29) रा. रिवा, मध्यप्रदेश, रोहित तोतन घोष (24) रा. शीलानगर झोपडपट्टी आणि आदेश अंकुश मेश्राम (22) रा. पिटेसूर, गोरेवाडा अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. त्यांचा फरार साथीदार क्षत्रसिंह उर्फ राज डीके रा. रिवा याचा शोध सुरू आहे. शुक्रवारी रात्री हुडकेश्वर पोलिसांचे डीबी पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. पहाटे 4 वाजताच्या सुमारास पोलिसांना नवीन सुभेदारच्या ठवरे कॉलनीत अमूल वाल्दे मोटारसायकलवर संशयास्पदरित्या जाताना दिसला. त्याच्या मोटारसायकलच्या नंबर प्लेटवर काळा टेप चिटकवलेला होता. पोलिसांना त्याच्यावर संशय आला. त्याला थांबवून झडती घेतली असता चाकू मिळाला. या दरम्यान काही अंतरावर लपून बसलेले त्याचे चार साथीदार एका मोटारसायकलवर बसून पळताना दिसले. त्यांच्या मोटारसायकलच्या नंबर प्लेटवरही काळा टेप चिटकलेला होता. पोलिसांनी त्यांचा पाठलाग सुरू केला. आरोपी म्हाळगीनगर रिंगरोडने दिघोरी पुलावरून खरबीच्या दिशेने पळत होते. खरबी चौकाजवळ अचानक आरोपींचे वाहन अनियंत्रित झाले आणि दुभाजकावर जाऊन धडकले. या दरम्यान क्षत्रसिंह अंधारात फरार होण्यात यशस्वी झाला. मात्र इतर तिघे जखमी झाल्यामुळे पळून जाऊ शकले नाही आणि पोलिसांच्या हाती लागले. झडतीमध्ये अतुल वर्माजवळ पोलिसांना पिस्तूल आणि दोन जीवंत काडतूस मिळाले. इतर दोन आरोपींकडेही चाकू, दोरी, तिखट, पेचकस आदी साहित्य आढळले. आरोपी पूर्ण तयारीनिशी कुठेतरी दरोडा टाकण्याच्या तयारी असल्याचा संशय पोलिसांना आहे. त्यांनी पोलिसांपासून वाचण्यासाठी वाहनाच्या नंबर प्लेटवर टेपही चिटकवला होता. अटकेतील चारही आरोपींना न्यायालयात हजर करून पोलिस कोठडी घेण्यात आली आहे. आरोपींकडून इतरही गुन्ह्यांचा खुलासा होण्याची शक्यता आहे.

## कीर्तन- प्रवचन हे ज्ञानवर्धन, संस्काराचे साधन : भैय्याजी जोशी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

कीर्तन, प्रवचन हे काही मनोरंजनाचे साधन नाही. ज्ञानवर्धनाचे, संस्काराचे साधन आहे, असे प्रतिपादन रा.स्व.संघाचे अ.भा. कार्यकारिणी सदस्य भय्याजी जोशी यांनी आज येथे संवेदना परिवार व पश्चिम नागपूर नागरिक संघ यांच्या संयुक्तविद्यमाने आयोजित कीर्तन महोत्सवात ते बोलत होते. त्यांच्यासह बैद्यनाथचे सुरेश शर्मा, श्री नरकेसरी प्रकाशन लिमिटेडचे प्रबंध संचालक धनंजय बापट, प्रख्यात अस्थिरोग तज्ञ डॉ. संजीव चौधरी, पोलिस अधीक्षक नरूल हसन, ताजबाग ट्रस्टचे अध्यक्ष प्यारे खान, संजय नरड, उद्योजक सारंग गडकरी, आदित्य-अनघाच्या अनघा कुणाल नरसापूरकर, रवी वाघमारे व्यासपीठावर उपस्थित होते.



भय्याजी जोशी म्हणाले की, कीर्तन ही भारतामधील एक प्राचीन विधा राहिलेली आहे. कीर्तन व प्रवचनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन, ही परंपरेने होत आलेली गोष्ट आहे. पूर्वी एवढी प्रचार-प्रसाराची माध्यमे नव्हती. त्यामुळे कथाकार, प्रवचनकार, कीर्तनकार हे गावोगावी जाऊन आपल्या धर्माबद्दल, आपल्या संस्कृतीबद्दल, आपल्या जीवनाच्या जनजागरणाचे काम करायचे. इतिहास व पुराणांच्या आधारावर योग्य प्रसंग निवडून ते लोकांसमोर मांडत. आपल्या देशात सर्वस्व अर्पण करणारे अनेक क्रांतिकारक समाज सुधारक झाले. त्यांचा आदर्श घेऊन आपणही त्यांच्या कायार्चा भाग होऊन सहभागी व्हावे, असे भय्याजी जोशी म्हणाले. भय्याजी जोशी यांच्या हस्ते डॉ. संजीव चौधरी, धनंजय बापट यांचा पराग जोशी हस्ते सत्कार करण्यात आला.

## कुटुंब व्यवस्थेमुळेच टिकले भारताचे अस्तित्व : डॉ. वृषाली जोशी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

मनुष्य निमार्णाचे प्रमुख केंद्र कुटुंबच होय. कुटुंबानेच धमार्चे, संस्कृतीचे, मूल्यांचे अस्तित्व टिकविले आहे. कुटुंबव्यवस्था हाच भारतीय समाजाचा मूळ आधार आहे. एक- दोन आक्रमणातच बॅबिलोन, रोमन, ग्रीक इत्यादी प्राचीन संस्कृती पार नष्ट झाल्या. मात्र, भारतावर १८०० बाह्य आक्रमणे होऊनही भारतीय संस्कृती जिवंत राहिली. हिंदुस्थान' म्हणून भारताचे अस्तित्व टिकून राहिले. याचे एक प्रमुख कारण म्हणजे भारतीयांनी निर्माण केलेली स्थिर कुटुंबव्यवस्था होय, असे ठाम प्रतिपादन विश्वमांगल्य सभेच्या अखिल भारतीय संघटनमंत्री डॉ. वृषाली जोशी यांनी केले. उत्तर अंबाझरी मार्ग, सीताबर्डी येथील सेवासदन शिक्षण संस्था परिसरातील डॉ. वसंतराव वांकर व डॉ. कुसुमताई वांकर पुरस्कृत ३९ व्या रमाबाई रानडे स्मृती व्याख्यानमालेचे द्वितीय पुष्प गुंफताना त्या बोलत होत्या.

ह्यपरिवार व्यवस्थ समाजाचा मूळ आधार' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान इन्डोहर्बलच्या प्रोप्रायटर शची मलिक यांनी भूषविले. यावेळी व्यासपीठावर सेवासदन शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष कांचन गडकरी, सचिव वासंती भागवत होत्या. आपल्या अतिशय ओजस्वी आणि अभ्यासपूर्ण भाषणात डॉ. वृषाली जोशी यांनी भारतीय संस्कृतीचे, मूल्यव्यवस्थेचे विविध पदर उलगडून दाखविले. त्या म्हणाल्या, या देशातील कुटुंब व्यवस्थेबरोबरच संत परंपरेने, गुरू-शिष्य परंपरेने देशाच्या संस्कृतीचे, मूल्यांचे रक्षण केले आहे. भारताची सांस्कृतिक, आध्यात्मिक मूल्ये एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडून सातत्याने हस्तांतरित होत राहिली.

## जागतिक दिव्यांग दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन

**नागपूर** : समेतिक क्षेत्रीय कौशल्य विकास ,पूनर्वास एवं दिव्यांगजन सशक्तीकरण केंद्र नागपूर द्वारा "जागतिक दिव्यांग दिनानिमित्त" दि 5 डिसेंबर 2024 रोजी गुरुनानक भवन, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, अंबाझरी बायपास रोड नागपूर येथे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख अतिथी म्हणून सिनेट मेंबर, दिनेश शेराम, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, डॉ. संयुक्ता थोरात विभाग प्रमुख ललित कला विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, मुख्याध्यापिका मिनल सांगोळे, मुक बधीर विद्यालय, शंकरनगर प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना दिनेश शेराम म्हणाले की, विशेष गरजा असणाऱ्या मुलांसाठी आणि पालकांसाठी क्रीडा आणि सांस्कृतिक कार्यक्रम द्वारा आयोजित करून सर्व क्षेत्रात विशेष गरजा असलेल्या मुलांचे हक्क, याबद्दल जागरूकता निर्माण करणे.

# भारतातील पहिल्या अनुभवाधारित बायोगॅस मास्टरी प्रोग्राम पुण्यात यशस्वीरित्या संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

शिवाजीनगर येथील सेंट्युरियन हॉटेलमध्ये बेस्टेको सोल्युशन्स अँड टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेडतर्फे दोन दिवसीय अल्टिमेट बायोगॅस मास्टरी प्रोग्रामचे आयोजन करण्यात आले. बायोगॅस क्षेत्रावर आधारित हा जगातील पहिलाच अनुभवाधारित शिक्षण कार्यक्रम ठरला.

संशोधन संस्थांपासून ते उद्योग आणि गुंतवणूकदारांपर्यंत विविध क्षेत्रातील सहभागाची नोंद झाली. या कार्यक्रमाचा उद्देश नूतनीकरणीय व शाश्वत ऊर्जा क्षेत्रातील बायोगॅस आणि बायोएनर्जीर्ला प्रोत्साहन देणाऱ्या सरकारी उपक्रमांना साथ देणे हा होता. हा केवळ प्रशिक्षण कार्यक्रम नसून बायोएनर्जीच्या क्षेत्रातील एक सखोल अनुभवात्मक प्रवास होता. सहभागींच्या व्यावहारिक कौशल्यात भर घालणाऱ्या ह्या कार्यक्रमामध्ये बायोगॅस प्रणाली, डायजेस्टर्स, सब्स्ट्रेट्स आणि प्रकल्प व्यवस्थापन याबद्दल सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. डॉ.अशिष पोलकडे, ज्यांना बायोगॅस प्रणाली व कचरा व्यवस्थापनाच्या जैविक प्रक्रियांमध्ये २४ वर्षांचा अनुभव आहे, यांनी कार्यक्रमाचे नेतृत्व केले. त्यांच्या सखोल ज्ञानाने सहभागींचे मार्गदर्शन केले. तसेच, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक आणि मानसशास्त्रज्ञ सूरज भगत यांनी कार्यक्रमात सहभागींना प्रोत्साहन देणाऱ्या सत्रांचे आयोजन केले.




बायोगॅस आणि बायोएनर्जी उपक्रमांमध्ये सरकारी सहभाग वाढवण्याच्या कंपनीच्या उद्दिष्टाशी हे सुसंगत आहे. ऊर्जा स्वावलंबी भारत घडविण्याच्या दृष्टिकोनातून, अल्टिमेट बायोगॅस मास्टरी प्रोग्राम नूतनीकरणीय ऊर्जा क्षेत्रातील नावीन्यपूर्ण शिक्षणाचा एक दीपस्तंभ ठरत आहे. असे कार्यक्रमाचे विशेष अतिथी समाजसेवक डॉ.निखिल भुते यांनी सांगितले व संपूर्ण कार्यक्रमात उपस्थित राहून त्याच्या प्रभावाने प्रभावित होऊन पुढील कार्यक्रम नागपूरमध्ये आयोजित करण्याची घोषणा केली.

डॉ.तुषार लोडा (पुणे), डॉ.निखिल भुते (नागपूर), संयोगिता बेरडे (पुणे), परामजित सरोज (लखनऊ), निमिशा फरन्यानडीस (गोवा), दुवा गोखले (पुणे), प्रियदर्शनी सहस्त्रबुद्धे (पुणे), श्रीपाल कोठारी (यवतमाळ), पृथ्वीराज रायगुडे(पुणे), सहभागींनी या कार्यक्रमाचा उत्साहाने गौरव केला. अनेकांनी हा कार्यक्रम परिवर्तनात्मक असल्याचे म्हटले. ह्या कार्यक्रमाने व्यावसायिक कौशल्यांना चालना देणारे व्यावहारिक दृष्टिकोन दिले,ह्रअसे एका सहभागीने सांगितले. कार्यक्रमातील सहभागींना सन्मानपत्र व संपूर्ण कार्यक्रमाची किट आणि एन्व्हायरमेंट लीडर्स क्लब चे विनामूल्य सदस्य पत्र कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता अश्विन हरिभक्त, साक्षी कोटकर, सुहाग रेनारे यांनी परिश्रम घेतले.

# बसपा द्वारे संत जगनाडे जयंती साजरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :



संत शिरोमणी जगनाडे महाराज यांची 400 वी जयंती बसपाच्या कही हम भूल न जाये या राष्ट्रीय अभियान अंतर्गत आज महाराष्ट्र प्रदेश बसपाचे मीडिया प्रभारी उत्तम शेवडे, नागपूर जिल्हा प्रभारी राजकुमार बोरकर, नागपूर जिल्हा महासचिव चंद्रशेखर कांबळे, जिल्हा सचिव अभिलेश वाहाने, विजय हटवार, महिला नेत्या तनुजा गजभिये, नयना झाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत नंदनवन च्या संत जगनाडे चौकातील संताजीच्या पुतळ्याला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले.

संत तुकाराम यांनी अभंगाच्या माध्यमातून वैज्ञानिक दृष्टीकोण रुजविणारे साहित्य निर्माण केल्याने प्रस्थापित सवर्णांनी त्यांचा खून करून त्यांचे ते सर्व साहित्य इंद्रायणी नदीत बुडविले होते. परंतु संत तुकारामांचा शिष्य असलेल्या संत जगनाडे यांनी तुकाराम महाराजांचे ते अभंगरुपी संपूर्ण साहित्य स्वतः लिहून काढलेत. त्या साहित्याला पुन्हा पुनर्जीवन मिळाल्याने नदीत बुडलेले साहित्य वर आल्याचे प्रस्थापित इतिहासकारांनी खोटे सांगितले.

या प्रतिभाषाली महापुरुषाला एका जातीपुरते मर्यादित करण्याचा प्रयत्न केला अशा प्रकारची माहिती याप्रसंगी बसपा नेते उत्तम शेवडे यांनी उपस्थितांना दिली.

याप्रसंगी प्रामुख्याने पूर्व नागपूरचे अध्यक्ष एड मुकेश मेश्राम, धम्मपाल गोंगले, मध्य नागपूरचे अध्यक्ष विलास पाटील, मिलिंद गजभिये, प्रवीण पाटील, पश्चिमचे अध्यक्ष अंकित थुल, दक्षिणचे प्रभारी नितीन वंजारी, दक्षिण पश्चिमचे आदि प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **JAMILA BEGUM.** NOW MY NEW NAME IS **JAMILA AJIT CHHAWARE.** **ADD.** : TILAK WARD, RAMTEK NAGPUR 441106.

# शेवटी शिंदेंना माघार का घ्यावी लागली?



**आम्ही नाही जा, आम्ही नाही जा असा लटका राग धरून, हो नाही, हो नाही करत करत उपमुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदेंनी मंत्रिमंडळात सहभाग घेऊन टाकला. तसे ते होणारच होते. तथापि, आपले मूल्य वाढवून घेण्याचा प्रयत्न त्यांनी करून पाहिला. पण हिंदुत्वासाठी शिवसेनेतून बाहेर पडलेले शिंदे, अजितदादांना वैतागून महाविकास आघाडीतून बाहेर पडलेले शिंदे व काल परवा सर्वांनी पाहिलेली शिंदे यात जमीन आसमानचा फरक होता. कारण मला हे पाहिजे, मला ते पाहिजे असा त्यांचा बालहट्ट महाराष्ट्रने पाहिला. एक तर त्यांना स्वतःला गृह खाते पाहिजे होते; तर दुसऱ्या बाजूला अजितदादांना अर्थ खाते देऊ नये, ही देखील त्यांची मागणी होती. त्याचाच परिणाम म्हणून शपथविधीच्या आधी तीन तासापर्यंत ते रुसून बसले होते असे म्हणतात. परंतु एकूणच राजकीय परिस्थिती पाहता त्यांना माघार घ्यावीच लागली.**

अडीच वर्षांपासून महाराष्ट्रात महायुतीचीच सत्ता आहे आणि आता येथूनपुढे फरक इतकाच असणार आहे की, एक उप 'मुख्य' झाला आणि एक मुख्य 'उप' झाला आहेत, याव्यक्तिरिक्त काहीही झालेलं नाही. अडीच वर्ष देवेंद्र फडणवीसच गृहमंत्री होते, तेव्हाही त्यांच्याच हातात पोलीस यंत्रणा होती. त्यामुळे देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्यामुळे लोक त्यांना विरोध करायला घाबरतील, सोशल मीडियावर कोणीही आवाज उठवणार नाही हे गोड गैरसमज भाजपच्या कार्यकर्त्यांनी मनातून काढून टाकावे. सरकारच्या चुकीच्या धोरणांना विरोध होणारच. कितीही सत्तेचा गैरवापर केला तरी पाच वर्ष हा संघर्ष सुरूच राहणार यात दुमत नाही. एक मात्र खरं की, शिंदेंनी मुख्यमंत्री पद सोडल्यानंतर शिंदेंवर प्रेम करणारे ना कोणते कार्यकर्ते रडले, ना आमदार नाराज झाले. कारण हे सारे जमले होते प्रत्येकाच्या स्वार्थासाठी. ना कोणत्या भावना, ना कोणतं प्रेम. शिंदेंनी शिवसेना सोडतांनाच 'भावनिकता' हा विषय राजकारणातून संपवून टाकला होता. त्याच प्रसंगाला त्यांना सामोरे जावे लागले. थोडक्यात शिंदेंचा पुढचा राजकीय प्रवासही पुर्णपणे भाजपच्या खांद्यावर राहणार आहे.

भाजपला हवे तसं आणि हवे तेव्हा ते काहीही करू शकतात. एकनाथ शिंदेंनी नाईलाजास्तव मुख्यमंत्री पदाच्या शर्यतीतून बिनशर्त माघार घेतली व मिळेल ते पदरात पाडून घेण्याचा कटू निर्णय त्यांना घ्यावाच लागला. त्यासाठी अजितदादा गटाच्या हसन मुश्रीफ नावाच्या एका मंत्र्याला 'ईडी'ने पुन्हा दणका देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे 'पुढच्याच ठेच मागचा शहाणा' या म्हणीप्रमाणे एकनाथ शिंदेंना सावध व्हावेच लागले. आजही त्यांचे जे काही मंत्री घ्यायचे आहे, ते देवेंद्र फडणवीस यांच्या सल्ल्यानेच घ्यावे लागतील. अन्यथा हुकमी एक्के फडणविसांच्याच ताब्यात आहे.

अजितदादा त्याबाबतीत अतिशय हुशार निघाले. 'जे द्यायचं ते द्या, मला तुमच्यापुढे जायचं नाही' असे सांगून मोकळे झाले. त्याचाच एक चांगला परिणाम म्हणजे हजारो कोटी रुपयांची यांचे प्रॉपर्टी 'मोकळी' करण्यात आली. दादांना जे पाहिजे होतं ते त्यामुळे आपोआप मिळून गेले. या सर्व घडामोडीत उपमुख्यमंत्री पदाचा सहा वेळेचा 'जागतिक विक्रम' आता त्यांच्याच नावावर होण्याची शक्यता आहे. तशीही भाजपला एकनाथ शिंदेंच्या पाठींब्याची मुळीच गरज उरलेली नव्हती. तथापि, प्रयत्न करायला काय हरकत आहे? या हेतूने एकनाथ शिंदेंनी दिल्ली हलवून पाहिली. परंतु भाजप काय आहे, याचा अजूनही त्यांना अंदाज आलेला दिसत नाही.

भाजपचे १०५ आमदार असतानाही शिंदेंना ४० आमदारांच्या पाठींब्याने मुख्यमंत्री पद दिले. त्यामुळे शिंदेंच्या देखील डोक्यात हवा गेली होती. आता आपण पुन्हा मुख्यमंत्री होऊ असे त्यांना वाटत होते. परंतु भाजपच्या खेळीमध्ये ते पूर्णपणे फसले व त्यांना माघार घेण्याशिवाय पर्याय राहिला नाही. ज्या शिवसेनेने त्यांना एवढे प्रेम दिले, विविध प्रकारची पदं दिली व गेली वीस वर्षे आमदारकी, मंत्रीपद दिले, मुलाला दोनदा खासदारकी दिली, त्या शिवसेनेचे ते झाले नाही तर आपले कधी होणार? याचा भाजपला अंदाज होताच. परंतु ते संधीची वाट पाहत होते. एकनाथ शिंदे यांना शिवसेना व धनुष्यबाण मिळवून देण्यात भाजपचा सिंहाचा वाटा आहे. कारण सर्व सूत्रे दिल्लीहून फिरत होती. त्यामुळे शिंदेंना अजून काय हवे? या निवडणूकीतील ५७ जागांच्या बदल्यात त्यांना पुन्हा मुख्यमंत्री पदाची स्वप्नं पडू लागली होती. त्यांचे 'पंटर' देखील शिंदेच मुख्यमंत्री होणार असा गाजावाजा करत होते. 'नकली' नाराजीचे नाट्य देखील रंगविण्यात आले.



थर्ड अम्पायर
जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

परंतु भाजप सत्तेच्या अति जवळ पोहोचल्याने त्यांनी भिक घातली नाही व महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद स्वतःच्या ताब्यात घेऊन मोकळे झाले.

भाजपचे १३२ व ५ अपक्षांचा पाठींबा मिळून १३७ आमदार आहेत. बहुमतासाठी १४५ आमदार हवेत. याचाच अर्थ आठ आमदार सत्तेसाठी कमी पडतात. याशिवाय अजितदादा व एकनाथ शिंदे यांच्या गटाकडून विजयी झालेले सतरा जण भाजपचेच आहेत. हे सर्वजण कोणत्याहीक्षणी देवेंद्र फडणवीस यांच्या मागे उभे राहण्याची शक्यता आहे. या सर्व गोष्टींचा अंदाज शिंदेंना का नसावा? त्यातच अजितदादांच्या ४१ आमदारांची भर पडून १७८ संख्याबळ पूर्ण झाले होते. त्यामुळे आता भाजप पुढे आपला टिकाव लागणार नाही, याचा त्यांना अंदाज आला. विशेष म्हणजे अजितदादांनी अति शहाण्याची भूमिका घेऊन 'सरेंडर' होणे पसंत केले व चुपचाप सत्तेत सहभाग करून घेतला. मुळातच 'मी मुख्यमंत्री पदाचा दावा करत नाही' असे जाहीर करताना शिंदेंना प्रचंड यातना झाल्या असतील. म्हणूनच भाजपचे वरिष्ठ नेते जो निर्णय घेतील, तो आमच्यासाठी अंतिम असेल असे त्यांनी सांगून टाकले. महाराष्ट्रातील शिवसेनेच्या एकाही नेत्याने यापूर्वी 'दिल्ली जो निर्णय घेईल तो आम्हाला मान्य राहील' असे वक्तव्य केले नव्हते. त्यामुळे आता ही कायमचीच 'गुलामगिरी' एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला स्वीकारावी लागणार, याचे स्पष्ट संकेत मिळाले आहे.

आपल्याला महाराष्ट्रातील सर्वोच्च पद मिळत नसेल, तर आपल्या मुलाला उपमुख्यमंत्री पद मिळवण्यासाठी हालचाली त्यांनी करून पाहिल्या. परंतु दिल्लीतून नकारघंटा आल्यानंतर 'अशी मागणी नव्हतीच' असे त्यांना जाहीर करावे लागले. सत्ता व पदाच्या मोहापायी सर्व प्रयत्न एकनाथ शिंदे यांनी करून पाहिले. परंतु त्यांच्याजवळ 'बार्गेनिंग पॉवर'च नसल्याने त्यांना माघार घेतल्याशिवाय पर्याय नव्हता. त्यातच अजितदादांनी पहिल्याच दिवशी भाजपला पाठिंबा देऊन त्यांची कोंडी केली होती. अर्थात गेल्या दहा-बारा दिवसांपासून राज्यातील राजकीय घडामोडींमुळे सर्वसामान्य जनतेमध्ये देखील विविध प्रकारची चर्चा सुरू झाली होती. निवडणुकीपूर्वी होणारी आघाडी किंवा महायुती आणि ती मोडून निवडणुकीनंतर होणारी आघाडी किंवा युती यासाठी कोणताच कायदा देशात नाही. यासंदर्भात एखादा स्पष्ट कायदा असायला हवा. केवळ असा कायदा नसल्याने काँग्रेस व इतर पक्षांनी केली नसेल, इतकी मोडतोड आणि नवीन जोड करून भाजपने मागील दहा वर्षात भारतातील विविध राज्यात सरकारे स्थापन केलीत. सध्या केंद्रातील सरकार तसेच निवडणुकीनंतर युती करून स्थापन झालेले आहे. त्यामुळे नवीन काहीही गठबंधन, आघाडी, युती होऊ शकणे यालाच राजकारण म्हणणे सुरु झाले. कायदाच नसल्याने निवडणुकीनंतर झालेल्या युती किंवा आघाडीला बेकायदेशीर म्हणता येत नाही. पण ज्यापद्धतीने एकनाथ शिंदे यांनी शिवसेना पक्ष पळवला, भाजप व निवडणूक आयोगाच्या मदतीने शिवसेना हे नाव व धनुष्यबाण हे चिन्ह ताब्यात घेतले. तोच उद्योग अजितदादांनी राष्ट्रवादी सोबत केला. हा सर्व प्रकार बेकायदेशीरच नाही, तर घटनाबाह्य ठरतो. पण त्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर राजकारण घडते व त्याचा परिणाम एखाद्याच्या राजकीय करिअरवर देखील होत असतो. अर्थात राजकारणात कुणीच संपत नसतो, प्रत्येकाची वेळ यावी लागते. परंतु संधीच सोनं करणं ज्याला जमेल तो विजयाचा शिल्पकार, अशीच काहीशी परिस्थिती आज महायुतीच्या विजयाच्या गणितांची आहे!

महाराष्ट्रनामा

# देवाभाऊ, लयं भारी...



सुकृत खांडेकर
०९५९४२२४०००
sukritforyou@gmail.com

दि. ५ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी ५.३० वाजता अथांग जनसागराच्या साक्षीने मुंबईतील ऐतिहासिक आझाद मैदानावर महायुतीच्या नव्या सरकारचा शपथविधी सोहळा शानदारपणे संपन्न झाला. देवेंद्र सरिता गंगाधरराव फडणवीस यांनी राज्याचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून आणि एकनाथ गंगुबाई संभाजीराव शिंदे व अजित आशाताई अनंतराव पवार या दोन्ही नेत्यांनी उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा तसेच डझनभर केंद्रीयमंत्री, भाजपाच्या विविध राज्यांचे मुख्यमंत्री, राजकारणी, सिनेसृष्टीतील व कॉर्पोरेट क्षेत्रातील नामवंतांच्या उपस्थितीत दृष्ट लागण्यासारखा हा सोहळा देशातील कोट्यवधी जनतेने चित्रवाणीच्या पडद्यावरून पाहिला. देशातील अन्य राज्यांच्या मुख्यमंत्र्यांपेक्षा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाला जे विशेष महत्त्व आणि करिष्मा आहे त्याची तुलना अन्य राज्यांशी होऊच शकत नाही. देशाची आर्थिक राजधानी महाराष्ट्रात आहे, देशाचे ग्लॅमर असणारे बॉलिवूड महाराष्ट्रातच आहे. देशातील सर्व नामवंत दिग्गज राजकारण्याची, उद्योगपतींची नि सेलिब्रेटींची निवासस्थाने याच मुंबापुरीत आहेत. देशाची सर्वात मोठी आर्थिक उलाढाल व सर्वात मोठे आर्थिक व्यवहार याच राज्यातून होत असतात. अशा राज्याचे मुख्यमंत्री म्हणून तिसऱ्यांदा शपथ घेण्याचे भाग्य देवेंद्र फडणवीस या भाजपाच्या एकमेव नेत्याला लाभले आहे.

सन २०१४मध्ये देशात मोदी लाटेने मोठा चमत्कार घडवला. केंद्रात जशी भाजपाची सत्ता आली तसे महाराष्ट्रातही देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले. सलग पाच वर्षे मुख्यमंत्रीपदाचा काळ पूर्ण केलेले फडणवीस हे वसंतराव नाईक यांच्यानंतरचे राज्यात दुसरे मुख्यमंत्री ठरले. २०१९ च्या निवडणुकीत देवेंद्र यांनी, मी पुन्हा येईन, अशी घोषणा दिली होती. पण नियतीच्या मनात वेगळेच होते. २०१९ ला भाजपा-शिवसेनायुतीला सरकार स्थापनेचा जनादेश मिळाला होता. भाजपाचे सर्वाधिक १०५ आमदार निवडून आले होते. पण उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपदासाठी काँग्रेस-राष्ट्रवादीकाँग्रेसबरोबर घरोबा केला आणि सर्वाधिक आमदार असूनही भाजपाला मुख्यमंत्रीपदाने हुलकावणी दिली.

उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत विरोधी पक्षनेता म्हणून भूमिका बजावली. रोज सरकारला धडकी भरवणारी त्यांनी भाषणे केली. तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुख व दुसरे मंत्री नवाब मलिक यांच्यावर काय पाळी आली हे सर्व महाराष्ट्राने पाहिले आहेच. सचिन वाझे हे कुठे आहेत हे वेगळे सांगायची गरज नाही. विरोधी पक्षांत असताना देवेंद्र हे एकीकडे महाआघाडी सरकारच्या अकार्यक्षमतेचे ते वाभाडे काढत होते व दुसरीकडे कुटनिती यशस्वी राबवून ठाकरे सरकार कसे अस्थिर केले, ते उद्धव यांना समजलेच नाही.

जून २०२२ मध्ये ठाकरेंच्या शिवसेनेत एकनाथ शिंदे यांनी चाळीस आमदारांसह बंडाचा झेंडा फडकवला व भाजपा श्रेष्ठींनी शिंदे यांच्या गळ्यात मुख्यमंत्रीपदाची माळ घातली. तेव्हाही देवेंद्र यांची मुख्यमंत्रीपदाची संधी हुकली. खरे तर देवेंद्र यांना शिंदे यांच्या सरकारमध्ये जाण्याची इच्छा नव्हती. पण अमित शहा आणि नड्डांचा फोन येताच त्यांना पक्षाच्या आदेशाचे पालन करावे लागले.

पाच वर्षे मुख्यमंत्रीपदावर राहिलेल्या देवेंद्र यांनी एकनाथ शिंदे यांच्या सरकारमध्ये इच्छा नसतानाही उपमुख्यमंत्रीपद स्वीकारले. तेव्हा विरोधी पक्षाने त्यांच्यावर यथेच्छ टीकाटीप्पणीही केली. राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा व राज्याचे चार वेळा मुख्यमंत्री राहिलेल्या शरद पवारांनी, मुख्यमंत्रीपदावर राहिलेल्या व्यक्तीने उपमुख्यमंत्रीपद स्वीकारणे यात चुकीचे काही नाही, असे तेव्हा भाष्य केले. मात्र उपमुख्यमंत्रीपदावर राहिलेली व्यक्ती पुढे कधी मुख्यमंत्री झाली नाही अशीही त्याला पुष्टी जोडली. राज्यात नाशिकराव तिरपुडे, रामराव आदिक, छगन भुजबळ, विजयसिंह मोहिते-पाटील, आर. आर. पाटील असे अनेक उपमुख्यमंत्री होऊन गेले, पण ते पुढे कधी मुख्यमंत्री झाले नाहीत हे वास्तव आहे. पण देवेंद्र यांनी पवारांचे भाष्य खोटे ठरवले व एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारमध्ये अडीच वर्षे उपमुख्यमंत्री म्हणून काम केल्यानंतर देवेंद्र फडणवीसांनी राज्याचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून ५ डिसेंबरला शपथ घेतली.

उपमुख्यमंत्री म्हणून काम करीत असतानाही, विरोधी पक्षांतील नेत्यांनी फडणवीसांची, मी पुन्हा येईल या घोषणेवरून भरपूर टवाळी केली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका ज्येष्ठ नेत्याने तर फौजदाराचा हवालदार झाला, अशा शब्दांत फडणवीसांची खिल्ली उडवली होती. पण देवेंद्र यांनी सर्व सहन केले. आपला संयम सोडला नाही. मी पुन्हा येईल ही घोषणा त्यांनी दि. ५ डिसेंबर २०२४ला सत्यात उतरवून दाखवली. आज भाजपाकडे १३२ आमदार आहेत. शिवाय ५ आमदारांचे समर्थन आहे. गेली पाच वर्षे देवेंद्र यांनी बराच त्याग केला, खूप काही सहन केले. मतदारांचा जनादेश व मोदी-शहांचा आशीर्वाद ही देवेंद्र यांची मोठी जमेची बाजू ठरली.

सन २०१९ च्या विधानसभा निकालानंतर ठाकरे व फडणवीस यांच्यात संवाद होत नव्हता हे आता उघड होत आहे. सन २०१४ ते २०१९ या पाच वर्षांच्या काळात देवेंद्र हे मुख्यमंत्री असताना उद्धव ठाकरे यांचा सन्मान करीत होते. त्यांच्या शब्दाचा आदर करीत होते. मुंबई महापालिका निवडणुकीनंतरही महापौरपद भाजपाने खुल्या दिल्याने शिवसेनेला दिले. मग २०१९ च्या विधानसभा निकालानंतर ठाकरे यांनी फडणीसांचे फोन घेणेही थांबवले होते हे गूढ होते. देवेंद्र यांनी त्यांना अनेकदा फोन केला पण नंतर करा, मग करा, अशी उत्तरे दिली जात होती. ठाकरे आपला फोनही घेण्याचे टाळतात हे लक्षात आल्यापासून फडणवीस दुखावले गेले व नंतर कटुता वाढत गेली.

सन २०१९ मध्ये विधानसभा निकालानंतर शरद पवारांनी ठाकरेंना आपल्याकडे खेचून भाजपाला सरकार बनवू दिले नव्हते. २०२२ मध्ये शिवसेनेत भाजपाच्या महाशक्तीने बंड घडवून ठाकरे यांचे सरकारच सत्तेवरून उलथवून टाकले. २०२३मध्ये महाशक्तीने राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये हाच प्रयोग केला व अजित पवारांनी त्यांच्या काकांनाच जय महाराष्ट्र केला. आता २०२४ मध्ये भाजपाचे सलग तिसऱ्यांदा सर्वाधिक आमदार विजयी झाले. सरकारमध्ये जाण्यासाठी आढेवेढे घेणाऱ्या एकनाथ शिंदे यांनाही देवेंद्र यांनी उपमुख्यमंत्रीपदासाठी राजी केले. गेल्या दहा वर्षांत देवेंद्र यांनी राज्यात काही ठरावीक नेत्यांची असणारी मक्तेदारी संपुष्टात आणली. राजकारणातील घराणेशाहीवरही प्रहार केले. काँग्रेस व राष्ट्रवादीतील अनेक दिग्गजांना भाजपाच्या दिशेने येण्यास भाग पाडले आणि एकाच वेळी पवार आणि ठाकरे यांना आव्हान निर्माण केले.

उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यात राजकीय संघर्ष टोकाला गेला आहे. २०१९ च्या निवडणुकीत अमित शहा यांनी मातोश्रीवर येऊन आपल्याला अडीच वर्षे मुख्यमंत्रीपद देण्याचे आश्वासन दिले होते, असे ठाकरे यांनी अनेकदा जाहीरपणे सांगितले. पण अशी चर्चा झालीच नाही असे स्वतः अमित शहा व देवेंद्र फडणवीस यांनी त्यावर उत्तर दिले. भाजपाकडून शिवसेनेला अडीच वर्षे मुख्यमंत्रीपद मिळत नाही, हे लक्षात येताच ठाकरे काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसच्या वळचणीला गेले व ते स्वतःच मुख्यमंत्री झाले. पण पक्षात झालेल्या बंडानंतर अडीच वर्षांतच त्यांना सत्तेवरून पायउतार व्हावे लागले.

ठाकरे यांनी वांद्रे येथील रंगशारदा सभागृहात झालेल्या पक्षाच्या मेळाव्यात देवेंद्र यांनाच आपल्या हल्ल्याचे टार्गेट केले होते. ते म्हणाले - मला व आदित्यला तुरुंगात टाकण्यासाठी देवेंद्र यांनी डाव आखला होता. मी हे सर्व सहन करून उभा आहे. आता एक तर तू राहशील किंवा मी राहीन... गीतेमधेही हेच सांगितले आहे. अर्जुनाने पाहिलं की, त्याच्या समोर त्याचे नातेवाईक उभे आहेत. तेव्हा त्यालाही यातना झाल्या होत्या. मग मला यातना होत नसतील का?

देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची तिसऱ्यांदा शपथ घेतल्यानंतर त्यांना पत्रकारांनी त्यांच्या विरोधकांची आठवण करून दिली तेव्हा ते म्हणाले -महाराष्ट्रात राजकीय संवाद संपलेला नाही. अनेक राज्यांत दोन पक्ष व नेत्यांमध्ये विसंवाद असतो की, जणू खून के प्यासे असं बघायला मिळतं. महाराष्ट्रात तशी परिस्थिती कधीच नव्हती व पुढेही राहू नये, हा माझा प्रयत्न असेल. महाराष्ट्राची राजकीय परंपरा जपत विरोधकांशी शत्रुत्व नसेल... राजकारणात तेही राहतील व मीही राहीन...

# भ्रष्टाचाराचा फटका सहन करून संघर्षमय जीवन


भ्रष्टाचार हा असा शाप आहे, जो देशाच्या विकासात अडथळा आणतो आणि असमानता, अन्याय, अशांतता, गरिबी, बेकारी, गुन्हेगारी, कमकुवत शासन व्यवस्था इत्यादी अनेक समस्यांना प्रोत्साहन देतो. यामुळे सर्वात जास्त नुकसान गरीब वर्गाचे आणि कर्तबगार लोकांचे होते, कारण त्यांना चांगल्या राहणीमानापर्यंत पोहोचण्याची संधी कमी मिळते, त्यांच्या फायद्याचा वाटा भ्रष्टाचाराच्या अन्यायाने दुसऱ्याला जातो. आपण सर्वजण आपल्या आयुष्यात अनेक कामांसाठी भ्रष्टाचाराचे बळी पडलेले आहोत किंवा पडतोय. क्वचितच असा दिवस असेल जेव्हा आपण भ्रष्टाचाराशी संबंधित बातम्या पाहत, वाचत किंवा ऐकत नाही. प्रत्येक विभागात किंवा क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक कर्मचाऱ्यांना त्यांच्या कार्यप्रणालीत कुठे अनुचित वर्तन होते हे माहीत असते, पण त्याविरुद्ध कोणीही आवाज उठवत नाही, लोभामुळे किंवा भीतीपोटी ते जसेच्या तसे सुरू ठेवू देतात. भ्रष्टाचाराने असंख्य जीवन उध्वस्त केले, या भ्रष्टाचाराचे परिणाम पीडित कुटुंबातील अनेक पिढ्यांना भोगावे लागत असते. शिफारस, राजकीय हस्तक्षेप, दबाव, सत्तेचा किंवा पदाचा दुरुपयोग यामुळे ही भ्रष्टाचाराला चालना मिळते. करप्शन परसेप्शन इंडेक्स २०२३ मध्ये ३९ गुणांसह भारत १८० देशांपैकी ९३ व्या क्रमांकावर आहे. जे २०२२ मध्ये ४० गुणांसह ८५ व्या स्थानावर होते.

नागपूर शहरातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात प्राध्यापक भरतीसाठी प्रत्येक पदास ५० ते ८० लाख रुपयांची लाच घेतल्याचे वृत्त दैनिक भास्कर या हिंदी वृत्तपत्राने १५ ऑगस्ट २०२४ रोजी आपल्या पहिल्या पानावर प्रसिद्ध केले होते. आजही या वृत्तपत्राच्या वेबसाईटवर जाऊन ही बातमी ऑनलाइन वाचता येते, नोकरभरतीच्या नावाखाली पैशांची मागणी होण्याची ही पहिलीच वेळ नाही. महाविद्यालयातील पदभरतीच्या या समस्येबाबत अनेक कुलगुरू व संबंधित विभाग, मंत्र्यांना कळवूनही कायमस्वरूपी तोडगा निघालेला नाही, अशा बातम्या यापूर्वीही प्रसिद्ध झाल्या आहेत. काही दिवसांपूर्वी संभाजी नगर येथे एका महिला प्राध्यापिकेला पीएचडी संशोधक विद्यार्थ्याकडून ५ लाख रुपयांची लाच निश्चित करून पहिल्या हप्त्याची रक्कम घेताना पकडण्यात आल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते. अशा हजारो घटना घडतात, पण समाजाच्या निदर्शनास फार कमी येतात. अनेक विभागांमध्ये भ्रष्टाचार शांतपणे आपले काम करत आहे. सध्या राज्यातील अकृषी विद्यापीठांमध्ये १२०० आणि महाविद्यालयांमध्ये ११ हजार मंजूर पदे रिक्त आहेत.

भ्रष्टाचाराच्या समस्येचा अनुभव जाणून घेण्यासाठी जर आपण एक खोटा उमेदवार म्हणून त्या-त्या भागात आपले काम करून घेण्यासाठी गेलो तरीही आपल्याला तेथील भ्रष्टाचाराच्या अन्यायकारक प्रथाची माहिती सहज मिळते. सर्वसामान्यांना सुद्धा सगळेच माहिती आहे. एखाद्या व्यक्तीने उच्च शिक्षण घेण्यासाठी आयुष्यातील मौल्यवान वेळ, पैसा आणि वय खर्च केले, म्हणजेच पात्रता असूनही नोकरी मिळवण्यासाठी त्याला लाच द्यावी लागली तर काय करावे? अशा परिस्थितीत प्रामाणिक आणि गरिबांनी उच्च शिक्षण घेणे गुन्हा ठरेल का? देशातील आर्थिक विषमतेची दरी अधिक खोलवर गेली आहे. श्रीमंत आणखी श्रीमंत आणि गरिबांचा तर संघर्ष कधीच संपत नाही. उच्च शिक्षणाची पदवी असलेले अनेक बेरोजगार जगण्यासाठी मजूरी सुद्धा करीत आहेत. जागतिक असमानता डेटाबेसनुसार, २०१४-१५आणि २०२२-२३दरम्यान, संपत्तीच्या एकाग्रतेच्या बाबतीत टॉप-एंडअसमानता वाढली आहे. २०२२-२३पर्यंत, शीर्ष १ टक्के चे उत्पन्न आणि संपत्तीचे समभाग (२२.६ टक्के आणि ४०.१ टक्के) त्यांच्या सर्वोच्च ऐतिहासिक पातळीवर आहेत आणि भारताचा सर्वोच्च १ टक्के उत्पन्नाचा वाटा जगात सर्वाधिक आहे, तो दक्षिण आफ्रिका, ब्राझील आणि यूएस पेक्षाही जास्त आहे.

असे अनेकदा म्हटले जाते, की या भ्रष्ट व्यवस्थेशी आपण एकटे लढू शकत नाही. जर आपण लाच देण्यास नकार दिला तर कोणीतरी आपल्यापेक्षा जास्त लाच द्यायला तयार आहे. एका प्रामाणिक माणसाने शंभर बेईमानांना काही फरक पडत नाही. मोठे उद्योगपती हजारो कोटींची कर्जे घेऊन परदेशात पळून जातात, तर येथील गरीब कर्ज फेडण्यासाठी आयुष्यभर धडपडत असतात. अनेकवेळा शासकीय कामे निर्धारित कालावधीत पूर्ण होत नाहीत, शासन बदलले तरी काम अपूर्णच, पहिल्याच पावसात रस्त्यावर पाणी साचून खड्डे पडतात आणि काही ठिकाणी पूल बांधल्याबरोबरच कोसळतात. सरकारी अधिकारी किंवा टेंडरवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे सुद्धा अनेकदा अपघात होऊन मोठ्या प्रमाणात जीवित व वित्तहानी होते. कायदा सर्व नागरिकांसाठी समान आहे, तरीही श्रीमंत, प्रभावशाली यांच्या तुलनेत गरीब सज्जन आणि प्रामाणिक लोक कायद्याला जास्त घाबरतात. नेत्यांची निवडणुकीतील आश्वासने आपल्याला पाच वर्षे आठवतात, पण ते विसरतात. तरीही नुसते म्हटल्याने आपली जबाबदारी किंवा आयुष्यातील संघर्ष संपत नाही, तर देशातील भ्रष्टाचार मुळापासून उखडून टाकण्यासाठी क्रांतिकारी पावले उचलण्याची गरज आहे. प्रत्येक सरकारी कामात पारदर्शकता, विश्वासार्हता, जबाबदारी आणि वेळेच्या मूल्याचे योग्य मूल्यमापन खूप महत्त्वाचे आहे.

नेते किंवा अधिकारी जितके उच्च पदांवर असतील तितके ते जनतेप्रती अधिक जबाबदार आणि उत्तरदायी असतात, परंतु त्यांच्या कामाबद्दल त्यांना जाब विचारण्याचे धाडस सामान्य माणसात कधीच होत नाही. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदावरून मुक्त झाल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून ते सामान्य लोकांसारखे सामान्य जीवन जगतात, लोकही त्यांच्याशी सामान्यपणे वागतात, परंतु आपल्याकडे एकदा निवडून आलेले अनेक नगरसेवकही तश्याच थाटात आयुष्यभर जगताना दिसतात. आपल्या देशात मोठ्या संख्येने आमदार आणि खासदार करोडपती आहेत आणि लोकहितासाठी लोकांची निस्वार्थीपणे सेवा करण्यासाठी संधी मिळावी म्हणून निवडणुकीत निवडून येण्यासाठी पाण्यासारखा पैसा खर्च करतात. लोकसेवेसाठी धडपड करणारे असे नेते जगात अन्यत्र कुठेही मिळणे शक्य नाही. नुकतीच मी वर्तमानपत्रात बातमी वाचली की महाराष्ट्र राज्यात विधानसभेच्या निवडणुकीत अनेक उमेदवारांनी केलेला खर्च आणि निवडणूक आयोगाला दिलेल्या खर्चाचा तपशील यात मोठी तफावत आहे.



डॉ. प्रितम भि. गेडाम
(असीस्टेंट प्रोफेसर)
+०८२३७४१७०४१
prit00786@gmail.com

भ्रष्टाचार निर्मूलन ही आपल्या सर्वांची नैतिक जबाबदारी आहे, जागरूकता, धाडस, सुजाण नागरिक आणि माणुसकीच्या नात्याने आपण ही समस्या संपवू शकतो. देशातील प्रत्येक राज्यात, राज्य सरकारचा भ्रष्टाचारविरोधी विभाग आहे, ज्याची मदत आपण भ्रष्टाचाराशी संबंधित समस्यांच्या बाबतीत घेऊ शकतो. आपण ऑनलाइन तक्रार दाखल करू शकतो, टोल फ्री नंबरवर संपर्क साधू शकतो, ईमेल पाठवू शकतो, व्हॉट्सप नंबरवरही कनेक्ट होऊ शकतो. महाराष्ट्र राज्य सरकारच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्यासाठी टोल फ्री क्रमांक १०६४ किंवा व्हाट्सअप ९९३०९९७७०० वर कॉल करा किंवा acbwebmail@mahapolice.gov.in वर ईमेल करा किंवा त्यांच्या वेबसाइट https://www.acbmaharashtra.gov.in/bribe वर ऑनलाइन तक्रार लिंकवर क्लिक करून जनजागृती करू शकता. आपल्या वैयक्तिक फायद्यासाठी इतरांचे हक्क हिसकावून न घेता, प्रामाणिकपणे आणि स्वाभिमानाने समाधानाने आयुष्य जगणे म्हणजे मानवता होय. हे व्रत घ्या की आपल्याला थोडा त्रास झाला तरी पण आपण सरकारी धोरणे, नियम आणि कायदे पाळू आणि कधीही भ्रष्टाचार करणार नाही किंवा खपवून घेणार नाही.

# भ्रष्टाचार ; देशाला लागलेली किड

आज ९ डिसेंबर, आजचा दिवस संपूर्ण जगात भ्रष्टाचार विरोधी दीन म्हणून साजरा केला जातो. भ्रष्टाचार ही आज जगातील सर्वात मोठी समस्या बनली आहे. भारततच नाही तर जगात भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे उघड होत आहेत. जगात असा एकही देश नाही जिथे भ्रष्टाचार होत नाही. भारतात तर आज भ्रष्टाचार शिष्टाचार बनला आहे. जगातील सर्वात भ्रष्ट देशांच्या यादीत भारताचा क्रमांक लागतो ही खेद जनक बाब आहे. भ्रष्टाचाराची ही किड भारतात खोलवर रुजली आहे. भ्रष्टाचाराची ही किड देश पोखरत चालली आहे. भारतातील भ्रष्टाचार कमी करणार असे सर्वच राजकीय पक्ष सांगतात. देशातील भ्रष्टाचार संपवणार अशी प्रतिज्ञाच काही राजकीय आणि सामाजिक नेत्यांनी केली होती पण देशातील भ्रष्टाचार संपवणे तर दूरच पण दिवसेंदिवस देशातील भ्रष्टाचार वाढत चालला आहे. अमेरिकेतील वॉशिंग्टन येथील ग्लोबल फायनांशियल इंटिग्रेटी या भ्रष्टाचारावर सर्व्हे करणाऱ्या संस्थेने मागील वर्षी एक अहवाल सादर केला होता. या अहवालानुसार गेल्या सत्तर वर्षात लाचखोरीमुळे देशाचे ४५०अब्ज डॉलरचे नुकसान झाले आहे. ४५० अब्ज डॉलर ही काही छोटी रक्कम नाही. भ्रष्टाचारी लोकांनी देशाची ४५० अब्ज डॉलर पचवले. हे ४५० अब्ज डॉलर गोरगरिबांच्या मेहनतीचे होते मात्र भ्रष्टाचाऱ्यांनी खुर्ची आणि पदाचा गैरवापर करून गोरगरिबांना फसवले आणि त्यांच्या मेहनतीचे पैसे लाटले.

देशाला लागलेली ही भ्रष्टाचाराची किड आता लागलेली नाही. देशाच्या स्वातंत्र्यापासून हा भ्रष्टाचार सुरू आहे. देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहलाल नेहरू एकदा उद्विग्न होऊन म्हणाले होते की भ्रष्टाचाऱ्यांना सुळावर लटकवले पाहिजे. मात्र आजवर एकाही भ्रष्ट अधिकाऱ्याला सुळावर लटकवणे तर दूरच मात्र शिक्षा झाल्याचेही ऐकवात नाही. त्यामुळेच भ्रष्टाचार वाढत चालला आहे. दररोजचे वर्तमानपत्र वाचा त्यात तुम्हाला एक तरी भ्रष्टाचाराची किंवा लाचखोरीची बातमी वाचायला मिळेल. एका एका भ्रष्ट अधिकाऱ्याकडे कैक कोटींची अवैध मालमत्ता आढळत आहे. असा कोणताही विभाग नाही ज्यात भ्रष्टाचार होत नाही. महसूल आणि पोलीस विभाग भ्रष्टाचारात अव्वल असेल तरी सर्वच विभागात भ्रष्टाचार सर्रास चालू आहे. शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्राला देखील भ्रष्टाचाराने घेरले आहे. जो विभाग समाजाला नैतिकतेचे धडे देतो त्याच विभागात भ्रष्टाचारासारखे अनैतिक काम राजरोसपणे सुरू आहे.

देशातील भ्रष्टाचार कमी व्हावा यासाठी जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे, योग गुरू रामदेव बाबा यांच्यासह काही सामाजिक कार्यकर्ते दिल्लीच्या जंतरमंतर वर उपोषणाला बसले होते. त्यांच्या आंदोलनाला जनतेतूनही मोठा पाठिंबा मिळाला होता. आता सत्तेत असलेल्या भाजपच्या नेत्यांनीही या आंदोलनाला पाठिंबा दिला होता. देशभर भ्रष्टाचार विरुद्ध वातावरण निर्माण झाले होते. त्यावेळी देशातून भ्रष्टचार नष्ट होईल असे वाटले होते. त्या आंदोलनाचा सर्वाधिक फायदा भाजपला झाला. भाजप केंद्रात सत्तेवर आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ना खाऊंगा....... ना खाणे दुंगा..... असा इशारा भ्रष्टाचाऱ्यांना दिला. देशातील भ्रष्टाचार कमी करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नोटबंदी केली. देशातील लोकांना वाटले आता तरी भ्रष्टाचार कमी होईल मात्र तसे काही झाले नाही उलट भ्रष्टाचारात वाढच झाली. त्यातही गंमत म्हणजे ज्या भ्रष्टाचाऱ्यांना विरोध करून भाजप सत्तेत आली आज त्याच भ्रष्टाचाऱ्यांना पक्षात घेऊन भाजप पावन करत आहे. ट्रेस मेट्रिक्स २०२१ च्या अहवालात भारत लाचखोरीत इतर देशांच्या तुलनेत खूप पुढे आहे. याचाच अर्थ देशातील भ्रष्टाचार कमी झाला नाही.

आज कोणत्याही सरकारी कार्यालयात चिरीमिरी दिल्याशिवाय काम होत नाही. दररोजचे वर्तमान पत्र उघडले की एक तरी लाचखोरीची बातमी वाचायला मिळतेच. जनताही मजबूर आहे. याच मजबुरीचा फायदा घेऊन लाचखोर त्यांनाच जाळ्यात अडकवत आहे. लाच दिली नाही तर काम होत नाही असाच अनुभव देशातील बहुतांश जनतेला आला आहे. राजस्थानमधील ८० टक्के लोकांनी हे मान्य केले आहे की कोणतेही काम करण्यासाठी लाच द्यावीच लागते. महाराष्ट्रातील ५५ टक्के लोकांचे हेच म्हणणे आहे. याचाच अर्थ लाचखोरी सामान्य होत आहे. पूर्वी भ्रष्टाचाऱ्यांकडे द्वेष भावनेने पाहिले जाते होते. आता मात्र त्यांच्या संपत्तीवरून त्यांचा सन्मान होत आहे. आज भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनला आहे.

# हिंदी साहित्यविश्वातील गाढे अभ्यासक (संतश्रेष्ठ सूरदास जयंती विशेष)

संतशिरोमणी सूरदास हे पंधराव्या शतकातील एक डोळ्याने अंध असलेले संत, कवी आणि संगीतकार होते. भक्तीचा प्रवाह वाहता ठेवणाऱ्या भक्त कवींमध्ये सूरदास हे नाव सर्वोपरी आहे. भगवान श्रीकृष्णावरील भक्तीगीतांसाठी ते ओळखले जातात. भगवान श्रीकृष्णाची अभिव्यक्ती त्यांच्या रचनांमध्ये स्पष्टपणे दिसते. जो कोणी त्याची काव्यरचना वाचतो तो श्रीकृष्णाच्या भक्तीत मग्न होतो. त्यांनी त्यांच्या रचनांमध्ये भगवंताचे शृंगार आणि शांतरस यांचे हृदयस्पर्शी वर्णन केले आहे. संतश्रेष्ठ सूरदासजींना हिंदी साहित्याचे चांगले ज्ञान होते, म्हणूनच त्यांना हिंदी साहित्याचे गाढे अभ्यासक मानले जाते. त्यांचे यथोचित गुणगौरव बापू-श्रीकृष्णदास निरंकारीजींनी येथे केले आहे....

*क्षुद्र पतित तुम तारे रमापति*
*अब ना करो जिया डारो*
*सूरदास साचो तब माने -*
*जो है मम निस टारो, निस टारो*
*अबकी बेर उबारो*
*नाथ मोहे अब की बेर उबारो*
*अबकी बेर उबारो*

महान कविवर्य संत सूरदासजी यांचा जन्म दि. डिसेंबर मध्ये रुणकटा नावाच्या गावात झाले. त्यांच्या वडिलाचे नाव पंडित रामदास सारस्वत आणि आईचे नाव जमुनादास होते. काही विद्वान सिही नावाच्या जागेला त्यांचे जन्मस्थान मानतात. जन्मजात ते आंधळे होते की नाही यासंबंधात बऱ्याच कथा आहेत. त्यांचे बालपणीचे नाव मदन मोहन असे होते. काही लोक असे म्हणतात, की सूरदासने वर्णन केल्याप्रमाणे बालवृत्तीचे व मानवी स्वभावाचे सूक्ष्म आणि सुंदर वर्णन कोणत्याही व्यक्तीद्वारे केले जाऊ शकत नाही. यावरून असे वाटते, की ते नंतर अंध झाले असावेत. ते श्री वल्लभाचार्य यांचे शिष्य होते. ते मथुरामधील गौघाट येथील श्रीनाथजीच्या मंदिरात राहत होते. संत सूरदासजींचेही लग्न झाले होते. ते विभक्त होण्यापूर्वी आपल्या कुटुंबासमवेत राहत असत. पूर्वी ते दीनानाथाचे पद्य गात असत, परंतु गुरू वल्लभाचार्यांच्या संपर्कात आल्यानंतर त्यांनी कृष्णालीला गायनास सुरवात केली. असे म्हटले जाते, की एकदा संत तुलसिदासने मथुरा येथे त्यांची भेट घेतली आणि हळूहळू या दोघांमधील प्रेम वाढत गेले. संत सूरदासजींच्या प्रभावामुळेच संत तुलसिदासांनी श्रीकृष्ण गीतावली रचली. जेव्हा सूरदास वृंदावन धाम भेटीसाठी गेले होते, त्यावेळी त्यांना वल्लभाचार्य भेटले. त्यानंतर ते त्यांचे शिष्य झाले. महान संतकवी सूरदासजी यांना वल्लभाचार्य यांच्याकडून भक्तीची दीक्षा मिळाली. त्यांनी योग्य मार्गदर्शन करून सूरदासजींना श्रीकृष्णाची भक्ती करण्यासाठी प्रेरित केले. महान कवी सूरदास आणि त्यांचे भक्तीकळेचे गुरू वल्लभाचार्य यांच्याबद्दलही एक रोचक सत्य आहे, की शिष्य आणि गुरू यांच्या वयात केवळ दहा दिवसांचा फरक होता. दंतकथांनुसार गुरू वल्लभाचार्य यांचा जन्म १५३४ मध्ये वैशाख कृष्ण एकादशीला झाला होता. म्हणूनच अनेक विद्वानसुद्धा वैशाख शुक्ल पंचमीच्या सुमारास संत सूरदासजींचा जन्म झाला, असे विचार करतात.

*ओदन भोजन दै दधि काँवरि,*
*भूख लगे तैं खेहौं।*
*सूरदास है साखि जमुन-जलौंह*
*देहु जु नहैहौं*

तिथे असताना संत सूरदासजी श्रीनाथजींची सेवा करायचे आणि दररोज नवीन रचना करून एकतारीच्या माध्यमातून ते गात असत. गुरुनींच त्यांना भागवत लीलाची स्तुती गाण्याचा सल्ला दिला होता. तेव्हापासून त्यांनी श्रीकृष्णाची स्तुती करण्यास सुरवात केली. श्रीकृष्णाबद्दलची भक्ती त्यांच्या गायनातून स्पष्टपणे दिसून आली. यापूर्वी ते विनयचे श्लोक केवळ करुणेमुळेच रचत असत. त्यांच्या पदांची संख्या सहस्रदिक अशीच आहे, ज्यांचा एकत्रित संग्रह सूरसागर म्हणून प्रसिद्ध आहे. आपल्या गुरूकडून शिक्षण घेतल्यानंतर भगवान श्रीकृष्णाच्या भक्तीमध्ये ते पूर्णपणे तल्लीन झाले. त्यांच्या श्रीकृष्णाप्रती असलेल्या भक्तीविषयी बऱ्याच कथा प्रचलित आहेत. एका आख्यायिकेनुसार एकदा ते कृष्णभक्तीमध्ये मग्न असताना विहिरीत पडले, त्यानंतर भगवान श्रीकृष्णानेच प्रत्यक्ष दर्शन देऊन त्यांचा जीव वाचविला होता. त्यानंतर देवी रुक्मणीने श्रीकृष्णाला विचारले, की हे भगवंता, तुम्ही सूरदासजींचे प्राण का वाचविले? तेव्हा भगवंतानी सांगितले, की खऱ्या भक्तांना नेहमीच मदत केली पाहिजे आणि सूरदासजी तर त्यांचे खरे प्रामाणिक उपासक होते. त्यांनी ते त्यांच्या भक्तीचे फळ म्हणून वर्णन केले. असेही म्हटले आहे, की जेव्हा श्रीकृष्णाने त्यांचा जीव वाचविला तेव्हा त्यांची नेत्रज्योत फक्त देवाचे रुप पाहण्यापुरतीच परत केली होती. त्यानंतरच सूरदासजींनी प्रथम आपला प्रिय सखा श्रीकृष्ण पाहिला होता. देवाने भक्तीवर प्रसन्न होऊन त्यांना वरदान मागण्यास सांगितले. यावर ते म्हणाले, की मला सर्व काही मिळाले आहे. कारण त्यांना त्यांच्या परमेश्वराशिवाय इतर कोणालाही पाहायचे नव्हते. देवाने आशीर्वाद दिला की त्यांची कीर्ती दूरवर पसरेल आणि त्यांचे कायम स्मरण केले जाईल. एक भ्रमरगीत-

*ऊधौ, तुम हौ अति बड़भागी*
*अपरस रहत सनेह तगा तैं,*
*नाहिन मन अनुरागी*
*पुरइनि पात रहत जल भीतर,*
*ता रस देह न दागी*
*ज्यौं जल माहँ तेल की गागरि, बूँद न ताकौं लागी*
*प्रीति-नदी मैं पाउँ न बोरयौ,*
*दृष्टि न रूप परागी*
*सूरदास अबला हम भोरी,*
*गुर चाँटी ज्यौं पागी*

महाकवी संतश्रेष्ठ सूरदासजींची अशी भक्तीगीते सर्वांना भगवंताकडे आकर्षित करतात. त्याचवेळी सूरदास यांच्या लेखन व गायनाची ख्याती दूरवर पसरली. हे ऐकून सम्राट अकबरसुद्धा त्यांना भेटण्यास आतुर झाले. साहित्यात असे नमूद केले आहे, की अकबरच्या नऊ रत्नांपैकी एक असलेल्या संगीतकार तानसेन यांनी सम्राट अकबर आणि सूरदासजींना मथुरा येथे एकत्र आणले होते. भगवान श्रीकृष्णाचे सुंदर रूप आणि त्यांचे विडंबन सूरदास यांच्या श्लोकात वर्णन केले गेले आहेत. जो कोणी त्याचे श्लोक ऐकायचा तो भक्तीरसात न्हाऊन निघत असे. अशा प्रकारे अकबरसुद्धा त्यांचे भक्तिगीत ऐकून खुप प्रसन्न झाला. त्याच वेळी असेही म्हटले जाते, की सम्राट अकबराने आपली कीर्ती महान कवी सूरदास यांच्याकडे गाण्याची इच्छा व्यक्त केली. परंतु ते आपल्या ईश्वराशिवाय इतर कोणाचे वर्णन करत नसल्याचे त्यांनी स्पष्ट सांगितले. याशिवाय त्यांच्या लिखाणाचा महाराणा प्रतापांसारख्या शूरवीरांवरही प्रभाव पाडला होता.

तृसना नाद करति घट अन्तर, नानाविध दै ताल।

*माया कौ कटि फैंटा बांध्यो, लोभ तिलक दियो भाल*
*कोटिक कला काछि दिखराई,*
*जल थल सुधि नहिं काल।*
*सूरदास की सबै अविद्या, दूरि करौ नंदलाल*

भक्ती काळात सर्वोत्कृष्ट कवी असलेल्या सूरदासजींना हिंदी साहित्याचे अभ्यासक म्हटले गेले. त्यांच्या कार्यात श्रीकृष्णावरील अतूट प्रेम आणि भक्तीचे वर्णन आहे. त्यांनी त्यांच्या रचनांमध्ये वात्सल्यरस, शांतरस आणि श्रृंगाररस स्वीकारला होता. सूरदासजींनी श्रीकृष्णाचे देवत्व, अप्रतिम बालरूप व त्यांचे सुंदररूप हे आपल्या कल्पनाशक्तीद्वारे वर्णन केले. त्यांच्या दोह्यांमध्ये श्रीनाथजींच्या अद्भुत प्रकारांचे वर्णन अशा प्रकारे केले आहे, की ते सर्व काही आपल्या डोळ्यांनी प्रत्यक्ष पाहिले आहे. त्यांच्या रचनांमध्ये चैतन्य विखुरलेला प्रतित होतो. त्यांनी रचनांमध्ये भक्ती आणि शोभा मिसळून योगायोग-विच्छेद असे दिव्य वर्णन केले आहे. त्याशिवाय त्यांच्या रचनांमध्ये निसर्गाचेही वर्णन अशा प्रकारे आले आहे जे मनाला भारून घेते आणि प्रत्येकाला भगवंताच्या भक्तीकडे आकर्षित करते. त्यांच्या काव्यांत श्रीकृष्णाबद्दल कमालीची भक्तिभावना आहे. याशिवाय यशोदा मैया यांच्या व्यक्तिरेखेवर त्यांनी लिहिलेले चित्रण वाखाणण्याजोगे आहे. सूरदास यांच्या कवितांमध्ये पूर्वीच्या काळातील कथा, ऐतिहासिक ठिकाणांचे वर्णनही केले गेले आहे. अष्टाचप कवींपैकी ते सर्वोत्कृष्ट कवी मानले जातात, अष्टाचप ही संस्था वल्लभाचार्य यांचे पुत्र विठ्ठलनाथ यांनी स्थापन केली होती. गज अहंकार चढ्यौ दिगविजयी, लोभ छत्र धरि सीस।

फौज असत संगति की मेरी, ऐसो हौं मैं ईस

मोह मदै बंदी गुन गावत, मागध दोष अपार।

सूर, पाप कौ गढ दृढ़ कीने, मुहकम लाय किंवार

संतश्रेष्ठ सूरदासजींनी लिहिलेली ग्रंथ संपदा-सूरसागर, सूरसारावली, साहित्य लाहिरी, नल-दमयंती आणि बाह्यालो. आता यांचे पुरावेही सापडले आहेत. असे म्हणतात की सूरसागरमध्ये सुमारे एक लाख पदे आहेत.

# सोनी सबवरील बादल पे पांव है मध्ये रजतला पुन्हा जिंकून घेण्यासाठी बानी कटिबद्ध

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :** सोनी सबवरील बादल पे पांव है मालिकेची नायिका बानी (अमनदीप सिद्धू) ही एक करारी तरुणी आहे, जी कितीही आर्थिक अडचणी असल्या तरी आपल्या कुटुंबाचे जीवनमान सुधारण्यासाठी प्रयत्नशील असते. अलीकडच्या भागांमध्ये, बानीला रजत (आकाश आहुजा) आणि लावण्या (भाविका चौधरी) यांच्यातल्या धक्कादायक



सौद्याविषयी समजते. तिला हे समजते की, इन्साइडर ट्रेडिंग प्रकरणावरून लावण्या रजतला ब्लॅकमेल करत आहे आणि बानीला वाचवण्यासाठी रजत तिला शरण गेला आहे. आगामी भागांमध्ये लावण्या माहिर (गौरव शर्मा)ला भरीस पाडते की, त्याने रजतसमोर बानीशी जवळीक साधून रजतचे मन कलुषित करावे. पण प्रेक्षकांना एक सर्प्राइज मिळणार आहे, कारण बानी आणि माहिर यांनी आधीच एक प्लॅन करून ठेवला आहे. त्या दोघांनी मिळून लावण्यावर कुरघोडी करण्याचे योजले आहे. कारण, माहिरची मनापासून इच्छा आहे की, बानी आणि रजत पुन्हा एकत्र यावेत. जेव्हा लावण्याला त्यांच्या या योजनेचा सुगावा लागतो, तेव्हा ती बिथरते आणि बानीच्या वडीलांची चौकशी करण्यासाठी पोलिसांना पाठवून ती रजतला धमकीचा संदेश देते. आता प्रश्न हा आहे की, रजत घाबरून माघार घेईल का? की, लावण्यासमोर उभा राहून तिच्या हल्ल्याला तोंड देईल? या मालिकेत बानीची भूमिका करणारी अमनदीप सिद्धू म्हणते, आता जेव्हा बानीला रजतच्या कृतींमागचे खरे कारण समजूत चुकले आहे, तेव्हा ती आपल्या प्रेमावर पाणी सोडण्यास खचितच तयार होणार नाही. माहिरसोबत तिने केलेला सौदा केवळ लावण्याची दिशाभूल करण्यासाठी नाही, तर आपल्या नात्यासाठी खंबीर उभे राहून आपल्या जीवनाचे नियंत्रण पुन्हा आपल्या हाती घेण्यासाठी आहे. आता गोष्टी अगदी विकोपाला गेल्या आहेत आणि मी हे बघण्यास उत्सुक आहे की, आपल्या कुटुंबाच्या आणि प्रेमाच्या रक्षणासाठी बानी काय काय करू शकते. आणि यावेळी रजत तिच्या बाजूने उभा राहणार की, त्याला कठोर निर्णय घ्यावा लागणार?

# सोनी सबवरील श्रीमद् रामायण मध्ये श्रीराम आणि त्याचे पुत्र लव-कुशयांचा आमनासामना!




**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८** सोनी सबवरील श्रीमद् रामायण मालिकेत श्रीराम (सुजय रेऊ) आणि सीता (प्राची बंसल) यांची दिव्य कथा सादर करण्यात येत आहे. अलीकडच्या भागांमध्ये प्रेक्षकांनी पाहिले की, श्रीराम आणि सीता यांचे जुळे पुत्र लव (शौर्य मंडोरिया) आणि कुश (अथर्व शर्मा) यांच्या दिव्य पराक्रमामुळे कथानकाला एक नाट्यात्मक वळण मिळाले आहे. त्या दोघांनी एकापाठोपाठ अनेक वीरांना परास्त केले आहे. शेवटी महाबलाढ्य सुग्रीव (मल्हार पंड्या) आणि भरत यांना देखील अटीतटीच्या लढाईत पराभूत केल्यामुळे सर्वजण त्या दोघांच्या दिव्य शक्तीने अचंबित झाले आहेत. या तीव्र संघर्षानंतर आता पुढील भागांमध्ये भावनिक संघर्ष प्रेक्षकांना बघायला मिळणार आहे.

आगामी भागांमध्ये प्रेक्षक बघतील की, सुग्रीव आणि भरत यांचा लव-कुशांनी पराभव केल्याची वार्ता श्रीरामापर्यंत पोहोचते. हे ऐकल्यानंतर श्रीराम स्वतः लव-कुश या दोन बाल वीरांशी लढण्यास सज्ज होतात. इकडे, सीतेला अशी कुणकुण लागते की श्रीराम आणि तिच्या मुलांचा आमनासामना होणार आहे. जेव्हा अखेरीस लव आणि कुश श्रीरामांना भेटतात, तेव्हा ते सीतेला आपल्यापासून दूर करण्याच्या श्रीरामाच्या निर्णयावर सवाल उभा करतात. यानंतर, त्यांच्यात युद्ध होते आणि श्रीराम विजयी होतात.

**या युद्धानंतर त्यांच्या नात्याचा उलगडा कसा होईल?**

श्रीमद् रामायणमालिकेत श्रीरामाची भूमिका करणारा सुजय रेऊ म्हणतो, हे दृश्य फारच उत्कट आहे, कारण यावेळी श्रीराम आणि लव-कुश समोरासमोर उभे ठाकतात. रामकथेतील हा एक अत्यंत भावनिक क्षण आहे. ही केवळ सामर्थ्याची लढाई नाही, तर हा आदर्शांचा, प्रेमाचा आणि जबाबदारीचा देखील लढा आहे.

# झी टीव्हीवरील जाने अनजाने हम मिलेमधील साठी रीत आणि राघव यांनी घेतले सिद्धिविनायकाचे आशीर्वाद

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८**

झी टीव्हीवर हल्लीच सुरू झालेली जाने अनजाने हम मिले ही मालिका यातील मनाची पकड घेणारे नाट्य, लक्षवेधी कथानक आणि ऑनस्क्रीन उत्तम केमिस्ट्री असलेल्या व्यक्तिरेखा प्रेक्षकांच्या पसंतीस पडल्या आहेत. ह्या मालिकेत भरत अहलावत आणि आयुषी खुराणा साकारत असलेली अनुक्रमे राघव आणि रीत ही जोडीही प्रेक्षकांची लाडकी बनली आहे. चाहत्यांना त्यांच्या नात्यातील प्रेमतिरस्काराचे डायनॅमिकही आकृष्ट करत आहे. आगामी ट्रॅकमध्ये प्रेक्षकांना पाहायला मिळेल की कसे ह्या दोघांचे आगळ्या वेगळ्या आटा साटा लग्न परंपरेअंतर्गत लग्न होते, ज्यामधून ह्या दोघांच्याही भावाबहिणींचे भविष्य सुरक्षित होते. ह्या प्रवासाची सुरूवात करण्याआधी रीत आणि राघव यांनी नुकतेच सिद्धिविनायक मंदिराला भेट देऊन बाप्पाचे आशीर्वाद घेतले आणि आपल्या लग्नाची निमंत्रणपत्रिकाही मंदिरात ठेवली. भरत अहलावत म्हणाला, अतिशय भक्तिभावाने आणि प्रेमाने आम्ही गणपती बाप्पाच्या चरणी आमच्या लग्नाची निमंत्रणपत्रिका ठेवण्यासाठी गेलो होतो. आमच्या मालिकेचे यश आणि आमच्या मालिकेच्या प्रेक्षकांच्या प्रेम आणि समर्थनामध्ये वाढ व्हावी यासाठी आम्ही बाप्पाचे आशीर्वाद मागतो. आटा साटा लग्न परंपरेमुळे खरंतर रीत आणि राघव यांची कुचंबणा झाली असली तरी आम्ही आमच्या ह्या मालिकेसह त्यांच्या भविष्यासाठी आणि सुंदर लग्नगाठीसाठी आशीर्वाद घेण्यासाठी येथे आहोत. आमच्या चित्रीकरणानंतर आम्ही मंदिरात गेलो आणि जसे आम्ही त्या पवित्र स्थळी प्रवेश केला आमच्या दिवसभराचा थकवा जणू क्षणात दूर झाला आणि मनाला एक प्रकारची शांतता लाभली. ह्या मंदिराला भेट देताना नेहमीच छान वाटते. आयुषी खुराणा म्हणाली, आम्ही सिद्धिविनायकाच्या मंदिरामध्ये रीत आणि राघव यांच्या लग्नाची निमंत्रणपत्रिका बाप्पाच्या चरणी ठेवण्यासाठी आणि आमच्या मालिकेसाठी आशीर्वाद घेण्यासाठी गेलो होतो. आम्ही प्रार्थना करतो की प्रेक्षक आमची मालिका पाहतील आणि आमच्यावर त्यांच्या प्रेमाचा वर्षाव करतील. आम्हांला केवळ त्यांचे समर्थन हवे आहे आणि त्यांना आमच्या व्यक्तिरेखा आवडत राहाव्यात अशी आमची इच्छा आहे. रीत आणि राघव लग्नगाठ बांधण्यासाठी सज्ज असून प्रेक्षकांसाठी -पाहणे अतिशय रोचक ठरेल. पण लग्नानंतर काय होईल? काय ते पुढे जाऊन एकमेकांच्या प्रेमात पडतील? अधिक जाणून घेण्यासाठी पहा जाने अनजाने हम मिले दर सोमवार ते शुक्रवार रात्री ९.३० वाजता फक्त झी टीव्हीवर


## आज का अंदाज

सोमवार ९ डिसेंबर २०२४
जबरदस्त पास होणारे चान्सेस
पत्थर फोड एकच

कल्याण बाजार

| 3 | 4 | 5 | 7 |
|---|---|---|---|
| 148 | 158 | 249 | 269 |
| 346 | 347 | 456 | 179 |
| 229 | 257 | 339 | 340 |
| 30 | 40 | 58 | 78 |
| 31 | 41 | 59 | 79 |
| 32 | 42 | 56 | 76 |

मुंबई बाजार

| 2 | 4 | 7 | 8 |
|---|---|---|---|
| 147 | 130 | 124 | 170 |
| 390 | 356 | 278 | 369 |
| 480 | 239 | 359 | 260 |
| 20 | 40 | 73 | 83 |
| 23 | 41 | 75 | 85 |
| 29 | 49 | 76 | 86 |

९ डिसेंबर २०२४
सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| 21 | 51 | 86 | 96 |
| 24 | 54 | 80 | 90 |
| 27 | 57 | 83 | 93 |

कल्याण व मुंबईकरिता आणि सर्व बाजारासाठी 60 पानांचा चार्ट मिळेल. 100 टक्के खात्रीशीर. फक्त सोमवारी मिळेल.
प्रो. बालाजी कुमार
9822486034


## आजचे राशिभविष्य

**मेष :** नवीन बांधकामाची इच्छा पूर्ण होईल. सर्जनशील कार्याकडे कल वाढेल. दूरच्या देशातून चांगला संदेश येईल. तुमचे आरोग्य चांगले राहील. कुटुंबातील प्रकृती सुधारेल.

**वृषभ :** तुमचे वर्तन सकारात्मक ठेवा. आज आर्थिक क्षेत्रात अडथळे वाढू शकतात. उत्पन्नाचे स्रोत शोधण्याचा प्रयत्न करा. मालमत्तेच्या खरेदी-विक्रीशी संबंधित कामात धावपळ करावी लागेल.

**मिथुन :** नातेवाईक आणि जवळच्या मित्रांच्या मदतीने व्यवसायाला गती मिळेल. कार्यक्षेत्रात काही अडचणी दूर होतील. समाजातील प्रतिष्ठित लोकांशी संपर्क वाढेल. स्वत:वर विश्वास ठेवा.

**कर्क :** व्यवसाय वाढवण्याच्या योजना यशस्वी होतील. नोकरीचा शोध पूर्ण होईल. महत्त्वाच्या कामातील अडथळे दूर होतील. कामाच्या ठिकाणी नवीन मदतनीस तयार होतील.

**सिंह :** विरोधक किंवा शत्रूशी भांडण होऊ शकते. राजकारणात तुम्हाला आव्हानांचा सामना करावा लागू शकतो. भावनिक भाषणाचे कौतुक होईल. व्यावसायिक सहलीला जावे लागेल.

**कन्या :** करिअरशी संबंधित इच्छा पूर्ण होऊ शकतात. एखाद्या अत्यंत प्रतिष्ठित व्यक्तीकडून मार्गदर्शन आणि साहचर्य मिळेल. व्यावसायिक भागीदारी वाढेल. पैशाचे व्यवहार सोपे होतील.

**तूळ :** मालमत्ता मिळण्याची शक्यता आहे. व्यवसायात आर्थिक मदत मिळेल. नोकरीत उच्च अधिका-यांच्या निकटतेचा लाभ होईल. आज तुम्हाला प्रेमसंबंधांमध्ये चांगली बातमी मिळू शकते.

**वृश्चिक :** आज जवळच्या व्यक्तींकडून चांगली बातमी मिळाल्याने आनंद वाढेल. प्रिय व्यक्तीशी भेट होईल. राजकीय महत्त्वाकांक्षा पूर्ण होतील. कुटुंबातील सदस्यांमुळे समाजात मान-प्रतिष्ठा वाढेल.


**धनु:** आज कामाच्या ठिकाणी विरोधकांच्या कारस्थानांपासून सावध राहा. व्यवसायात चढ-उतार होतील. अचानक मोठे निर्णय घेऊ नका. इतरांकडून दिशाभूल करू नका.

**मकर :** संपत्तीत वाढ झाल्याने उत्साही व्हाल. व्यवसायात अधिक व्यस्त राहाल. आज तुम्हाला एखाद्या प्रिय व्यक्तीकडून भेटवस्तू मिळेल. वैवाहिक जीवनात प्रेम वाढेल.

**कुंभ :** एकमेकांच्या भावना समजून घेण्याचा प्रयत्न करा.बाहेरील खाद्यपदार्थ आरोग्यास हानी पोहोचवू शकतात. सावध रहा.

**मीन :** कर्ज देणे टाळा. व्यवसायात मनापासून काम करा. समर्पण आणि प्रामाणिक कार्यशैली उच्च अधिका-यांना प्रभावित करेल. कपडे, दागिने व्यवसायात गुंतलेल्यांसाठी यशाचे संकेत आहेत.

## शब्दकोडे क्रमांक १९९०



**आडवे शब्द :-**

१) परस्परांमधील देवघेव व्यापार
४) सुधा
६) अकस्मात
१०) आश्रय
११) माफी असावी
१२) बर्फाळ प्रदेशातील एक प्राणी
१४) मद्य
१६) पाताळातील एका मुख्य नागाचे नाव
१८) उत्कर्षाचा काळ
२१) पोळी भाजण्याचे पात्र
२३) अथवा, किंवा
२४) गव्हाचे जाडसर पीठ
२५) वजन, बोजा
२७) देवाची रथातून काढलेली मिरवणूक
२८) संगीतातील एक राग
३०) मिळालेले, प्राप्त
३१) संतापी
३३) अंत:करण
३४) पटल
३६) रक्ताचा रंग
३७) मध
३९) पुन्हा पुन्हा (हिं.)
४०) वेळ
४२) अग्नी, जाळ, दाह
४३) कवी
४६) वन, रान
४८) लिंबाच्या रसाचे पेय
५०) उंटाच्या पाठीवरील उंचवटा
५२) गणपती
५५) लोणी
५६) मयूर
५७) नातेवाईक
५९) आपला नसलेला, परकीय
६१) श्रीमंत
६३) खोडण्याचे साधन
६५) चार आठवड्याचा काळ
६६) शिव! शिव!
६८) खांदा, खांद्याचे हाड
६९) दोरा
७०) एकावर एक रचलेले
७२) वर्ष, साल
७३) तादाम्य
७५) भांडण
७६) शपथ
७७) मीठ
७८) ज्वारीची वाळलेली खुंटे
७९) समुद्रकिनारा

**उभे शब्द :-**

१) दु:ख
२) वरवधूची मिरवणूक
३) रक्षण करणारा
४) ओंगळ केसाळ मोठा प्राणी
५) सिद्ध
७) नोकर
८) न्यूनता, उणीव
९) दिमाख, ऐट
१३) मकबरा
१५) दिपक
१७) माफी मागणारा
१९) उपस्थित
२०) नगरपाल
२२) पाय
२६) पडदा
२८) गळ्यामागचा अवयव
२९) उपयोग
३२) पळून जाणे
३३) सहाय्य
३५) झाकणाचे पात्र
३५अ) गावाची हद्द
३७) सुसर
३८) रंगविलेले
३९) पोते
४१) घर
४२) आजूबाजूला
४४) कार्य
४५) बाहू
४७) नगरवासी
४९) हिम
५१) कोकणातील एक दैवत
५२) विधवा
५३) मेणा, पालखी
५४) लोणच्यातील द्रवमसाला
५८) थंडावा
५९) पंख
६०) मजुर, कारखान्यात काम करणारा
६२) पुरुष
६४) केसांची कपाळावर आलेली लट
६७) विरोध, प्रतिबंध
६८) मालाची विक्री
६९) सापाची एक जात
७१) गावाखालची जमीन
७२) क्वचित बहुधा
७३) सवय, राबता
७४) पाढ्यातील सहा
७६) वजन, बोजा

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# महामानव विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वाहिली श्रद्धांजली

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. ८ :

कन्हान शहरात महामानव विश्वरत्न डॉ. बाबासाहेब यांचा महापरिनिर्वाण दिनी विविध संघटन द्वारे कार्यक्रमाचे आयोजन करुन श्रद्धांजली वाहण्यात आली.

**कन्हान - पिपरी नगर परिषद कार्यालय**

पिपरी नगर परिषद कार्यालय नवीन प्रशासकीय इमारत येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिना आदरांजली देऊन विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमात प्रामुख्याने उपस्थित नगराध्यक्षा सौ.करुणाताई आष्टनकर यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प हार अर्पण करून व दीप प्रज्वलन केले. नगर परिषद अधिकारी आणि कर्मचारी यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा प्रतिमेला पुष्प अर्पित करुन विनम्र अभिवादन केले. या प्रसंगी नगरसेविका संगीता खोब्रागडे, नप.कर्मचारी यतिन अहिरराव, आशीष आखाडे, अंकीत बोदेले, प्रिया शिरसाठ, देवीलाल ठाकूर, रविंद्र धोटे, कु. प्रांजली सांभारे, मनीषा लाहोरी, मयूर डफरे, नेहाल बढेल, अरविंद देशमुख, विठ्ठल खाटीक, स्वप्नील बेलेकर, अनिता यादव, विजयालक्ष्मी नायडू, रविंद्र पाहुणे, तेजस बोबडे, शुभम काळबांडे, शुभम येलमुले, गुलशन कटकवार, अंकित येलमुले, आशिक पात्रे, विपिन वाघमारे, वैभव गिरडकर, आकाश गिरडकर, गौरव गिरडकर सह आदि कर्मचारी उपस्थित होते.

**वराडा गावात महामानवाला वाहिली श्रद्धांजली**

पारशिवनी तालुक्यातील वराडा गावात महापरिनिर्वाण दिनी महामानव विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यक्रमात प्रामुख्याने उपस्थित वराडा ग्रामपंचायत सरपंच सुनिल जामदार, पोलीस पाटील संजय नेवारे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्प हार अर्पण करुन अभिवादन केले. सरपंच सुनिल जामदार यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवन चरित्र्यावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. गावकऱ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळ्याला पुष्प अर्पित करुन आणि दोन मिनटाचा मौन धारण करुन श्रद्धांजली अर्पित केली. या प्रसंगी उमेश मेश्राम, राहुल खोब्रागडे, अक्षय मेश्राम, सावन पाटील, हर्षल नेवारे, अक्षय लक्की, खुशाल पाटील, संजय मेश्राम, शिवदास डोंगरे, आयुष



गजभिए , रोशन जामदार, शिलाबाई पाटील, विध्याबाई रामटेके, सुनिता पाटील, पल्लवी गजभिए, चंद्रकला तानडेकर सह आदि नागरिक उपस्थित होते.

**समता सैनिक दल**

समता सैनिक दल कन्हान द्वारे महापरिनिर्वाण दिनी विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यक्रमात प्रामुख्याने उपस्थित सुशील कळमकर यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प हार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले . समता सैनिक दल सदस्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पित करुन दोन मिनटाचा मौन पाळुन श्रद्धांजली वाहण्यात आली. या प्रसंगी सारिका धारगावे, कल्पना पाटील, रेखा रामटेके, आशा शेंडे, इंदुबाई बेल्हेकर, चंद्रकला सांगोळे, मिराबाई गौरखेडे, प्रतिमा मेश्राम सह आदि सैनिक अधिकारी आणि भिमसैनिक उपस्थित होते.

**बहुजन समाज पार्टी**

विश्वरत्न भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार ड़ॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी बहुजन समाज पार्टी कन्हान च्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून दीप प्रज्वलन करून मानवंदना दिली. भदंत महाथेरो के.सी.एस लांबा, बहुजन समाज पार्टीचे नेते चंद्रशेखर भिमटे, कन्हान पोलीस उपनिरीक्षक प्रवीण हारगुडे, बहुजन समाज पार्टीचे रामटेक विधानसभा अध्यक्ष राजेश फुलझेले यांनी माल्यर्पण करून अभिवादन केले. सायंकाळी कॅन्डल मार्च रॅली गहुहिवरा चौक ते तारसा चौक महामार्गाने विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे भिम सैनिकांनी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून दीप प्रज्वलन करून मानवंदना दिली. याप्रसंगी जेष्ठ नेते चेतन मेश्राम, मनोज गोंडाने, नितीन मेश्राम, रोहित मानवटकर, अश्वमेघ पाटील, खुशाल बन्सोड, कन्हान शहर अध्यक्ष शरद मेश्राम, कार्याध्यक्ष संदिप शेंडे, बाबुलाल रामप्रसाद, सिद्धार्थ पानतावणे, महादेव पाटील, शैलेश दिवे, रविंद्र दुपारे, शैलेश माटे, कैलास बोरकर,आनंद चव्हान, प्रवीण सतदेवे, अनिल डोंगरे, धनविजय आई, दिवाळु मेश्राम,विजया निकोसे, अर्चिता फुलझेले , पिंकी मेश्राम, विशाखा ठमके, सारीका धारगावे, कुल्डकर ताई, अनिता देऊलकर, प्रतिभा चवरे, माया वाघमारे, शिला बागळे, जिजाबाई मानवटकर, बबिता मानवटकर यांच्या सह अनेक भीम सैनिकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना दिली.

**सार्वजनिक वाचनालय**

कन्हान शहरातील सार्वजनिक वाचनालयात ६८ व्या महापरिनिर्वाण दिनी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव विश्वरत्न रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष देवराव कावळे, प्रमुख अतिथी सुभाषराव घोगले व गंगाधरराव अवचट यांच्या हस्ते महामानव विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प हार अर्पण करुन कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. मान्यवरांनी, उदय पाटील, रमेश चव्हाण यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाविषयी आणि कार्याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमात उपस्थितांनी पुष्प अर्पण करुन दोन मिनिटे मौन पाळुन श्रद्धांजली अर्पण केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिनकरराव मस्के यांनी केले, सुत्र संचालन श्याम बारई ग्रंथपाल व आभार प्रदर्शन कृणाल कोल्हे लिपिक यांनी केले. या प्रसंगी मनोहर कोल्हे, प्रकाशराव नाईक, खानजोडे गुरुजी, रमण चव्हाण, अभिषेक निमजे, गौरव बोरो, आकाश गुप्ता, राहुल पारधी, सुरज जांगडेकर, अल्का कोल्हे, सानवी वानखेडे, कृष्णाली कोल्हे, रोहित हटवार, अमीरात भूल, आदित्य श्रीरामे, पियुष दिगपती, कस्तुरी कोल्हे, वैभव गिरडकर, युवानी कोल्हे आदि नागरिक उपस्थित होते.

**संघपाल सामाजिक संस्था रायनगर**

संघपाल सामाजिक संस्था रायनगर कन्हान द्वारे बोधीसत्व परम पूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरनिर्वाण दिवस निमित्त कार्यक्रमाचे आयोजन आंबेडकर चौक येथे करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष वासुदेव नाईक यांच्या हस्ते विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

या प्रसंगी विश्वनाथ पोहरे, महेंद्र बेलेकर, भारत पगारे, रिंकेश चवरे शैलेश शेळके, हर्ष पाटील, सुकेशिनी बागडे, प्रतिभा उके, कांता नाईक, शिला पगारे, संध्या बेलेकर, इंद्रायणी पाटील, रमा भिलावे, प्रतीक्षा चवरे, पौर्णिमा सोमकूवर, कविता मेश्राम, कुसुम गोटवाड, पुष्पकला रामटेके, भावना वानखेडे, विमल वानखेडे, सविता घरडे, शांता चवरे, वैष्णवी गडपायले, शालिनी राऊत, इंदुबाई राऊत सह आदि नागरिक उपस्थित होते.

**भाजपा कन्हान शहर आणि अनुसूचित जाती मोर्चा**

भाजपा द्वारे भारतरत्न बोधीसत्व परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिवस निमित्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात प्रामुख्याने उपस्थित भाजपा कन्हान शहर अध्यक्ष विनोद किरपान आणि अनुसुचित जाती मोर्चा शहर अध्यक्ष अमन घोडेस्वार यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प हार अर्पण करुन मान वंदना देण्यात आली . या प्रसंगी डॉ मनोहर पाठक रिंकेश चवरे , शैलेश शेळके, नगरसेवक राजेन्द्र शेंद्रे, सुनील लाडेकर, महेंद्र साबरे, नगरसेविका अनिता पाटील, संगीता खोब्रागडे, सुषमा चोपकर, प्रतीक्षा चवरे, महेंद्र चव्हाण, हर्ष पाटिल, दीपंकर गजभिये, सचिन वासनिक, आकाश पंड़ितकर, चंद्रहास पूरे, सचिन खडसे, राजेन्द्र हटवार आदि भाजपा कार्यकर्ता आणि नागरिक उपस्थित होते.

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे महापरिनिर्वाण दिन



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ८ :

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने वाडी येथील डॉ. बाबासाहेब स्मारक परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास माल्यार्पण करून मानवंदना देण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष संतोष नरवाडे, माजी नगरसेवक राजेश जयस्वाल, सुरेंद्र मोरे, शहर अध्यक्ष वसंतराव ईखनकर, भिमराव मेश्राम, आशिष गौरखेडे, कमलेश विजयकर, साजन पाटील, संदीप भारसागळे, स्वप्नील हेंडवे, संजय बन्सोड, अंकीत खोब्रागडे, अंकुश वानखेडे उपस्थित होते.

## ब्राह्मणीत युवकाचा गळफास घेऊन मृत्यु

■ महासागर प्रतिनिधी
कळमेश्वर, दि. ८ :

कळमेश्वर ब्राह्मणी शहरांमधील ब्राह्मणी रामनगर वार्ड नं ४ येथील २० वर्षे युवकाने ता. ७ डिसें ला सायंकाळी ५.३० वा. दरम्यान गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. कृणाल नरेश कांबळे वय २० वर्ष रा कळमेश्वर ब्राह्मणी रामनगर वार्ड नं ४ मृतक युवकाचे नाव आहे हा युवक स्वामीनारायण कॉलेज काटोल रोड घोगली येथे बी टेक कम्प्युटर च्या दुसऱ्या वर्षाला शिकत होता गेल्या २ वर्षापासून त्याला त्वचेचा आजार जडला होता व औषधोपचार सुरू होते त्याचा आजारपणामुळे अभ्यास होत नसल्यामुळे तो नेहमी चिंतित राहत होता ७ डिसेंबरला सायंकाळी ५.३० वाजता दरम्यान त्याने स्वयंपाक घरातील फाट्याला दुपट्ट्याने बांधून गळफास घेऊन आत्महत्या केली याप्रकरणी कळमेश्वर पोलिसांनी आकस्मित मृत्यूची नोंद केली.

## बालाजी पाटील हायस्कूल येथे महामानवास वाहिली आदरांजली




■ महासागर प्रतिनिधी
कुही, दि. ८ :

आधुनिक भारताचे प्रमुख शिल्पकार, भारतीय संविधानाचे निमार्ते, युगप्रवर्तक, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विद्यार्थ्यांचे प्रचंड प्रेरणास्त्रोत आहेत. बाबासाहेबांनी शिका, संघटित व्हा, आणि संघर्ष करा असा मुलमंत्र दिला, असे मौलिक मार्गदर्शन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाणदिन कार्यक्रमा प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष चंद्रकांत दडमल यांनी केले.

याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शाळेतील ज्येष्ठ शिक्षक जितेंद्र निनावे, यशवंत चव्हाण, चंद्रशेखर बन्सोड, वानखेडे सर, सेवानिवृत्त शिक्षक वसंतराव भोज उपस्थित होते. बन्सोड सर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकून आपल्या मधुर वाणीने गीतातून अभिवादन केले. तसेच जेष्ठ शिक्षक जितेंद्र निनावे आणि सिमरण लोखंडे यांनी आपल्या भाषणातून मनोगत व्यक्त केले.

## रामटेक येथे सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे बाबासाहेबांना अभिवादन

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ८ :

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त रामटेक येथील सुपर मार्केटमध्ये भिमसंग्राम सेनेतर्फे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बाबासाहेबांना अभिवादन करण्यात आले. सांस्कृतिक कार्यक्रमात कव्वाल भीमेश भारती, नागपूर आणि कव्वाल प्रज्ञा कीर्ती, नागपूर यांनी बाबासाहेबांच्या जीवनावरील संगीतमय गीते सादर केली. भीमसंग्राम सेनेचे संस्थापक अध्यक्ष भागवत सहारे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

यावेळी कार्यक्रमाचे उदघाटन नत्थुजी मेश्राम यांचे हस्ते करण्यात




आले. यावेळी उच्च न्यायालयाचे अधिवक्ता ॲड. प्रफुल्ल अंबादे, माजी नगरसेवक संजय बिसमोगरे, राजेश शाहु, शाहीर राजेंद्र बावनकुळे, हेमराज चोखांद्रे, हरीभाऊ अपराजीत, अनिल वाघमारे, जगदीश सांगोडे, नीलकमल भरणे, नितीन कराडे सह आदी उपस्थित होते. भिमगीतांचा संगीतमय कार्यक्रमाला हजारोंच्या संख्येने उपासक व उपासीका उपस्थीत होते. कार्यक्राच्या यशस्वीतेसाठी दीपक गजभिये, विकास मेश्राम, रवींद्र कांबळे, डॉ.दीपांकर नागरे, युवराज अडकणे सह आदींनी प्रयत्न केले.

## मांढळ येथे संताजी जगनाडे जयंती साजरी

■ महासागर प्रतिनिधी
कुही, दि. ८ :

संत शिरोमणी श्री संताजी जगनाडे महाराज यांची 400 वी जयंती श्री संत जगनाडे महाराज चौक वडेगाव रोड, मांढळ येथे साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला जगनाडे महाराजांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. मांढळ ग्राम पंचायत सरपंच सोनू ताई निरगुडकर यांच्या हस्ते फोटोचे पूजन करण्यात आले. प्रसंगी तैलिक महासभा कुही तालुका महिला आघाडी अध्यक्ष संगीता पडोळे यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, समाजाने संघटित असले पाहिजे. तेव्हाच समाजाच्या कार्याला गती येईल. संताजींची



प्रेरणा घेऊन प्रत्येक समाजबांधवाने समाजाप्रती आपले कार्य करीत राहावे असे म्हणाल्या. तसेच सामाजिक कार्यकर्ते विनय गजभिये सर यांनी थोर संत संताजी महाराज यांच्या विषयी विचार व्यक्त केले.

कार्यक्रमाला सरपंच सोनूताई निरगुडकर, अध्यक्षा कुही तालुका महिला आघाडी संगीताताई पडोळे, अध्यक्ष तेली समाज पंचकमेटी मांढळ नरेंद्र बारई, सामाजिक कार्यकर्ता विनय गजभिये, माजी जिल्हा परिषद सदस्य, उपासराव भुते, उपसरपंच सुधीर पिल्लेवान, उपाध्यक्ष कुही तालुका महिला आघाडी सीमा कुर्जेकर, सहसचिव रंजना वैद्य, अध्यक्ष मांढळ शहर महिला आघाडी गीता मेश्राम, सचिव मांढळ शहर सुषमा मेश्राम, ग्रामपंचायत सदस्य मीना मेश्राम, कृष्णा गवळी, गणेश देशमुख, तेली समाज यशस्वी उद्योजक अजय निरगुडकर, वसंता पडोळे, बाबाराव चकोले, धनराज वैद्य, गौतमजी वाघमारे, अरुण मेश्राम, रामाजी कळंबे, कैलास गवळी, नितीन शेंद्रे, महादेव कळंबे, धोंडू मेश्राम, श्री नत्तूजी शेंद्रे, श्री सितारामजी कळंबे, गोमाजी गोटेफोडे, रोषण गवळी, शेषराव कळंबे, बंडु देशमुख, केशव रेहपाडे, नरेंद्र हजारे, सुनील कोंनडेवार, चंदु कळंबे, भुमिपाल महाकाळकर सर्व समाज बांधव उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रंजना वैद्य, सुषमा मेश्राम, गीता मेश्राम, सीमा कुर्जेकर आदींनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे संचालन नरेंद्र बारई यांनी केले.

## संत जगनाडे महाराज यांची जयंती साजरी

■ महासागर प्रतिनिधी
भिवापूर, दि. ८ :

एरडेल तेली समाज वतीने तेलीपुरा येथे संत शिरोमणी जगनाडे महाराज यांची जयंती आज दि. ८ डिसेंबरला सकाळी ११ वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत साजरी करण्यात आली. तेलीपुरा येथे आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विदर्भ कार्यकारणी सदस्य मनोज सहारे, अतिथी म्हणून भाजपा युवा मोर्चा जिल्हा महामंत्री रोहीत पारवे, नक्षी ग्रामपंचायत सरपंच अनिकेत वराडे, गुलाब साखरकर, खंटु साखरकर, ॲड. प्रभाकर नागोशे, डॉ. रामभाऊ, पत्रकार शरद मिरे, राजेश जांभुळे नागोशे, कलाबाई नागोशे, कुसूम सहारे प्रारंभी मान्यवराच्या हस्ते दिप प्रज्वलन करून संत जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले.

## पाण्याच्या डबक्यात पडुन बालकाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. ८ :

खेळता खेळता घराजवळ असलेल्या पाण्याच्या डबक्यात पडुन दीड वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू झाला. ही घटना सकाळी ६:३० वाजताच्या सुमारास नेरी मानकर ग्राम पंचायत अंतर्गत किन्ही गावाजवळ असलेल्या अंकुर सिड्स कारखान्यातील कामगार क्वार्टर परिसरात घडली. यादी जितेन नान्हे वय दीड वर्ष असे या चिमुकल्याचे नाव असून

त्याचे वडील जितेन गुलबचंद नान्हे, वय २८ वर्ष, हे किन्ही गावात अंकुर सिड्स कंपनी मध्ये कामाला असून करखान्याशेजारी असलेल्या क्वार्टरमध्ये कुटुंबासह राहतात. आज स. ६:३० वाजता आईवडील कामात व्यस्त असताना मुलगा खेळता खेळता घराचे जवळच असलेल्या दोन फुट खोल पाण्याचे टाक्यात पडुन बेशुध्द झाला. आईवडिलांनी शेजाऱ्याच्या मदतीने त्याला बाहेर काढुन उपचाराकरीता हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्याला मृत घोषीत केले.

## हिवरकर महाविद्यालयात महापरिनिर्वाणदिन साजरा



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ८ :

दत्तवाडी येथील हिवरकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या प्रांगणात परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरीनिर्वाण दिन कॉलेजचे अध्यक्ष डॉ. प्रकाश हिवरकर यांच्या अध्यक्षतेखाली प्राचार्या डॉ. लता खापरे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

अमन गजभिये या विद्यार्थ्यांनी हृदय स्पर्श गीत सादर केले. प्रा.शुभांगी बनसोड व प्रा.विद्या साखरे यांनी आपल्या भाषणातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर प्रकाश टाकला.विद्यार्थी व शिक्षक यांनी महापरीनिर्वाण दिनानिमित्त भाषण दिले. कार्यक्रमाचे संचालन प्रीती कुनजनारे, व आभार प्रदर्शन श्रावणी वानखेडे या विद्यार्थिनीनी केले.

यावेळी राष्ट्रीय सेवेचे अधिकारी प्रा. राजेश्वरी सांगोलकर, स्वयंसेवक. प्रा.छाया गणवीर, प्रा.निशा पिसे, प्रा.स्नेहा मेहेरे, प्रा.गीता भगत, प्रा.प्रतिभा भागवत, प्रा.साक्षी तैले, ग्रंथपाल यामीनी, सहायक ग्रंथपाल अवंतिका वानखेडे, प्रा.अंकित जगताप तसेच सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

## निधन

**मनीष पडोडे**



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ८ :

आदर्शवाडी रहीवाशी मनीष महादेव पडोडे यांचे अपघाती निधन झाले.ते ३२ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, आई, वडील, चार वर्षाचा मूलगा, दोन वर्षाची मुलगी व आप्त परिवार आहे. त्यांच्या पाथीर्वावर रविवारी टेकडीवाडी स्मशान भुमीत अंत्यसंस्कार करण्यात आला.

## श्री नरेंद्र तिडके कला व वाणिज्य महाविद्यालय संविधान दिन साजरा




■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ८ :

श्री नरेंद्र तिडके कला व वाणिज्य महाविद्यालय रामटेक येथे सविधान अमृत महोत्सव सन निमित्त संविधान प्रस्ताविकेचे वाचन करण्यात आले. भारतीय संविधानाचे तत्वज्ञान, मानवीय मूल्य, आदर्श, व संविधान निर्मितीच्या उद्देश स्पष्ट करण्याकरिता संविधान उद्देशिकाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. यास्तव भारतीय राज्यघटने बाबत नागरिकात व विद्यार्थ्यात जागरूकता वाढविण्यासाठी भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षात दिनांक 26 नोव्हेंबर 2024 ला महाविद्यालयात भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. संविधान उद्देशिका वाचन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद पोकळे होतें.

# संत जगनाडे महाराज यांना अभिवादन

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. ८ :

संताजी ब्रिगेड महिला क्रांती कन्हान शहर द्वारे संत जगनाडे महाराज यांना अभिवादन करण्यात आले.

मानवतेची शिकवण देणारे थोर संत जगनाडे महाराज यांच्या ४०० व्या जयंती निमित्त संताजी ब्रिगेड महिला क्रांती कन्हान शहर द्वारे कार्यक्रमाचे आयोजन संताजी मंगल कार्यालय येथे संताच्या मंदिरात करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष सौ.मीना कळंबे, जिल्हा परिषद




सदस्य व्यकटेश कारेमोरे, अमोल साकोरे यांच्या हस्ते संत जगनाडे महाराज, संत तुकाराम महाराज , विठ्ठल रुक्मिणी यांच्या प्रतिमेला पुष्प हार अर्पण करुन कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली.

यावेळी रंजनी किरपान, सुषमा मस्के, सुनंदा दिवटे, सुनिता लिल्हारे, यांनी संत जगनाडे महाराज यांचा जीवन चरित्र्यावर उपस्थितांना मार्गदर्शन करुन शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमात प्रामुख्याने उपस्थित नागरिकांनी संत जगनाडे महाराज, संत तुकाराम महाराज, विठ्ठल रुक्मिणी यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पित करुन विनम्र अभिवादन केले. मिठाई वाटप करुन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाचे सुत्र संचालन आणि आभार प्रदर्शन सुरेश कळंबे यांनी केले.

या प्रसंगी नगरसेविका सुषमा चोपकर, संगीता खोब्रागडे, सुनिल लाडेकर, विनोद किरपान, शैलेश शेळकी, मयुर माटे, ऋषभ बावनकर, महेंद्र साबरे, रिंकेश चवरे, सचिन वासनिक, संजय रंगारी, राजेंद्र शेंदरे, आकाश वाडणकर, निलकंठ मस्के, इंदल यादव, सौरभ डोणेकर, मनोज कुरडकर, चंदु पानतावने सह आदि नागरिक उपस्थित होते.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# अस्मिता

मानिनी

**शिक्षिका असलेल्या मेघालयाच्या त्रिनिती साईऊ यांनी वेगळ्या प्रजातीच्या हळदीचं पीक घ्यायला सुरूवात केली. यातून त्यांना बराच आर्थिक लाभ झाला. त्रिनिती यांचं यश पाहून मेघालयातल्या बऱ्याच शेतकऱ्यांना हळदीच्या नव्या प्रजातीबाबत उत्सुकता निर्माण झाली. त्रिनिती यांच्या प्रयत्नांनी जवळपास ९०० शेतकरी या प्रजातीच्या हळदीच्या लागवडीकडे वळले आहेत.**

## शेतकऱ्यांना दाखवली नवी वाट

त्रिनिती साईऊ या व्यवसायाने शिक्षिका. २००३ मध्ये त्यांनी कुटुंबाला शेतीच्या कामात मदत करायचं ठरवलं. त्यांच्या शेतात हळदीची लागवड होत असे. आपण टाकलेलं हे छोटंसं पाऊल भविष्यात मेघालयमधल्या तब्बल ९०० शेतकऱ्यांचं आयुष्य बदलून टाकणारं ठरेल याची त्यांना अजिबात कल्पना नव्हती. सोळा वर्षांपूर्वी त्यांनी हळदीच्या लागवडीला सुरूवात केली तेव्हा या राज्यातल्या 'पश्चिम जैन्तिया' जिल्ह्यात होणाऱ्या हळदीच्या लागवडीपैकी 'लाचेन' या प्रजातीचं पीक मोठ्या प्रमाणावर घेतलं जायचं. 'लाचेन' ही हळदीच्या तीन प्रजातींपैकी एक. त्रिनितीने आपल्या पूर्वजांकडून हळदीच्या शेतीचं ज्ञान मिळवलं होतं. उत्पादकता कमी असलेल्या 'लाचेन'मध्ये कॅन्सरला प्रतिबंध करणारा 'करक्युमिन' नावाचा घटक असल्याचं तिला माहीत होतं. याबाबत तिने अधिक संशोधन केलं. 'लाकाडोन' ही प्रजाती 'लाचेन'पेक्षा अधिक प्रभावी असल्याचं तिच्या लक्षात आलं. जुन्या काळात मेघालयात हळदीचं हेच पीक घेतलं जायचं. मात्र काळाच्या ओघात या प्रजातीची शेती कमी झाली.

'लाकाडोन'मध्ये 'करक्युमिन'चं प्रमाण सात टक्के म्हणजे 'लाचेन'पेक्षा दोन टक्क्यांनी अधिक असल्याचंही तिला कळलं. त्रिनितीने या प्रजातीची लागवड करायला सुरूवात केली. तिच्या कुटुंबांचं उत्पन्न आधीच्या तुलनेत तिपटीने वाढलं. बऱ्याच शेतकऱ्यांना आणि त्यातही महिलांना याबाबत कुतुहल वाटलं. यातूनच 'लाकाडोन'च्या शेतीचं प्रशिक्षण देण्याची कल्पना त्रिनिती आणि तिथल्या मसाले महामंडळाला सुचली आणि काही काळानंतर 'लाकाडोन'च्या लागवडीत बरीच वाढ झाली. त्रिनिती आणि 'लाकाडोन'ची ख्याती आसपासच्या गावांमध्ये पसरली. गावच्या प्रमुखांनी त्रिनितीला शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्याचं आमंत्रण दिलं.

काही वर्षांपूर्वीपर्यंत मेघालयातले शेतकरी 'लाकाडोन'चं उत्पादन घ्यायचे. मात्र २० वर्षांपूर्वी ते कोळसा खाणींकडे वळले. यातून भरपूर उत्पादन मिळत असल्याने त्यांचं शेतीकडे दुर्लक्ष झालं. परिणामी, हळदीच्या या प्रजातीचं उत्पन्न घटल्याचं त्रिनिती सांगते. २०१४ मध्ये राष्ट्रीय हरित लावादाने कोळसा खाणींवर बंदी आणली आणि शेतकरी पुन्हा हळदीच्या लागवडीकडे वळले. मात्र 'लाकाडोन'च्या शेतीचं तंत्र अवगत नसल्याने त्यांची 'लाचेन'च्या शेतीला सुरूवात केली. 'लाचेन'ची उत्पादकता कमी असल्यामुळे शेतकऱ्यांना उदरनिर्वाह करणंही कठीण होऊ लागलं. हळदीच्या लागवडीला सुरूवात करण्याआधी त्रिनितीने मेघालयाच्या कृषी आणि पशुपालन विभागाकडून प्रशिक्षण घेतलं. गावातल्या शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी मसाले महामंडळासोबत सहकार्य केलं. शेतकऱ्यांना अनुदान मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. या दरम्यान बऱ्याच आव्हानांना सामोरं जावं लागूनही तिने प्रयत्न सुरूच ठेवले. २०२३ पर्यंत एकूण ५० हजार टन हळदीचं उत्पन्न घेण्याचं ध्येय तिने समोर ठेवलं आहे. मेघालयातल्या शेतकऱ्यांना अर्थिक सुबत्ता मिळवून देणाऱ्या त्रिनितीचे प्रयत्न निश्चितच वाखाणण्याजोगे आहेत.



टेक केअर

### 'हेअर ट्रान्सप्लांट' करण्याआधी...


केस गळल्यामुळे डोक्याच्या काही भागावर थोड्या फार प्रमाणात टक्कल पडतं. यावर उपाय म्हणजे 'हेअर ट्रान्सप्लांट'. आजकाल बऱ्याच महिला हा पर्याय निवडतात. याचे अनेक लाभ असले तरी ही प्रक्रिया करून घेण्याआधी काही गोष्टींकडे लक्ष द्यायला हवं. ट्रान्सप्लांट करण्याआधी केस स्वच्छ धुवून घ्या. यामुळे जंतूसंसर्गाचा धोका कमी होतो. शस्त्रक्रियेच्या दिवशी मोकळेढाकळे कपडे घाला. डोक्यावर स्कार्फ बांधू नका. मधुमेहींनी या प्रक्रियेआधी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. हेअर ट्रान्सप्लांट ही शस्त्रक्रिया असल्याने योग्य ती खबरदारी घेऊनच पुढे जायला हवं.



मेक अप

### डोळ्यांच्या आकारानुसार करा मेक अप

डोळ्यांचा मेक अप खूप महत्त्वाचा मानला जातो. प्रत्येकीच्या डोळ्यांचा आकार वेगळा असल्याने एकाच पद्धतीचा मेक अप शोभून दिसत नाही. डोळे काहीसे रुंद किंवा लांब असतील तर बाहेरच्या कडांच्या मेक अपवर जास्त भर द्या. डोळ्यांमधलं अंतर कमी असेल तर स्मोकी मेक अप शोभून दिसेल. डोळ्यांचा आकार छोटा असेल तर पेल, शिमर आयशॅडो लावा.



हेल्दी लाईफ

### असं आहे 'क्विंन्वा'



भारतात सध्या परदेशी धान्य खाण्याचा ट्रेंड वाढतो आहे. 'क्विन्वा' हे असंच एक धान्य. दक्षिण अमेरिकेतलं हे धान्य आता भारतातही लोकप्रिय झालं आहे. 'क्विन्वा' ग्लुटेन फ्री असल्यामुळे बरेचजण खातात. यात नऊ प्रकारचे अमिनो ॲसिड्स असतात. पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि कॅल्शियमसारखे पोषक घटक असतात. हे धान्य सकाळी खाल्लं तर वजन कमी व्हायला मदत होते. हाडांच्या बळकटीसाठी क्विन्वा खाता येईल. यात 'ई' जीवनसत्त्वही मुबलक प्रमाणात असतं.

## प्रौढावस्थेतील फिटनेस

फिटनेस फंडा

संपूर्ण घरादाराच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या महिला स्वत:च्या आरोग्याप्रती कमालीची अनास्था बाळगतात हे सर्वजण जाणतात. म्हणूनच प्रौढावस्थेत त्यांना विविध त्रासांना सामोरं जावं लागतं. या वयात त्यांची पचनशक्ती दगा द्यायला लागते. एकीकडे चयापचय क्रियेचा वेग मंदावणं आणि दुसरीकडे व्यायामाचा अभाव यामुळे परिस्थिती बिकट बनते. म्हणूनच हा त्रास टाळण्यासाठी काही उपाय योजायला हवेत.

* चाळिशीनंतर महिलांना उच्च रक्तदाब होण्याची शक्यता असते. या वयात त्यांच्या चयापचय क्रियेचा वेगही मंदावतो. पण विविध धान्यांच्या सेवनानं या दोन्हींचा सामना करणं शक्य होतं. खरं तर तिशीनंतरच टप्याटप्यानं चयापचय क्रिया मंदावण्याची प्रक्रिया सुरू होते. त्यामुळे पांढरा ब्रेड किंवा पांढरा भात याऐवजी महिलांनी ब्राउन राईस, व्हिट ब्रेड किंवा ओट्स खायला हवेत. यामुळे शरीराला फायबर मिळेल. फायबरमुळे वजन वाढण्याला प्रतिबंध होतो आणि वजन कमी व्हायलाही मदत होते.

* आहारात फळं आणि हिरव्या भाज्यांचा समावेश करायला हवा. सॅलेड, कोशिंबिरी हासुद्धा फायबरचा एक चांगला स्रोत आहे. पालक, गाजर, काकडी, टॉमेटो, संत्री, स्ट्रॉबेरी अशा पदार्थांचं सेवनही महत्त्वाचं ठरतं.

* फायबरबरोबर पोटॅशियम, क जीवनसत्व आणि अँटीऑक्सिडंट्सही या पदार्थांमधून विपुल प्रमाणात मिळतात. यामुळे त्वचाही चांगली राहते व सूर्याच्या अतिनील किरणांपासून त्वचेचा बचाव होतो.

* आहारातलं मीठाचं प्रमाण कमी करायला हवं. मीठामुळे शरीरात पाणी साचून राहतं आणि उच्च रक्तदाबाची समस्या निर्माण होऊ शकते. त्याबरोबर किडनी, धमन्या, हृदय, मेंदू यांनाही धोका पोहचू शकतो.

* जास्त साखरेचं सेवनही धोक्याचं ठरतं. चाळिशीनंतर मधुमेहाचाही धोका वाढतो. त्यामुळे शक्यतो साखर आणि गोड पदार्थ टाळावेत. साखर जास्त प्रमाणात खाल्यानं तुम्ही वयस्कर दिसू लागता.



## ट्रेंड 'ऑक्सडाइज्ड ज्वेलरी'चा

स्टाईल स्टेटमेंट

मैत्रिणींनो, तुम्ही सोनं, चांदी किंवा मोत्याचे दागिने घालत असाल तर जरा बाजूलाच ठेवा. कारण सध्या 'ऑक्सडाइज्ड ज्वेलरी'चा ट्रेंड आहे. अत्यंत स्टायलिश अशी ही ज्वेलरी वेस्टर्न आणि भारतीय अशा दोन्ही प्रकारच्या पेहरावांवर शोभून दिसते. तुम्ही झुमके, नेकलेस, बांगड्या, अंगठी, नोजपिन असं बरंच काही कॅरी करू शकता. यातला प्रत्येक दागिना वेगवेगळ्या पेहरावांवर आणि हटके पद्धतीने घालता येईल. ऑक्सडाइज्ड दागिने स्टाईल करण्याच्या या काही टिप्स...

* ऑक्सडाइज्ड बांगड्या कोणत्याही पाश्चात्य पेहरावावर शोभून दिसतील. कॅज्युअल ऑकेजनपासून लग्नसमारंभापर्यंत, या बांगड्या कोणत्याही कार्यक्रमाची शान ठरतील. वेस्टर्न पेहरावावर एखादं कडं किंवा बांगडी चांगली दिसेल. भारतीय पोशाखासोबत बांगड्यांचं छान कॉम्बिनेशन करता येईल.



* इंडो वेस्टर्न लूकसाठी झुमके कॅरी करा. जंपसूट, मॅक्सी ड्रेस किंवा कुर्त्यावरही ते छान दिसतील. वेगवेगळ्या आकाराचे आणि स्टाईलचे झुमके बाजारात मिळतात. हे झुमके साडीवर विशेष खुलून दिसतील.

* सध्या ठसठशीत,मोठ्या आकाराच्या अंगठ्यांचा ट्रेंड आहे. या अंगठ्या वेस्टर्न आणि इंडियन अशा दोन्ही पेहरावांवर शोभून दिसतील. ऑक्सडाइज्ड अंगठ्यांची भन्नाट डिझाइन्स तुमचं लक्ष वेधून घेतील.

* पलाझो, क्रॉप्ड ट्राउझर आणि शॉर्ट ड्रेसवर 'ब्लॅक लीफ अँकलेट्स' घाला. या अँकलेट्समुळे तुम्ही फॅशनिस्टा दिसाल.


* 'ऑक्सडाइज्ड बेल्ट' हा प्रकार ट्राय करून बघा. स्कर्ट, इव्हिनिंग गाउन, मॅक्सी ड्रेसवर तो शोभून दिसेल. साडीवर कंबरपट्टा म्हणून त्याचा वापर करता येईल.

## लोकेशन ट्रॅक होऊ नये म्हणून...

व्हा टेक सॅव्ही

स्मार्टफोनचं तुमच्या प्रत्येक हालचालीकडे लक्ष असतं. यातल्या लोकेशन फीचरमुळे तुमचा ठावठिकाणा कळतो. इतकंच नाही, तर फोनमधली बरीच ॲप्स तुमचं 'रिअल टाईम लोकेशन' टिपत असतात. फोनमधलं लोकेशन ऑन ठेवल्याने 'गुगल मॅप' किंवा इतर सुविधा वापरता येत असल्या तरी आपली माहिती इतरांपर्यंत पोहचू नये असं वाटत असेल तर तुम्ही 'लोकेशन फीचर' ऑफ करू शकता. विविध ॲप्स लोकेशन जाणून घ्यायची परवानगी मागतात. अजाणतेपणी आपणही ती देऊन टाकतो. मात्र याचा नंतर त्रास होतो.

अँड्रॉइड फोनवर 'लोकेशन ऑफ' करण्यासाठी 'फोन सेटिंग्ज'मध्ये जाऊन गुगलवर टॅप करा. यानंतर 'गुगल अकाउंट'मध्ये जा. आता 'डेटा अँड पर्सनलायजेशन' हा पर्याय निवडा. यानंतर 'लोकेशन हिस्ट्री'वर टॅप करून 'स्वीच ऑफ' करा. या 'लोकेशन हिस्ट्री'च्या खाली दिलेल्या 'डिलिट लोकेशन हिस्ट्री'वर टॅप करून हिस्ट्री डिलिट करून टाका. 'वेब अँड ॲप ॲक्टिव्हिटी' ऑफ करण्यासाठी कॉम्प्युटरच्या 'ॲक्टिव्हिटी कंट्रोल' पेजवर जा. यानंतर तुम्हाला गुगल अकाउंटमध्ये लॉग इन करावं लागेल. इथून 'वेब अँड ॲप ॲक्टिव्हिटी' ऑफ करता येईल.




काही ॲप्स लोकेशनच्या परवानगीशिवाय नीट काम करत नाहीत. अशाच ॲप्सना लोकेशनची परवानगी द्या. सर्व ॲप्सना लोकेशनची परवानगी देण्याची गरज नाही.

## पर्याय 'पीव्हीसी'चा

स्कील डेव्हलपमेंट

'प्रोफेशनल व्हर्च्युअल कन्सल्टींग' अर्थात 'पीव्हीसी'चा पर्याय विशिष्ट व्यावसायिकांसाठी आहे. काही कारणांमुळे पूर्णवेळ नोकरी पत्करू न शकणाऱ्या व्यावसायिक आणि अनुभवी महिला पीव्हीसीची निवड करू शकतात. यात फोन किंवा स्काईपच्या माध्यमातून कंपन्या किंवा संबंधित क्षेत्रातल्या नवख्या व्यावसायिकांचे सल्लागार म्हणून काम करायचं असतं. समुपदेशन, ठराविक विषयांचे प्रशिक्षक, कायदा, अर्थ, मालमत्ता आदी क्षेत्रातल्या तज्ज्ञ महिलांना या क्षेत्रात अनेक संधी उपलब्ध आहेत.



'प्रोफेशनल व्हर्च्युअल कंसल्टंट' म्हणून काम करताना तुम्हाला 'व्हर्च्युअल कन्सल्टन्सी' सुरू करायची असते. या क्षेत्रात प्रगती करण्यासाठी सोशल मीडियावर तुमचं अस्तित्त्व निर्माण करा. लोकांपर्यंत पोहोचा आणि तुमच्या कामाला सुरूवात करा. सुरूवातीच्या टप्प्यात जाहिरात करण्याचा पर्याय तुम्ही निवडू शकता. मात्र त्यानंतर 'माउथ पब्लिसिटी'च्या बळावर तुम्हाला पुढे जायचं असतं, हे लक्षात ठेवा. तुमच्या नैपुण्याच्या विषयानुसार या क्षेत्रात संधी आहेत. शैक्षणिक समुपदेशकांनी शाळा, महाविद्यालयं, शैक्षणिक संस्था, पालक संघटना यांच्याशी संपर्क साधायला हवा. आर्थिक सल्लागारांनी काही ब्लॉग्जवर जाहिराती करायला हरकत नाही. तुमच्या क्षेत्रानुसार विविध माध्यमांची निवड करून लोकांपर्यंत पोहोचा.

## रुचकर शांतिनिकेतन डाळ

रसगंधा

तुम्हाला प्रांतोप्रांतीच्या रुचकर डिशेस बनवायला आवडतात? चला तर, आज बंगाली खाद्यसंस्कृतीत महत्त्वपूर्ण स्थानी असणारी शांतिनिकेतन डाळ तयार करू.

**साहित्य:** एक वाटी मसूर डाळ, एक छोटा कांदा, दोन ते तीन लसूण पाकळ्या, फोडणीसाठी मेथी, जिरं, मोहरी, बडीशेप आणि कलौंजी, एक सुकी मिरची, मोहरीचं तेल, चवीनुसार मीठ इत्यादी.



**कृती:** सर्वप्रथम चिमूटभर हळद आणि दोन वाट्या पाणी घेऊन त्यात डाळ शिजत ठेवावी. दुसरीकडे, लसूण ठेचून तर कांदा उभा चिरुन घ्यावा. डाळ शिजत आली की कढईत फोडणी करावी. त्यासाठी मोहरीचं तेल चांगलं गरम करावं. त्यात मेथ्या, जिरं, मोहरी, बडीशेप आणि कलौंजी घालावी. सुक्या मिरचीचे तुकडे टाकावेत. ते तडतडले की लसूण आणि कांदा घालून चांगला परतून घ्यावा. शिजलेल्या डाळीवर हा तडका द्यावा आणि चवीनुसार मीठ घालून एक उकळी येऊ द्यावी. भात अथवा पोळीबरोबर ही डाळ सर्व्ह करावी.

## विसंवाद संपवून टाक

समुपदेशन

मी चाळिशीच्या उंबरठ्यावरील महिला आहे. लग्नानंतर एक वर्ष मी एकत्र कुटुंबात राहिले, पण नंतर आम्ही वेगळे झालो. सासू-सासऱ्यांशी विसंवाद असल्यामुळे मी कधीच त्यांना आमच्या घरात स्थान दिलं नाही. उतारवयातही त्यांचा स्वभाव तसाच विक्षिप्त होता. त्यामुळे त्या दोघांना अखेरपर्यंत वृद्धापश्रमातच ठेवण्याचा माझा निर्णय आहे. पण या निर्णयामुळे आता मला माझ्या वृद्ध माता-पित्यांनाही आमच्या घरी रहायला आणता येत नाही. मी हा विषय काढला की पतीची बोलणी खावी लागतात. माझे आई-वडिल नाही तर तुझेही इथे आणायचे नाहीत, असं तो म्हणतो. पण माझ्या आई-बाबांना खरोखर आधाराची गरज आहे. मी त्यांना एकटं सोडू शकत नाही. काय करु? पतीला कसं समजावू?



– सखी, ऐकून वाईट वाटेल पण मला तुझा स्वभाव काहीसा स्वार्थी आणि विचार एकांगी वाटत आहेत. तू वृद्ध सासू-सासऱ्यांवर सगळे दोषारोप करुन स्वत:ला बंधनमुक्त ठेवण्याचा प्रयत्न करत आहेस. असं असूनही पतीने आपल्या माता-पित्यांना मात्र घरात आसरा द्यावा अशी तुझी इच्छा आहे. पण पतीच्या मनात या गोष्टीचा राग असेल तर हा प्रश्न इतक्या सहजासहजी सुटणार नाही हे समजून घे. मुख्य म्हणजे माता-पित्यांइतकी तुझ्या सासू-सासऱ्यांनाही आधाराची गरज आहे हे तू जाणून घ्यायला हवं. त्यामुळे विवेकपूर्वक निर्णय घे. या चौघांचीही जबाबदारी आपली आहे हे मनाला समजावं आणि घरात अथवा एखाद्या चांगल्या ठिकाणी त्यांची सगळी व्यवस्था लावून दे. प्राप्त परिस्थितीत हेच श्रेयस्कर आहे.

## उपयुक्त टोनर्स


ब्युटी टॉक

त्वचेच्या देखभालीत क्लिंजिंग, टोनिंग आणि मॉईश्चरायजिंगची भूमिका महत्त्वाची असते. स्कीन केअरमधला हा प्रत्येक टप्पा त्वचेला नवतजेला देऊन जातो. त्यातही टोनिंगच्या प्रक्रियेला विशेष महत्त्व असतं. बाजारात विविध कंपन्यांचे क्लिंजर्स, टोनर्स आणि मॉईश्चरायजर्स मिळतात. नैसर्गिक उत्पादनांचा वापर करणाऱ्या महिला गुलाबपाण्याने टोनिंग करतात. मात्र त्वचेचा पोत लक्षात घेऊन टोनरची निवड करायला हवी. हा टोनर घरच्या घरी तयार करता येईल. कोणत्या प्रकारच्या त्वचेला कोणता टोनर हवा याबाबतचं मार्गदर्शन...

* सर्वसामान्य त्वचेसाठी ॲपल सिडर व्हिनेगार आणि ग्रीन टी युक्त टोनर वापरा. ॲपल सिडर व्हिनेगारमध्ये अँटी फंगल घटक असतात. यामुळे चेहऱ्यावरच्या मुरुमांची समस्या कमी होते. त्वचेच्या पीएच बॅलन्सचं संतुलन राखण्याचं काम ॲपल सिडर व्हिनेगार करतं. त्यामुळे मृत त्वचाही निघून जाते. ग्रीन टी मधलं कॅफेन आणि अँटी ऑक्सिडंट्स त्वचेचं रक्षण करतात. हे टोनर बनवण्यासाठी पाव कप ॲपल सिडर व्हिनेगारमध्ये एक कप ग्रीन टी उकळलेलं पाणी घाला. तुमचं टोनर तयार होईल.

* त्वचा संवेदनशील असल्यास गुलाबपाणी आणि कोरफडीचा गर यांच्या मिश्रणाने तयार झालेला टोनर वापरता येईल. यामुळे त्वचेचा लालसरपणा कमी होतो. चेहऱ्यावर सूज असेल तर हे टोनर वापरावं. अँटी एजिंग म्हणूनही याचा वापर करता येईल. कपभर गुलाबपाण्यात तेवढाच कोरफड गर घालून हा टोनर तयार करता येईल.

* मुरुमांचा त्रास सतत अनुभवणाऱ्या त्वचेसाठी अँटी बॅक्टेरियल टोनरची गरज असते. चेहऱ्यावर डाग किंवा पिंपल असल्यास 'टी ट्री ऑईल' आणि 'केमोमाईल'युक्त टोनर वापरा. 'केमोमाईल' हे एक प्रकारचं फूल आहे. या टोनरमुळे त्वचा मुलायम आणि नितळ होईल. एक कप 'केमोमाईल'मध्ये दोन थेंब 'टी ट्री ऑईल' घालून हे मिश्रण टोनर म्हणून वापरता येईल.




* तेलकट त्वचा असणाऱ्यांनी तेलाचं प्रमाण कमी करणाऱ्या टोनरचा वापर करायला हवा. कोरफड, विच हेजल आणि गुलाबपाण्याचा वापर करून टोनर तयार केल्यास त्वचेचा तेलकटपणा दूर होऊन मुरुमांची समस्या कमी होईल. 'विच हेजल' या वनस्पतीचा वापर सौंदर्यप्रसाधनांमध्ये केला जातो. 'विच हेजल' चा अर्क बाजारात मिळतो. प्रत्येकी अर्धा कप गुलाबपाणी, विच हेजल आणि कोरफडीचा गर घेऊन मिश्रण तयार करा. टोनिंगसाठी वापरा.

# महाविकास आघाडीकडून संविधानाचा अवमान

## मविआच्या नेत्यांना संविधान फक्त निवडणुकीपुरते आठवते : चंद्रशेखर बावनकुळे

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ८ :

महाविकास आघाडीकडून संविधानाचा अवमान होत आहे. मविआच्या नेत्यांना संविधान फक्त निवडणुकीपुरते आठवते, असे म्हणत भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी टीका केली आहे. मविआच्या नेत्यांनी काल आमदाराकीची शपथ न घेतल्यामुळे सत्ताधारी पक्षाकडून त्यांच्यावर टीका करण्यात येत आहे. या मुद्द्यावरून बोलताना भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी ट्विट करत मविआवर निशाणा साधला आहे.



चंद्रशेखर बावनकुळे पुढे बोलताना म्हणाले की, राज्यातील महाविकास आघाडीच्या नेत्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान फक्त निवडणुकीपुरते आठवते, हे त्यांनी आपल्या कालच्या कृतीतून सिद्ध केले.

विधानसभा निवडणुकीतील अपयश लपवण्याचे काम शरद पवार, राहुल गांधी करीत आहेत. पवारांबाबत मला आदर आहे पण ईव्हीएमबाबत पवारांनी नौटंकी करु नये, असा हल्लाबोल भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे. आघाडीचे जे उमेदवार ईव्हीएममुळे विजयी झाले आहेत, त्या सर्वांना राजीनामा द्यावेत, असे आव्हान बावनकुळे यांनी केले आहे. ते विधिमंडळ परिसरात माध्यमांशी बोलत होते.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, शरद पवार यांच्याबद्दल आदर आहे मात्र, त्यांनी खोटारडे पणा करु नये. पराभवातून स्वीकारुन पुढे गेले पाहिजे त्यातून काही तरी शिकायला हवे, लोकसभा निवडणुकीत त्यांनी फेक नरेटीव्ह पसरवला होता. विधानसभेला लोकांनी त्यांना नाकारले. लोकसभेला त्यांचे 31 खासदार निवडून आले तेव्हा त्यांनी आक्षेप घेतला नाही. त्यांच्या सर्व खासदार-आमदार यांनी राजीनामा द्यायला हवे.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, विधानसभेतील नवनिर्वाचित सदस्यांना संविधानाच्या साक्षीने आमदारकीची शपथ घेणे संविधानिकदृष्ट्या आवश्यक असूनही मविआ सदस्यांनी शपथ घ्यायला नकार दिला. हा संविधानाचा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान आहे. याचा निषेध करावा तेवढे कमीच आहे.

उद्धवसेनेचे गटनेते आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वात विरोधकांनी आय लव्ह मारकडवाडी असे फलक झळकावले. ठाकरे म्हणाले आम्ही जे आमदार विजयी झालोत त्यांच्या मनातही ईव्हीएमबद्दल शंका आहे, म्हणून शपथ घेतली नाही. मारकडवाडीत मतपत्रिकेवर मतदानाची तयारी झाली होती. हे मतदान जनतेच्या मनातील शंकांना उत्तर देणार होते. पण दडपशाही करून प्रशासनाने मतदान होऊ दिले नाही.

विधानसभेचे अधिवेशन पहिल्याच दिवशी ईव्हीएमच्या मुद्द्यावरून गाजले. शनिवारी 288 पैकी सत्ताधारी173 आमदारांना हंगामी विधानसभा अध्यक्ष कालिदास कोळंबकर यांनी शपथ दिली. ईव्हीएमच्या मुद्द्यावरून आक्रमक महाविकास आघाडीच्या आमदारांनी मात्र शपथविधीवर बहिष्कार टाकला. विधानसभेत राष्ट्रगीत झाल्यानंतर हे आमदार बाहेर पडले. ईव्हीएम, निवडणूक आयोगामुळेच महायुतीला बहुमत मिळाले आहे, असा ठपका ठेवत मतपत्रिकेवर पुन्हा निवडणूका घ्या, अशी मागणी करत मविआच्या आमदारांनी विधिमंडळ परिसरात निदर्शने केली. विधिमंडळाच्या पायऱ्यांवरही आंदोलन केले. सोलापूर जिल्ह्यात मारकडवाडी या गावात मतपत्रिकेवर चाचणी मतदान घेण्याची प्रक्रिया प्रशासनाने दडपशाही मार्गाने उधळून लावली, असा आरोप करत विरोधकांनी प्रशासन व सरकारचा निषेध केला. दुसरीकडे, शपथविधीवर बहिष्कार टाकणे हा लोकशाहीचा अपमान आहे, अशी टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली.

# निवृत्त पोलीस उपनिरीक्षकाचा १४ वर्षीय मुलीवर बलात्कार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

वस्तीत राहणाऱ्या १४ वर्षीय मुलीला जाळ्यात ओढून नागपूर शहर पोलीस दलातून सेवानिवृत्त झालेल्या एका पोलीस उपनिरीक्षकाने बलात्कार केला. मुलीशी शारीरिक संबंध प्रस्थापित करताना अनेक चित्रफिती तयार केल्या. आता त्या मुलीने शारीरिक संबंधास नकार दिल्यामुळे मुलीच्या अश्लील चित्रफिती समाज माध्यमावर प्रसारित केल्या. या प्रकरणी मुलीच्या कुटुंबियांच्या तक्रारीवरुन गिट्टीखदान पोलिसांनी आरोपी पोलीस उपनिरीक्षकावर बलात्काराचा गुन्हा दाखल केला. कवडू धुर्वे रा. सुरेन्द्रगढ असे आरोपी पोलीस उपनिरिक्षकाचे नाव आहे.

गिट्टीखदान पोलीस ठाण्याच्या हद्दीत पीडित १४ वर्षीय मुलगी आईवडिलांसह राहते. ती आठव्या वर्गाची विद्यार्थिनी आहे. तिच्याच वस्तीत आरोपी कवडू हा पीएसआय राहतो. तो शहर पोलीस दलातील मोटर परिवहन विभागातून सेवानिवृत्त झाला आहे. पीडित मुलीच्या वडिलांशी त्याची मैत्री होती. त्यामुळे तो नेहमी घरी येत होती. त्याची नजर मुलीवर पडली. घरी कुणी नसताना त्याने चॉकलेट देण्याचे आमिष दाखवून मुलीशी अश्लील चाळे केले. आईवडिलांना न सांगण्याची धमकी मुलीला दिली होती. मुलीने कुटुंबियांकडे तक्रार न केल्यामुळे पीएसआयची हिम्मत वाढली. त्याने पुन्हा त्या मुलीच्या घरी जाऊन तिच्याशी बळजबरी शारीरिक संबंध प्रस्थापित केले. त्यानंतर तिला घरी बोलावून तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित करतानाचे भ्रमणध्वनीने चित्रिकरण केले.

तेव्हापासून तो नेहमी तिला अश्लीच चित्रफिती समाज माध्यमावर प्रसारित करण्याची धमकी देऊन गेल्या अनेक दिवसांपासून लैंगिक शोषण करीत होता. मात्र, गेल्या काही दिवसांपासून ती मुलगी त्याच्यापासून दुरावा ठेवत होती. त्याने तिला अश्लील चित्रफिती प्रसारित करण्याची धमकी दिली. तरीही त्या मुलीने हिम्मत एकवटून त्याला विरोध केला. त्यामुळे त्याने वस्तीतील एका व्हॉट्सअप ग्रूपमध्ये तिचे अश्लील छायाचित्र आणि चित्रफिती पोस्ट केल्या. त्यामुळे एकच खळबळ उडाली. काही नागरिकांनी या प्रकाराची मुलीच्या वडिलांना माहिती दिली. मुलीचे कुटुंबिय थेट गिट्टीखदान पोलीस ठाण्यात पोहचले. त्यांनी तक्रार दिली. पोलिसांनी तक्रारीवरुन पोलीस उपनिरीक्षक कवडू धुर्वे याच्यावर बलात्कारासह आयटी ॲक्टनुसार गुन्हे दाखल केले.

वस्तीतील अनेक लोकांनी त्या मुलीच्या अश्लील चित्रफिती बघितल्या. त्यामुळे त्या पीएसआयविरुद्ध रोष निर्माण झाला. अनेकांनी पीएसआयला जाब विचारला. मात्र, नागरिकांना दमदाटी करीत होता. त्यामुळे मुलीच्या कुटुंबियांसह वस्तीतील जवळपास शंभरावर नागरिक गिट्टीखदान पोलीस ठाण्यात गोळा झाले. हा प्रकार उघडकीस आल्यानंतरही पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यास उशिर लावल्यामुळे नागरिकांमध्ये रोष होता. मात्र, रात्री उशिरा त्या पीएसआयविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

## १२ डिसेंबर रोजी टंकलेखन चाचणी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

महाराष्ट्र विधिमंडळाचे आगामी हिवाळी अधिवेशन कालावधीदरम्यान, सचिवालयात लिपिक टंकलेखकांची एकूण १० पदे एस-६ (१९९००-६३२००) या वेतनसंरचनेनूसार व अधिक नियमानुसार मिळणाऱ्या भत्यासह तात्पुरत्या स्वरुपात भरण्यात येणार आहेत. लिपीक-टंकलेखक या पदाकरिता शैक्षणिक अर्हता बारावी उत्तीर्ण, मराठी टंकलेखन ३० श.प्र.मी. इंग्रजी टंकलेखक ४० श.प्र.मी.व संगणकाची एमएससीआयटी किंवा इतर समकक्ष संगणक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.खुला संवगार्साठी वय १८ ते ३८ वर्ष, मागास वगार्साठी वय १८ ते ४३ वर्ष (५ वर्ष नियमाप्रमाणे शिथीलक्षम) राहील. ज्या उमेदवारांनी लिपिक-टंकलेखक या पदाकरिता अर्ज केला आहे.अशा सर्व उमेदवारांची टंकलेखन चाचणी गुरुवारी १३ डिसेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता विधानभवन नागपूर येथे घेण्यात येईल. उमेदवारांनी चाचणीसाठी येताना सोबत मूळ कागदपत्रासह फोटो, जात प्रमाणपत्र, टी.सी, मार्कलिस्ट व इतर शैक्षणिक कागदपत्र घेवून वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# मालमत्तेच्या वादातून ३६ वर्षीय व्यक्तीची हत्या

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ८ :

मालमत्तेच्या वादातून ३६ वर्षीय पुतण्याची हत्या केल्याप्रकरणी वांद्रे पोलिसांनी दाम्पत्याला अटक केली. आरोपी हबीबूर रेहमान खान (५६) याच्यासह त्याची पत्नी सना खान (३६) यांचे मृत व्यक्तीच्या कुटुंबासोबत शनिवारी भांडण झाले होते. त्यातून आरोपी हबीबूरने बांबूने हल्ला केला होता. हबीबूरविरोधात यापूर्वी पाच गुन्हे दाखल आहेत. याशिवाय दोनवेळा त्याच्याविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

वांद्रे पश्चिम येथील खोजा कब्रिस्तानजवळील परिसरात शनिवारी ही घटना घडली. मृत व्यक्ती कामरान फैजल रेहमान खान (३६) व्यवसायाने रिक्षा चालक होता. तो कुटुंबियांसोबत वांद्रे पश्चिम येथील गॅलेक्सी चित्रपतगृहाजवळील खान हाऊस येथे कुटुंबियांसोबत राहत होता. आरोपी हबीबूर व त्याची दुसरी पत्नी सना खानही त्याच परिसरात राहते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत कामरान, त्याची बहीण तोती व गुड्डी तसेच भाचा सादीक याच्यासोबत आरोपी हबीबूर व सना यांचे शनिवारी भांडण झाले. त्यानंतर संतापलेल्या हबीबूरने बांबू कामरानच्या डोक्यात मारला. त्यात तो खाली कोसळला. त्याला तातडीने वांद्रे येथील भाभा रुग्णालयात दाखल केले असता त्याचा मृत्यू झाला.

याप्रकरणी पोलिसांनी अपमृत्यूची नोंद केली असता हबीबूरने कामरानच्या डोक्यात बांबू मारल्याचे समजले.

# १.२७ लाखाची घरफोडी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

केवळ अर्धा तासात चोरांनी घरफोडी करून रोकड आणि दागिन्यांसह एकूण 1 लाख 27 हजार रुपयांच्या मालावर डल्ला मारला. ही घटना सदर पोलिस ठाण्यांतर्गत घडली. पोलिसांनी तेजस चंद्रकांत नरकाम (32) रा. जुनी सीपीडब्ल्यूडी कॉलनीच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. गत गुरूवारी सायंकाळी 5 वाजताच्या सुमारास तेजस घराला कुलूप लावून कुटुंबासह खरेदीसाठी बाहेर गेले होते. ते बाहेर जाताच चोरांनी मुख्य दाराचे कुलूप तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. बेडरूमच्या कपाटातून रोख 15 हजार आणि सोन्याचांदीचे दागिने असा 1.27 लाख रुपयांचा माल चोरी करून पसार झाला. जवळपास अर्धा तासानंतर तेजस घरी परतले असता चोरी झाल्याचे समजले.

## २ ट्रकमध्ये धडक १ जखमी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

वर्धमाननगर चौकात दोन ट्रकमध्ये आमोरासमोर धडक झाली. यात एका ट्रकचा चालक गंभीर जखमी झाला, तर दुसरा चालक घटनास्थळावरून फरार झाला. ही घटना शनिवारी सकाळी 5.30 वाजताच्या सुमारास घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीओपीची पोती असलेला एक ट्रक लघु औद्योगिक क्षेत्राकडे जात होता. वर्धमाननगर चौकातून वळताना विरुद्ध दिशेने आलेल्या ट्रकच्या चालकाने त्याला जबर धडक दिली. धडक इतकी जोरदार होती की, ट्रकचे कॅबिन पूर्णता क्षतिग्रस्त होऊन चालक गंभीर जखमी झाला. घटनेनंतर धडक मारणाऱ्या ट्रकचा चालक वाहन घेऊन फरार झाला. सकाळी फिरायला निघालेल्या लोकांना क्षतिग्रस्त ट्रक दिसला. त्यात चालक जखमी अवस्थेत पडून होता. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली.

लकडगंज पोलिस घटनास्थळी पोहोचले. जखमी चालकाला उपचारार्थ रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याचा ट्रक पीओपीच्या पोत्यांनी भरलेला असल्याने रस्त्यावरून हटविणे कठिण काम होते. त्यामुळे मजूर बोलावून आधी ट्रक रिकामा करण्यात आला आणि नंतर रस्त्यावरून हटविण्यात आले. मात्र तोपर्यंत वाहतूक प्रभावित झाली होती. पोलिसांनी अज्ञात ट्रक चालकावर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासण्यात येत आहे.

VIKAS Lifecare LIMITED

## राजस्थान गुंतवणूक प्रोत्साहन अंतर्गत विकास लाइफकेअरची नवीन उत्पादन सुविधा

लोकार्थ

विकास लाइफकेअर लिमिटेडला राजस्थान गुंतवणूक योजनेंतर्गत, 20,000 चौरस फूट पसरलेल्या शाहजहानपूर फक्कड औद्योगिक क्षेत्रात नवीन, अत्याधुनिक उत्पादन सुविधा स्थापन केल्याची घोषणा करताना आनंद होत आहे. डिसेंबर २०२४ मध्ये ऑपरेशन्स सुरू करण्यासाठी नियोजित, ही सुविधा EVA, ATH, थर्मोप्लास्टिक रबर आणि थर्मोप्लास्टिक इलास्टोमरसह प्रगत कमोडिटी कंपाऊंड्स तयार करण्यात विशेषज्ञ असेल. हा धोरणात्मक उपक्रम नफा वाढवण्यासाठी आणि प्रादेशिक विकासाला चालना देण्यासाठी फक्कढर प्रोत्साहनांचा लाभ घेण्याच्या कंपनीच्या वचनबद्धतेची पुष्टी करतो.

RIPS द्वारे, राजस्थान सरकार राज्यात उत्पादित आणि विकल्या गेलेल्या उत्पादनांवर 9% SGST परताव्यासह अनेक आर्थिक लाभ ऑफर करते. अतिरिक्त फायद्यांमध्ये रोजगार निर्मितीशी संबंधित सबसिडी, वीज शुल्क आणि जमीन कर यासारख्या कर्तव्यांवर सूट किंवा स्थगिती आणि संभाव्य भांडवली गुंतवणूक आणि व्याज अनुदान यांचा समावेश होतो.

5,000 MTPA च्या उत्पादन क्षमतेसह, या सुविधेमुळे INR 400-500 दशलक्ष अतिरिक्त वार्षिक महसूल मिळण्याची अपेक्षा आहे, ज्यामुळे बाजारपेठेतील स्पर्धात्मक स्थिती मजबूत करताना कंपनीच्या नफा आणि वाढीच्या मार्गावर लक्षणीय योगदान होते.

विकास लाइफकेअर लिमिटेड ही ISO 9001:2015 प्रमाणित कंपनी आहे, जी पारंपारिकपणे पॉलिमर आणि रबर कंपाऊंड्स आणि प्लास्टिक, सिंथेटिक आणि नैसर्गिक रबरसाठी स्पेशालिटी ॲडिटीव्हसचे उत्पादन आणि व्यापारात गुंतलेली आहे. दीर्घकालीन व्यवसाय धोरण म्हणून, कंपनीने कच्च्या मालाच्या (B2B व्यवसाय) पलीकडे आपल्या व्यावसायिक हितसंबंधांमध्ये विविधता आणली आहे आणि FMCG, ॲग्रो आणि इन्फ्रास्ट्रक्चर उत्पादनांसह अनेक ग्राहक उत्पादनांसह B2C विभागात प्रवेश केला आहे. ■ ■

## सौर ऊर्जा प्रकल्पासाठी रेहतांन टीएमटीचा जमीन भाडेपट्टी करार

Rhetan TMT
SYMBOL OF STRENGTH

रेहतान टी एम टी लिमिटेड (BSE: 543590), स्टील उत्पादनांच्या निर्मिती आणि व्यापारात गुंतलेली एक आघाडीची कंपनी असून, कंपनीने जमिनीसाठी नवीन लीज डीड दाखल करणार असल्याची घोषणा केली आहे. तत्पूर्वी, कंपनीने सौर ऊर्जा प्रकल्पाच्या स्थापनेसाठी उंटर्डा, तालुका बयाड, जिल्हा अरवली येथे जमीन भाडेपट्ट्याने देण्यासाठी लेटर ऑफ इंटेंट कार्यान्वित केले होते.

तथापि, पट्टेदारांसोबतच्या काही आव्हानांमुळे, अंतिम भाडेपट्टा करार नियोजित प्रमाणे कार्यान्वित होऊ शकला नाही. कंपनी आता गाव यूएन, तालुका कांकरेज, जिल्हा बनासकाठा येथे जमिनीसाठी भाडेपट्टा करारात प्रवेश करणार आहे. या जागेचा उपयोग सौर ऊर्जा प्रकल्पाच्या स्थापनेसाठी केला जाईल, ज्याची क्षमता २ मेगावॅटपर्यंत असेल. कंपनीने प्लांटच्या स्थापनेसाठी विक्रेत्याकडे ऑर्डर दिली आहे. याव्यतिरिक्त, आम्हाला गुजरात एनर्जी डेव्हलपमेंट एजन्सी कडून तात्पुरती मान्यता मिळाली आहे आणि कनेक्टिव्हिटी मंजुरीसाठी ५ डिसेंबर रोजी गुजरात एनर्जी ट्रान्समिशन कॉर्पोरेशन कडे अर्ज सादर केला आहे. कडी, गुजरात येथे कंपनीच्या कारखान्याच्या परिसरात वीज वापरण्यासाठी हा सोलर प्लांट बसवला जात आहे आणि त्याला जानेवारी २०२५ च्या मध्यापर्यंत GETCO ची कनेक्टिव्हिटी मंजूरी मिळण्याची अपेक्षा आहे. ■ ■




## २०२५ साठी कोटक म्युच्युअल फंडचा मार्केट आउटलुक जारी

कोटक महिंद्रा ॲसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेडने २०२५ साठी मार्केट आउटलुक अहवाल प्रसिद्ध केला. कोटक म्युच्युअल फंड, गुंतवणूकदारांनी लक्ष ठेवू शकणाऱ्या विविध गुंतवणूक थीमवर प्रकाश टाकणारा अहवाल लॉन्च केला.

आगामी वर्षासाठी, भारतीय अर्थव्यवस्था आणि भांडवली बाजाराच्या दिशेने मॅक्रो-इकॉनॉमिक दृष्टीकोन सामायिक करताना, अहवालात २०२५ मध्ये बाजारपेठांना मदत करू शकणाऱ्या पाच प्रमुख थीमवर प्रकाश टाकण्यात आला आहे. अनेक क्षेत्रांमध्ये कॉर्पोरेट ऑर्डर बुक्सचा विस्तार या चक्राच्या व्यापक स्वरूपावर प्रकाश टाकतो.

आर्थिक सेवा हे एक वैविध्यपूर्ण क्षेत्र आहे ज्यामध्ये उपश्रेणींमध्ये वेगवेगळी कामगिरी असते. बँक पत वाढ आणि ठेवीतील वाढ यातील अंतर कमी होत आहे ज्यामुळे मार्जिनवरील दबाव कमी होऊ शकतो. क्लाउड सेवांवरील खर्च वाढल्याने आयटी सेवा खर्चात सुधारणा होण्याची अपेक्षा आहे. जनरेटिव्ह एआयचा उदय हा या क्षेत्रासाठी प्रमुख चालकांपैकी एक आहे. अकमागणी २०२२ ते २०२७ पर्यंत 15 पट वाढण्याची अपेक्षा आहे. ■ ■

## वन मोबोक्विक सिस्टीमचा आयपीओ ११ डिसेंबर रोजी उघडणार

वन मोबिक्विक सिस्टीम लिमिटेड, ग्राहक आणि व्यापारी यांचा समावेश असलेल्या द्विपक्षीय पेमेंट नेटवर्कसह एक प्लॅटफॉर्म व्यवसाय असून,कंपनीने २६५/-ते २७९/- प्रति इक्विटी शेअर दर्शनी मूल्याचा मूल्य बँड निश्चित केला आहे. कंपनीची इनिशियल पब्लिक ऑफरिंग बुधवार, ११ डिसेंबर रोजी सबस्क्रिप्शनसाठी उघडेल आणि शुक्रवार, १३ डिसेंबर रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान 53 इक्विटी शेअर्ससाठी आणि त्याच्या पटीत बोली लावू शकतात. त्यानंतर 53 इक्विटी शेअर्स असतील. आयपीओ हा पूर्णपणे रु. 572 कोटी पर्यंतचा नवीन इश्यू आहे. त्याच्या नवीन जारी करण्यापासून मिळणारे उत्पन्न त्याच्या वित्तीय सेवा व्यवसायात सेंद्रिय वाढीसाठी 150 कोटी रुपयांच्या मर्यादेपर्यंत वापरले जाईल; पेमेंट सेवा व्यवसायात सेंद्रिय वाढीसाठी 135 कोटी रुपये; संशोधन आणि विकास तसेच तंत्रज्ञानासाठी 107 कोटी रुपये; पेमेंट उपकरण व्यवसायासाठी 70.28 कोटी; आणि सामान्य कॉर्पोरेट हेतूने वापरले जाईल. ■

संकलन - संयोजन
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre@rediffmail.com

# स्पंदन दिवाळी अंक स्पर्धेचा निकाल जाहीर

## दै.महासागर अंकाला उत्कृष्ट दिवाळी पुरस्कार

■ महासागर प्रतिनिधी
तळमावले, दि. ८ :

पाटण तालुक्यातील डाकेवाडी (काळगांव) येथील स्पंदन चॅरिटेबल ट्रस्टने आयोजित केलेल्या स्पंदन दिवाळी अंक स्पर्धेस संपूर्ण महाराष्ट्रातून उत्स्फुर्त आणि उदंड प्रतिसाद मिळाला आहे. स्पर्धेचे हे सहावे वर्ष आहे. महाराष्ट्रातील साहित्यिक, सांस्कृतिक परंपरा अखंडपणे जपण्यासाठी स्पंदन दिवाळी अंक स्पर्धा घेतली जाते. या स्पधेर्चा निकाल जाहीर झाले असल्याची माहिती ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष डॉ.संदीप डाकवे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे दिली आहे.

स्पर्धेत तब्बल 100 दिवाळी अंक आले होते. त्यामधून महासागर, अवतरण-सकाळ, सुभाषित, तेजोमय, कालनिर्णय, शब्दवेल, धगधगती मुंबई, कृष्णाकाठ, गुंफण, सृजनदीप, तरुण भारत, आयार्बाग, शब्द शंकरपाळी, गावगाथा, सृजनसंवाद, सुप्रभा, अक्षरदान, रंगबावरी, कमांडर या अंकांना स्पंदन उत्कृष्ट दिवाळी अंकांचा सन्मान मिळाला आहे. या विजेत्यांना सन्मानचिन्ह, ग्रंथ आणि सन्मानपत्र देण्यात येणार आहे.

स्पंदन उत्कृष्ट दिवाळी अंक स्पर्धा

स्पंदन चॅरिटेबल ट्रस्टने शेकडो नावीण्यपूर्ण समाजोपयोगी उपक्रम राबवत आपल्या कामाची कर्तृत्वमुद्रा समाजमनावर उमटवली आहे. या कामाची दखल घेत स्पंदन चॅरिटेबल ट्रस्टला राज्यस्तरीय सेवाव्रती पुरस्कार, यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार इ.नी गौरवण्यात आले आहे. याशिवाय याच कार्यक्रमात सेल्फी विथ गुढी स्पर्धा, स्व.राजाराम डाकवे (तात्या) साहित्य पुरस्कार, प्राईड ऑफ स्पंदन अवॉर्ड पुरस्कारांचे वितरण शनिवार दि. २१ डिसेंबर, २०२४ रोजी कराड जि.सातारा या ठिकाणी दिमाखदार सोहळ्यात विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.

# देशातील ६० जिल्हे नक्षलमुक्त?

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ८ :

गत पाच वर्षांत चंद्रपूरसह देशातील ६० जिल्हे नक्षलमुक्त केल्याचे केंद्रीय गृह मंत्रालयाने म्हटले आहे. आजघडीला एकूण ३८ जिल्हे नक्षलग्रस्त असून, तेही लवकरच नक्षलमुक्त होतील, असा दावाही गृह मंत्रालयाने केला आहे.

केंद्रीय गृह मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, देशात आजघडीला एकूण ३८ जिल्हे नक्षलग्रस्त आहे. पण, मागील पाच वर्षांत देशभरातील एकूण ६० जिल्हे नक्षलमुक्त केले आहेत. महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्हा नक्षलमुक्त झाल्याचे गृह मंत्रालयाने म्हटले आहे. २०१५ मध्ये नक्षलवादाच्या प्रश्नावर मार्ग काढण्यासाठी राष्ट्रीय धोरण आणि कार्य योजनेला मंजुरी देण्यात आली होती.

त्यानुसार सुरक्षेबाबत उपाययोजना, विकास योजना आणि स्थानिक जनतेचे हक्क आणि अधिकारावर भर देण्यात आला.

सुरक्षेच्या पातळीवर केंद्रीय सुरक्षा दलाच्या तुकड्या आणि राज्य सरकारच्या पोलिस दलाचे आधुनिकीकरण करण्यात आले. त्यांना प्रशिक्षण, आत्याधुनिक हत्यारे, उकरणे देण्यात आली. गुप्त माहितीचे आदान प्रदान करण्यात आले. विशेष पोलिस ठाण्याची निर्मिती करण्यात आली. विकासाच्या पातळीवर नक्षलग्रस्त भागात रस्ते, दूरसंचार व्यवस्था आणि वित्तीय मदतीवर भर देण्यात आला.

नक्षलग्रस्त जिल्ह्यांतील विविध विकास योजनांसाठी २०१९ - २० ते २०२३- २४, या पाच वर्षांच्या कार्यकाळात ४३५०.७८ कोटी रुपये खर्च करण्यात आले. तर नक्षलवादाच्या विरोधात काम करणाऱ्या केंद्रीय संस्थांच्या पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी ५६०.२२ कोटी रुपये खर्च करण्यात आले.

नक्षलग्रस्त भागात १४,५२१ किलोमीटरचे रस्ते तयार करण्यात आले. दूरसंचार व्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी ६५२४ टॉवर उभारण्यात आले. भागात ५७२१ पोस्ट कार्यालये सुरू करण्यात आले. प्रमुख ३० नक्षलग्रस्त जिल्ह्यांत १००७ बँकेच्या शाखा आणि ९३७ एटीएम सुरू केली. नक्षलग्रस्त ४६ जिल्ह्यांत ४९ कौशल्य विकास केंद्र सुरू केले. १७८ एकलव्य मॉडेल आश्रम शाळा सुरू केल्या.

केंद्रीय सुरक्षा दल, राज्य सरकारच्या पोलिस दलाकडून स्थानिक लोकांशी सतत चर्चा, संवाद घडवून आणला. जेणेकरून स्थानिकांना विकासाच्या नव्या संधी, रोजगार मिळाल्यामुळे स्थानिक नक्षलवादापासून दूर गेले.

**नक्षलवादाचा उतरता आलेख**

केंद्र-राज्य सरकारच्या विविध उपाययोजनांचा परिणाम म्हणून २०१० च्या तुलनेत २०२३ मध्ये नक्षलवादाच्या घटनांमध्ये ७३ टक्के घट झाली. २०१० मध्ये सुरक्षा दलाच्या १००५ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला होता, २०२३ मध्ये त्यांची संख्या १३८ वर आली. सुरक्षा दलाच्या कर्मचाऱ्यांचे मृत्यूचे प्रमाण ८६ टक्क्यांनी कमी झाले. २०१० मध्ये नक्षलग्रस्त जिल्हे १२६ होते, २०१८ मध्ये ९० आणि २०२१ मध्ये ७० आणि आता एप्रिल २०२४ पर्यंत नक्षलग्रस्त जिल्ह्यांची संख्या ३८ वर आली असल्याचे गृह मंत्रालयाने म्हटले आहे.